७८२०

म. ग्रं. सं. ठाणें

विषय

सं. क्र.

REFBK-0001756

## दूषित रक्त शुद्ध करणारा

डॉ० रामनाथ यांचा

आयोडाइज्ड

# सार्सापरिला.

उपदंश (गरमी) हा रोग इतका भयंकर आहे कीं, याचें विष अंगांत राहिल्यास त्या रोग्यासच काय, पण त्याच्या संततीसही त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. रक्त हें मनुष्याचें जीवित आहे. तें कोणत्याही प्रकारें बिघडूं देणें व बिघडलेलें तसेंच सुरूं देणें घातुक आहे. कोणत्याही प्रकारें रक्तदोष झाला असल्यास **डॉ. रामनाथ** यांचा **सार्सापरिला** अवश्य सुरू करावा. याचे सेवनानें सर्व विकार तावडतोब दूर होऊन शरीरांत विलक्षण ताकद उत्पन्न होते. किंमत १ बाटलीस १। रु. पोष्ट खर्च ८७ उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. चार बाटल्या एकदम घेणारास टपाल व्ही. पी. सह ४८११.

रामनाथ आणि कंपनी—मुंबई नं. ४.

# जाहिरात.

५० वर्षांच्या अनुभवानें अखंड हिंदुस्थानांत
पसंत ठरलेल्या

## वझेकृत कफनाशक गोळ्या.

—:०:—

### —: लहान मुलांस :—

पोटांतलें, डबा, सुशी, उडतें यावर कोणत्याही प्रकारें इजा न होतां दोन तासांत कफ पाडून गुण देतात. अनुपान-सह २५ गोळ्यांस १ रु. १०० गोळ्यांस ३ रु. ट. ख. नि.

---

१० वर्षांच्या अनुभवावरून प्रसिद्ध

## डांग्या खोकल्यावर औषध.

४ दिवसांत गुण दिसतो. बा. किं. ०।१२. ट. ख. नि.

मालक—वि. शि. वझे, सांवतवाडी.

डॉ० पुरोहित यांचा अनुभविक

## धातुपौष्टिक पाक.

मेडिकल खात्यांतील आमच्या २५ वर्षांच्या अनुभवानें अत्यंत गुणकारी ठरला आहे. हा घेतल्यानें धातुस्थानची कडकी, लघवींतून धातु जाणें, स्वप्नावस्था, नपुंसकत्व, गरमी, रसायनाचे वाईट परिणाम, छातींत दुखणें, (हार्टडिसीज), कफ-धातुक्षय वगैरे जुनाट रोग जाऊन चांगली भूक लागून जलद रक्त व धातु वाढते. कामशक्ति वाढून स्तंभन होतें. गवई, नाटक-कंपन्या, स्टेशन मास्तर वगैरे लोकांस जाग्रण बाधत नाहीं. गरोदर स्त्रियांना अन्न पचतें. बाळंतिणीचें दूध वाढतें. संग्रहणी, बाळग्रही व मुडदुसी मुलें जलद सुधारतात. बाळंतरोगावर व क्षयरोगावर हटकून गुणकारी आहे.

किंमत—१ डब्यास १ रु. ३ डब्यांस २॥ रु. डझनास ९ रु.

उत्तम गुणास तीन डबे लागतात.

डॉ० वी. एम्. पुरोहित, पोस्ट—गडहिंग्लज, जि०—बेळगांव.

---

## रोल्डगोल्ड सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने.

खमिसचे बटन सेट—किं. रु. ३; जॅकेटचे बटन सेट—किं. रु. ३; कोटाचे बटन सेट—किं. रु. ३; चंद्रहार—किं. रु. ३-४; गोठ जोडी—रु. २-२॥; पाटल्या जोडी—रु. २-२॥; वज्रटिका—रु. ३-४; ठुशी—रु. ६; नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली—रु. ४-५; शिंप्याचे मोती लहानमोठे वाटेल तसे, सराची किं. रु. २-३-४; अंगठी—रु. १; सल्ले अष्टपैलु जोडी—रु. १॥; बांगड्या जोडी—रु. २ २॥; सरी—रु. ४; घड्याळाचा छडा—रु. ३; वांकी जोडी—रु. ३.

### केंस काळे करण्याचा साबण.

हा साबण फार परिश्रमानें तयार केला आहे. यानें केंस काळे होतात व कायमचे काळे राहतात. तीन वड्यांच्या बॉक्सची किं. १॥ रुपया.

पत्ता—मगनलाल के. आणि कंपनी, गिरगांव, मुंबई.

वंगभस्म–पौष्टिक शिवाय प्रमेह, पांडु, क्षय, ज्वर व उरःक्षत इ. २
वज्रक्षार ताम्रभस्म–उदर, गुल्म, सूज, शूल व अजीर्ण इ. २
अभ्रकंचुकी—( घोडा चोळी ) सर्व रोगांवर ४
चंद्रप्रभा—मूत्रकृच्छ्र, प्रमेह, धुपणी क्षय, व पांडु इ. ना. २
सुतशेखर–आम्लपित्त, गुल्म, शैत्य, वांति, श्वास व कास इ. ३
सुवर्णमालिनी वसंत—जीर्णज्वर, राजविलास प्रदर,
क्षीणता, कडकी, क्षय इ. ना. ८
प्रमदानंदरस—शूल, संग्रहणी, कफ इ. ना. व पौष्टिक २
मेहांतकरस—ज्वर, क्षीणता, प्रमेह इ. ना. व पौष्टिक ६
घोडाचोळी—सर्व रोगहारक. ४
महामृत्युंजय—सर्व ज्वरनाशक. २

सुरंगी, मालती, कल्हार, लक्ष्मीविलास, मदनमस्त इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केशांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक पूर्ण खात्रीचीं तेलें माफक दरानें विकत मिळतील.

सूचना—औषधें पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस तीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अतिशय उपयोग झाला. म्हणून त्यांचा नेहमीं फार खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीखर्ड्यांसह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपालखर्च वेगळा. घाऊक घेणारास कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्य रक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक ( क्याटलॉग ) फुकट देऊं.

**कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य,**

मु० पो० आंजर्लें, ता० दापोली, जि० रत्नागिरी.

# डॉ० अण्णा मोरेश्वर कुंटे

बी. ए., एम्. डी.

यांचे फॉर्म्यूल्याप्रमाणें तयार केलेलीं

# -: औषधें. :-

**प्रत्येक औषधाची किंमत एक रुपया.**

१ आंकडी, अपस्मार (कन्व्हलशन्स) इ. विकारांवर औषध

२ हिमज्वरांकुश—(Antimalarial) हिंवतापावर गोळ्या.

३ अर्शकुठार (मूळव्याधींवर) चूर्ण.

४ मूळव्याधीचे मोडावर मलम.

५ कॉलरा, आमातिसार, संग्रहणीवर बिंदु.

६ आर्तवदोष, शूलपरिहारी (विटाळशूळ व धुपणी इत्यादि स्त्रियांच्या सर्व विकारांवर) गोळ्या.

अर्धा आण्याचें तिकीट आल्यास माहितीपत्रक पाठवूं.

टेलिफोन नं. २२१५
ता. पत्ता 'गुणकारी' मुंबई.

कृष्णाजी अण्णा कुंटे,
मालक—गणेश फार्मसी.

पत्ता:—अनंताश्रम, गिरगांव बॅकरोड, मुंबई नं. ४

पुणें एजंट—जी. वी. रानडे आणि सन्स, कापडवाले, शुक्र. पेठ.

## अत्यंत आश्चर्यकारक इलाज !

## शक्तिवर्धक ! धातुपौष्टिक !! कामदीपोत्तेजक !!!

या गोळ्यांच्या सेवनानें रक्तदोष, वीर्यविकार, मूत्रमार्गाचे रोग, धातुक्षय, स्वप्नावस्था, अशक्तपणा, हे रोग समूळ नष्ट होऊन देहयष्टि अत्यंत जोमदार होते. उत्तम शक्ति, पुष्टि, दीर्घायुष्य, आरोग्य, तरतरीत स्मरणशक्ति इत्यादिक पाहिजे असल्यास—

**लिली टॉनिक पर्ल्स**

सेवन करा. तारुण्यांतील अविचारांचे दुष्परिणाम, भरज्वानीमध्यें वृद्धावस्थेचीं लक्षणें, इंद्रिय शिथिलता, सर्वसाधारण दुर्बलता, वीर्यस्राव, इत्यादि कारणांमुळें ज्यांचें आरोग्य बिघडलें असेल, त्यांनीं **लिली टॉनिक पर्ल्सची** एक बाटली आजच मागवावी. २४ गो.च्या बाटलीस किंमत २ रुपये. टपाल व्ही. पी. खर्च शिवाय.

म्यानेजर—लिली डेपो, मुंबई नं. ४.

---

इंफ्ल्यूएंझा, मलेरीया, हिंवताप वगैरे

सर्वत्र नांवाजलेलें सर्वत्र चालू असलेलें

अवश्य वापरा ! बा. किं. ०१०. डझनास ५॥ रु. स्पेशल मोठी बा. १ रु. डझनास १० रु. **गजकर्णाचें राक्षसी मलम**—हटकून गुण देणारें. किं. ०४ डझनास २। रु. इतर मालाचा क्याटलाग मागवा.

पत्ता :—शेंडे आणि मंडळी, मुंबई नं. ४.




स्त्रियांना

आणि

मुलांना

अत्यंत आवडणारें

हरएक प्रकारचें कापड

मिळण्याचें ठिकाण:-

वनिता भांडार

गिरगांव

बॅकरोड,

मुंबई.

श्री

# कुलस्वामिनी स्टोअर्स.

स्टेशनरी सामान, कापड, पुस्तकें व औषधें.

—o—

श्रीतुळजा भवानीचे फोटो.

—o—

तुळजापुरचें प्रसिद्ध कुंकूं.

—o—

ऑर्डर येतांच माल रवाना करण्यांत येईल.

## कुलस्वामिनी स्टोअर्स,

श्रीक्षेत्र तुळजापूर.

( निजाम स्टेट. )

धरहुरे ... मंडळी

# महाराष्ट्राची कुलस्वामिनी

अर्थात्

# श्रीतुळजा भवानी!

लेखक व प्रकाशक:


**दत्तात्रय माधवराव कुळकर्णी, जोशी,**

धर्माधिकारी, श्रीक्षेत्र तुळजापूर.

'आयेषा', 'विभा', 'राजर्षि', 'सौंदर्योपासक', 'अरुणोदय',
'पन्नाकुमारी', 'शांतिनिकेतन' इ० इ०
पुस्तकांचे कर्ते.


दा. क. १५५६


मुद्रक— केशव रावजी गोंधळेकर,
'जगद्धितेच्छु प्रेस', ५०७ शनवार पेठ, पुणे शहर.


REFBK-0001756


आवृत्ति १ ली

कापडी प्रत २ रु. किंमत कागदी प्रत १॥ रु.



ना. श्री. केशवराव वकील हैद्राबाद दक्षिण.

# समर्पण

प्रेमळपणाचें निवासस्थान, उदारतेनें प्रत्यक्ष अंगराजकर्ण,
सात्विकतेचा मूर्तिमंत अवतार, सकल सुधारणांचें
माहेरघर, निजामशाहीमधील संपूर्ण
जनतेचें विश्वासस्थल

## नामदार केशवरावसाहेब
### हायकोर्ट वकील
हैद्राबाद (दक्षिण)

यांच्या सेवेस कर्त्यानें अत्यंत नम्रपणानें
ही कृति
**अर्पण केली आहे.**

दत्तात्रय माधवराव कुळकर्णी.

# आभार.

जिचा मी आमरण ऋणी राहीन त्या माझ्या मातृभूमीची कांहींतरी सेवा घडावी म्हणून मीं हा अल्प प्रयत्न केला आहे. १९०५ सालापासून या पुस्तकाकरितां माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. हें कार्य हल्लींच्या स्वरूपांत येण्यास जरी इतके दिवस लागले, तरी अजूनही बरीच माहिती देण्याची राहिली आहे. माझ्या या प्रयत्नापासून इतिहासाला मदत व्हावी, भाविकांची गरज पूर्ण व्हावी, ललितकथा वाचणारांचें मनरंजन व्हावें, इत्यादि हेतु मनांत धरून पुस्तकाची रचना यथामति केली आहे. प्रयत्न कसा काय वठला आहे, हें पाहणें रसिकांचें काम आहे.

सदरहु ग्रंथ दृश्य स्वरूपांत येण्यास अनेकांचें सहाय्य झालें असून त्या सर्वांचा मी आभारी आहें. तरी पण कांहींचा नामनिर्देश करणें जरूर आहे. श्रीमंत शेठ बाबूलाल भीमसिंग व श्रीमंत शेषाद्री नाईक यांनीं धीर देऊन प्रोत्साहन दिलें आणि सांपत्तिक सहाय्य केलें, याबद्दल त्यांचे फार उपकार आहेत. सांथीच्या दुर्धर रोगानें एकाएकीं मला गांठलें व त्यांत अकालीं अंत होऊन हातीं धरलेलें कार्य अर्धवट स्थितींत राहण्याचा प्रसंग प्राप्त झाला असतां गुरुवर्य बाबाजी दाजी वैद्य यांनीं मृत्यूच्या दाढेंतून ओढून काढलें म्हणून त्यांचेही मजवर अतिशय उपकार आहेत. माझे प्रेमळ मित्र श्रीयुत नानासाहेब पेशवे, वकील यांनीं माहिती पुरवून अतिशय मदत केल्याबद्दल त्यांचाही मी फार आभारी आहें. पुणें येथील 'भारत-इतिहाससंशोधक-मण्डळा'चे उभयतां चिटणीस-श्री० सरदार मेहेंदळे व रा० पोतदार यांनीं मण्डळाचा ग्रंथसंग्रह पाहण्याची आणि या पुस्तकास उपयुक्त अशा भागाचा उपयोग करण्याची परवानगी दिल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. शेवटीं पुस्तक चांगल्या तऱ्हेनें छापून

दिल्याबद्दल व मजविषयीं दाखविलेल्या असाधारण सदस्येबद्दल जगद्धितेच्छु छापखान्याचे मालक श्री०नानासाहेब गोंधळेकर यांचे कसे आभार मानावे हेंच समजत नाहीं !

पुस्तकांत जुन्या कागदपत्रांवरून घेतलेल्या माहितींत क्वचित् ठिकाणीं झालेल्या चुका दुसऱ्या आवृत्तींत दुरुस्त करूं.

पुस्तकाच्या प्रती फारच थोड्या काढण्याचें कारण इतकेंच कीं, काढलेल्या प्रतींमुळेंच ऋणाखालीं दडपून जाण्याचा प्रसंग प्राप्त झाला आहे. महाराष्ट्रीय जनतेच्या आदरास जर ही कृति उतरेल आणि व्याजांत प्रती खलास होऊन मुद्दल शेवटीं आमच्या डोक्यावर राहण्याचा योगायोग न येईल तर दुसरी आवृत्ती काढण्यास कितीसा उशीर ?

श्रीक्षेत्र तुळजापूर,
फाल्गुन १८४१.

सर्वांचा नम्र सेवक
दत्तात्रय माधवराव कुळकर्णी.

# प्रस्तावना.

## ओळख कशाला ?

प्रिय दत्तोपंतः—

ग्रामस्थ, शिष्य, स्नेही.....या नात्यांच्या आधारावर केलेली विनंति अमान्य करणें माझ्या जिवावर येईल हा तुमचा 'कयास' अगदीं बरोबर नसला तरी केवळ चुकीचा नाहीं हें खरें आहे. तसेंच विशेष कांहीं कारण असल्याशिवाय एकाच्या पुस्तकाला दुसऱ्यानें प्रस्तावना लिहिणें हें मला फारसें पसंत नाहीं. त्यांत ग्रंथकाराचाही थोडासा कमीपणा दिसून येतो व प्रस्तावना लेखकालाही तें मोठेंसें भूषण असतें असें नाहीं. ग्रंथकारानें आपली किंवा आपल्या पुस्तकाची ओळख दुसऱ्याकडून करवून घेणें म्हणजे आपल्या स्वतःच्या मुलाला सांभाळण्याचें सामर्थ्य अंगीं नाहीं म्हणून दुसऱ्याच्या मांडीवर त्याला दत्तक देण्यासारखें नामर्दपणाचें काम आहे. ग्रंथकार म्हणजे 'कालोह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी' असें स्वाभिमानानें म्हणणाऱ्या भवभूतीचें अनुकरण करून छातीठोकपणाने जगापुढे येणारा असला तरच ग्रंथप्रकाशनाच्या कामांत जो थोडाबहुत 'लांचलुचपती'चा प्रकार चालत असतो तो बंद होईल! प्रस्तावना लिहिण्याचा मिळालेला मोठेपणा—यामुळें मिंध्या झालेल्या लेखकाची लेखणी तितकी चुरचुर चालत नाहीं. मित्राच्या घरीं अत्याग्रहामुळें जेवायला गेलेला कोणता 'भोजनभाऊ' गृहस्थ पानांत वाढलेल्या पदार्थांना नांवें ठेवून पत्नीच्या हिरमुसलेल्या तोंडाकडे पाहण्याचा प्रसंग आपल्या स्नेह्यावर आणण्यास तयार होईल ! शिष्टाचाराच्या नांवाखालीं मोठ्या माणसांनाहि क्षुल्लक बाबतींत पुष्कळ वेळां खोटें बोलण्याचा प्रसंग येतो. एखाद्या कीर्तनप्रसंगीं रात्रीं झोंपेमुळें प्रत्यक्ष डोळे मिटत असतांनाहि 'कां झोंप येऊं लागली कीं काय ?' असा प्रश्न हरिदासबुवांनीं विचारल्याबरोबर 'छे ! मुळींच नाहीं.'

असें एकदम बोलून व नकारार्थी मान हलवून आपण सत्य भाषण करितों असेंच जणूं काय सांगणारे 'असत्' सद्‌गृहस्थ काय थोडे असतात? एखाद्या वक्त्याचें कंटाळवाणें चऱ्हाट चालू असतांना केवळ तो मोठा माणूस म्हणून तें निमूटपणें ऐकून घेऊन त्याच्या एरंडाच्या गुऱ्हाळांतला गोड रस प्यायला मिळाला म्हणून आनंदानें मिटक्या माराव्या लागतात, हें तरी खऱ्या गोष्टीला 'शिष्टाचाराचें बुजगावणें'च नव्हे का? याच शिष्टाचाराच्या बुजगावण्याला प्रस्तावना लेखकालाहि थोडेंसें भ्यावें लागतें!

पण तुम्हाला ओळख कशाला पाहिजे हेंच मला समजत नाहीं. एक तर ग्रंथकाराच्या ओळखीवरून ग्रंथाची ओळख करून घेणाऱ्या अरसिक वाचकांची शहाण्या ग्रंथकारानें मुळींच पर्वा करूं नये. एखाद्या प्रसिद्ध नाटककाराचें भिकारडें नाटकहि लोक डोळे मिटून मुकाट्यानें पहात असतात, नांवाजलेल्या विनोदी लेखकाच्या लेखांत खरा विनोद नसला तरी त्या लेखाला वाचकवर्ग हंसत असतो, हा नाटकी देखावा नेहमीं आपल्या दृष्टीस पडतो. पण पूर्वपुण्याईच्या गांठोड्यावर जगणारा लेखक, डोळे मिटून नाटक पाहणारा प्रेक्षक आणि कारणावांचून हंसणारा वाचक हे तिन्ही प्राणी एकाच माळेचे मणी असतात. ग्रंथकारावरून ग्रंथाची परीक्षा करण्यापेक्षां ग्रंथावरून ग्रंथकाराची परीक्षा झाली पाहिजे. तुम्ही पदवीधर नाहीं, तुम्हांला इंग्रजी र, ट, फ, सुद्धां करितां येत नाहीं. तुम्ही प्रसिद्ध ग्रंथकार नाहीं, वगैरे वगैरे कारणांकरितां तुमच्यातर्फे मीं महाराष्ट्र वाचकांपुढें वकिली करावी अशी तुमची इच्छा आहे. वकिलीच करायची तर ती मला चांगली करितां येईल! यजमानपत्नीकडून भरपूर दान घेतांना उभा असणारा भटजीचा दांडा स्वपत्नीच्या आग्रहाकरितां तेंच धान्य स्वतः दुसऱ्यास दान देण्याचा प्रसंग आल्यास जसा आडवा होऊं शकतो तसेंच वकिलांचें 'आर्ग्युमेंट'हि दुतोंडी असूं शकतें! तुम्ही 'पदवीधर' नसलां तरी 'विद्याधर' आहांत, एखादा पदवी विहीन परंतु सुविद्य ग्रंथकार पदवीधर ग्रंथकारापेक्षांहि जास्त चांगलें लिहूं शकेल.

इंग्रजी भाषेचा गंध नसतांहि 'अयेषा,' 'राजर्षि,' 'विभा' वगैरे प्रसिद्ध बंगाली कादंबरींना 'हिंदी'च्या मध्यस्थीनें तुम्हीं महाराष्ट्रीय मोहक पोषाख चढविलेला आहे, तेव्हां ग्रंथकार म्हणून तुमची योग्यता कमी नाहीं, असें मला तुमच्यातर्फे महाराष्ट्रवाचकांना सांगतां येईल. पण ही वकीली पाहिजे कशाला ? वाङ्मयाच्या दरबारांत वकिलामार्फत काम करून घेणें म्हणजे टेलिफोननें विवाहविधि उरकून घेण्याइतकेंच हास्यास्पद आहे ! मी तर तुम्हाला असें म्हणेन कीं तुम्ही पदवीधर नसला तर पदवीधर व्हा, अजून तुम्ही इतके तरुण आहांत कीं, कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं आपल्या उतार वयांत इंग्रजी शिक्षणास आरंभ करून मोठमोठ्या पदवीधरांनाहि लाजविलें. हा दृष्टांत तुम्हाला देण्याची अवश्यकताच नाहीं; इंग्रजीच काय पण दुसऱ्याहि अनेक भाषांचें ज्ञान संपादन करून मराठी वाङ्मयांत उत्तमोत्तम ग्रंथांची भर टाकण्याची महत्वाकांक्षा तुम्हीं बाळगली पाहिजे.

तुम्ही चांगले ग्रंथकार असा किंवा नसा, पण ज्या आपलेपणाच्या भावनेनें, स्वकर्तव्याच्या जाणिवेनें तुम्हीं हल्लींचें पुस्तक लिहिलें आहे त्याबद्दल मात्र तुमचें अभिनंदन केलें पाहिजे. यापेक्षां कोणत्या जास्त चांगल्या मार्गानें तुम्ही आपल्या जन्मभूमीचे उतराई होऊं शकला असतां ? पाश्चात्य संस्कृतीच्या संसर्गानें जवळ जवळ पूर्ण विदेशी बनलेल्या सर सत्य प्रसन्न सिंहांनासुद्धां बादशहाच्या दरबारांत सरदारकीचीं वस्त्रें घेतांना आपल्या जन्मभूमीचीच आठवण झाली. इंग्लंडांतील, साम्राज्यांतील किंवा खास हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि विशाल, भाग्यशाली किंवा रमणीय शहराकडे ढुंकूनहि न पहातां त्यांनीं आपली दृष्टि रायपुराकडे-आपल्या जन्मभूमीच्या खेडेगांवाकडे-वळवली व 'लॉर्ड सिंह ऑफ् रायपूर' हेंच उपपद मोठ्या प्रेमानें धारण केलें ! आपली जन्मभूमि मग ती कितीहि अप्रसिद्ध किंवा क्षुल्लक असो तिच्याबद्दल प्रेम, आदर किंवा भक्ति असणें हा मनुष्यस्वभाव आहे. परतु तें प्रेम किंवा तो आदर लॉर्ड सिंहांनीं किंवा तुम्हीं ज्या रीतीनें व्यक्त केला आहे तसें करण्याचें भाग्य सर्वांनाच

लाभत असें नाहीं. लॉर्ड सिंहांची आणि तुमची तुलना? 'छे! भलतेंच कांहीं तरी' असे सहज उद्गार तुमच्यासुद्धां तोंडांतून बाहेर पडतील. कोठें 'लॉर्ड सिंह ऑफ् रायपूर' आणि कोठें तुळजापूरचे दत्तोपंत कुळकर्णी! होय, खरें आहे, अगदीं खरें आहे. पण हें जितकें खरें आहे तितकेंच हेंहि खरें आहे कीं, कोठें सिंहाचें रायपूर, आणि कोठें तुमचें तुळजापूर! 'कहां राजा भोज और कहां गंगा तेली?' सिंहामुळें रायपूर रायपूरमुळें सिंह नव्हे. कागदी घोडे नाचवण्यापुरताच ज्या स्वराज्याचा तूर्त उपयोग होणार आहे त्या स्वराज्याच्या एका अष्टमांश हिस्स्याचा दानविधि होत असतांना मॉंटेग्यु साहेबांच्या हाताला ज्यांचा नुसता अंगुलीस्पर्श झाला त्या लॉर्ड सिंहामुळें जर रायपूरला महत्व येऊं शकतें तर ज्या तुळजापूरच्या अधिष्ठात्री देवतेच्या प्रेरणेमुळें शिवाजी महाराजांना महाराष्ट्रांत पूर्ण स्वराज्य स्थापन करितां आलें त्या तुळजापूरचें महत्त्व किती असूं शकेल? तुळजापूरचें खरें महत्त्व याच एका गोष्टींत आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिवाजी महाराज यांच्या अद्भुत चरित्रांत असा कोणता महत्त्वाचा प्रसंग आहे कीं, ज्या वेळीं महाराजांनीं देवीचा 'सल्ला' घेतला नाहीं किंवा देवीनेंहि त्यांना योग्य ती प्रेरणा केली नहीं? शिवाजी महाराजांच्या अंगांत देवी संचार करीत असे किंवा वारंवार त्यांना देवीचे दृष्टांत होत असत, या प्रसंगाचीं रसभरित वर्णनें बखरकारांनीं केलीं आहेत, तीं वाचतांना अत्यंत गोड वाटतात. प्रसंगाच्या अद्भुत रमणीयतेमुळें, विशेषतः स्वराज्याविषयीं मनुष्याच्या मनांत साहजिक असलेल्या प्रेमामुळें तीं रसभरित वर्णनें वाचीत असतांना मनाला एक प्रकारचा उल्हास येतो. पण त्या गोष्टी शब्दशः खऱ्या मानण्याकडे चिकित्सक बुद्धीच्या मनुष्यास जरा संकोच वाटतो हेंहि खरें आहे, परंतु त्या चिकित्सक बुद्धीनेंहि या गोष्टीकडे आपल्याला पहातां येणार नाहीं असें नाहीं.

मनुष्य प्राणी हा जात्याच भावनाप्रधान असतो. त्याचा हिशोबीपणा हा गणिताच्या अभ्यासानें पुढें त्याच्या अंगीं आलेला असतो. परंतु तो

कितीहि मोठा गणीती बनलेला असला तरी मूळ भावनामय असणारा त्याचा स्वभाव अजीबात कधींच नाहींसा होत नाहीं. परमेश्वराचें अस्तित्वहि न मानणारे नास्तिक शिरोमणी किंवा त्याच्या विषयीं अज्ञान दाखवणारे अज्ञेयवादी पूर्वकालीन इतिहासाला, ऐतिहासिक पुरुषांना किंवा स्थलांना देवापेक्षांहि जास्त पूज्य मानतात, असेंहि आपल्या पुष्कळ वेळां दृष्टीस पडतें. याचें कारण मनुष्याचा भावनामय स्वभाव हेंच होय. व याच भावनेच्या जोरावर मनुष्य वाटेल तें कार्य करण्यास प्रवृत्त होतो. नेल्सनला मरून शेंकडों वर्षें झालीं. पुनर्जन्म न मानणाऱ्या ख्रिश्चन लोकांच्या दृष्टीनें तो पुनः दुसऱ्या एखाद्या रूपानें जन्मास येणेंहि शक्य नाहीं असें असूनहि इंग्लंडच्या आजिंक्य समजल्या जाणाऱ्या आरमारावरील प्रत्येक दर्यावर्दी ॲडमिरल आपल्या सर्व शिपायांना नेल्सनच्या नांवाचा जयघोष करण्यास शिकवीत असतो, तें काय तो जयघोष—ती हांक ऐकून प्रत्यक्ष नेल्सन किंवा त्याचा आत्मा त्या ठिकाणीं हजर होईल अशा कल्पनेनें कां तो शिकवतो? प्रत्यक्ष लढाईच्या वेळेस नेल्सनहि तेथें येत नाहीं व नेल्सनचा आत्माहि येत नाहीं. पण नेल्सनच्या नांवाचा जयघोष करून जिवावर उदार होऊन लढणाऱ्या शिपायाच्या भावनामय अंतःकरणावर त्या कल्पनेचा परिणाम झाल्याशिवाय राहात नाहीं व अशा भावनेनें लढणारे शिपाईच शेवटीं देशाची अब्रू राखीत असतात. मार्न नदीच्या तीरावर किंवा व्हर्डून येथें सांडलेलें रक्त आतांच वाळून गेलें असेल पण आणखी शंभर वर्षांनींसुद्धां त्या रक्ताची—आपल्या पूर्वजांनीं सांडलेल्या रक्ताची आठवण इंग्लिश व फ्रेंच शिपायांना होऊन त्यांचा लढाई करण्याचा उत्साह दुणावेल यांत काय संशय आहे ? व्हर्डूनची अचेतन भूमि असो किंवा नेल्सनचा सचेतन आत्मा असो, मनुष्याच्या अंतःकरणांतील भावना प्रज्वलित करण्यास दोन्हीचाहि सारखाच उपयोग होतो; कारण मनुष्य भावनाशील आहे. या दृष्टीनें विचार केला असतां शिवाजी महाराजांच्या अद्भुत वाटणाऱ्या गोष्टी केवळ अशक्य कोटींतल्याच आहेत

असें आपल्याला वाटणार नाहीं—हिंदूंचा होत असलेला छळ व हिंदु-धर्माची झालेली अवनति यांमुळें ज्यांचें अंतःकरण तिळतिळ तुटत होतें, ह्या स्थितींत कांहीं तरी क्रांति घडवून आणण्याबद्दल ज्यांना रात्रंदिवस सारखी तळमळ लागली होती, हें महत्कार्य तडीस नेण्याइतकें सामर्थ्य आणि बुद्धिकौशल्य ज्यांना लाभलें होतें, त्रिपुरसुंदरी, महिषासुरमर्दिनी, आदिमाया, जगन्माता—दुष्टांचें निर्मूलन करण्याकरितांच जिचा अवतार, ती आपली कुलस्वामिनी तुळजाभवानी हिचा पूर्ण आशीर्वाद हातीं घेतलेल्या आपल्या धर्मकार्यास असलाच पाहिजे अशी ज्यांची अंतःकरणपूर्वक भावना होती, त्या शिवाजी महाराजांनीं संकटप्रसंगीं चार तऱ्हेच्या चार मन-सुब्यांनीं भांबावून गेलेल्या मनाला शांत करण्याकरितां एकांत स्थळीं जाऊन तेथें एकाग्र चित्तानें व पूर्ण निष्ठेनें देवीची आराधना करून आलेल्या संकटाचा विचार करावा व त्या प्रसंगीं सुचलेली युक्ति देवीच्या कृपाप्रसादानें सुचली. किंबहुना देवीच आपल्या मुखावाटे ते शब्द बोल-वीत आहे अशी त्यांची भावना व्हावी हें अगदीं साहजिक आहे. अद्भुत पराक्रमानें व अद्वितीय बुद्धिचातुर्यानें हर प्रसंगांतून पार पडणाऱ्या महा-पुरुषाच्या डोक्यावर देवीचा वरदहस्त असलाच पाहिजे, अशी कल्पना महाराजांच्या अनुयायांचीच काय पण महाराष्ट्रांतील सर्वच लोकांची त्या वेळीं झालेली होती व या भावनेमुळेंच स्वराज्य स्थापनेचें महत्कार्य शिवाजी महाराजांच्या व त्यांच्या अनुयायांच्या हातून घडून आलें. नुसत्या भावनेनें स्वराज्य स्थापनाच काय पण कोणतेंहि कार्य घडून येत नाहीं. ते कार्य घडवून आणण्याकरितां लागणारें सामर्थ्य व बुद्धिकौशल्य मनुष्याचे अंगांत असलेंच पाहिजे पण त्याच बरोबर ईश्वरी प्रेरणेची किंवा ईश्वरी साह्याची पूर्ण भावना अंतःकरणांत असेल तर तेंच सामर्थ्य दुपटीनें वाढतें. अशा रीतीनें महाराष्ट्रांत स्वराज्यस्थापनेच्या कार्यांत जिची प्रेरणा व जिचें साह्य कारणीभूत झालें ती श्री तुळजाभवानी महाराष्ट्राची कुल-स्वामिनी झाली यांत नवल काय ? धार्मिकदृष्ट्या तुळजापुर क्षेत्राचें महत्व

कमी आहे असें मी म्हणत नाहीं पण ह्या क्षेत्राला जें एक प्रकारचें वैशिष्ट्य आलेलें आहे तें वरील कारणाकरितांच होय. मराठी साम्राज्याचा इतिहास वाचणारा असा कोणता महाराष्ट्र वाचक असेल कीं ज्याची दृष्टि तुळजापुर क्षेत्राकडे अभिमानानें वळणार नाहीं ? तेव्हां अखिल महाराष्ट्राला प्रिय असणाऱ्या त्या क्षेत्राचें वर्णन करणाऱ्या तुमच्या पुस्तकाला **ओळख कशाला ?**

हिंदुस्थानांत देवीच्या पूजेचें माहात्म्य कसें व केव्हांपासून वाढले, त्यांतून शाक्त मार्गाची उत्पत्ति कशी झाली याबद्दलच्या विवरणाचें एखादें प्रकरण तुम्हीं घातलें असते तर तुमच्या पुस्तकाला आणखी एका निराळ्या प्रकारचें वैशिष्ट्य आलें असतें. वेदांत देवीचा उल्लेख कोठेंच आढळून येत नाहीं. माझी कल्पना अशी आहे कीं सांख्यांच्या 'प्रकृति–पुरुष' ह्या जोडीपैकीं 'प्रकृती'चेंच रूपांतर पुढें देवींत झालेलें असावें. 'पुरुष' हा केवळ निमित्त कारण असून सृष्टीची उत्पत्ति आणि तिचें चालकत्व प्रकृतीकडेच आहे, हा सांख्यांचा सिद्धांत असल्यामुळें प्रकृतींतून रूपांतर पावलेली देवीहि साहजिकच जगन्माता बनून तिच्या हातीं जगत्सूत्रचालकत्व आलें. प्रकृतीचें वैशिष्ट्य अजीबात काढून टाकून तिला केवळ 'माया' बनविणाऱ्या वेदांताचा परिणामहि या कल्पनेवर होऊन ती जगन्माता पुढें आदिमायाहि बनली–सांख्यांची 'प्रकृति' आणि वेदांताची 'माया' या दोन्हींचा अंतर्भाव देवीच्या स्वरूपांत होत गेला. ब्रह्माचे खालीं एक पायरी उतरल्यानंतर 'परमेश्वर' म्हणून ब्रह्माचे जें स्वरूप दृष्टीस पडतें त्या परमेश्वराची जी 'शक्ति' त्या शक्तीलाहि देवीचेंच स्वरूप आलें व तीच शक्ति किंवा देवी पौराणिक काळच्या शंकराची पत्नी पार्वती आणि त्या पार्वतीचीं निरनिराळीं रूपांतरें—म्हणजेच कलकत्त्याची कालिका, तुळजापुरची भवानी आणि वणीची सप्तशृंगी. परमेश्वराच्या शक्तीचा उपयोग सज्जनांचें परिपालन आणि दुष्टांचें शासन या दोन्ही कार्यांकडे होत असतो पण दुष्टांचें शासन ही गोष्ट मनाला साहजिकच जास्त प्रिय वाटत

असल्यामुळें परमेश्वराच्या त्या शक्तीचें—त्या देवीचें—संहारक स्वरूपच भक्तांना जास्त प्रिय व जास्त मनोहर वाटणें साहजिक आहे. देवी ही युद्धाची देवताच समजली जाते व त्याचमुळें तिच्या पूजेंतही बळी देण्यासारखे भीषण प्रकार सुरू झाले असावेत व याच कल्पनेंतून शाक्त मार्गाचीहि उत्पत्ति झाली असावी. शक्तीचा उपासक तो शाक्त, शक्ति म्हणजे युद्ध देवता, आणि युद्ध म्हणजे मूर्तिमंत उन्माद. मग तो उन्माद रणांगणावर जाऊन उत्पन्न होण्यासारखा नसेल तर स्त्री, मद्य आणि मांस यांच्या यथेच्छ सेवनानें देवीच्या मूर्तीला साक्ष ठेवून घरींच उत्पन्न करावयाचा, हाच खरा शाक्त मार्ग ठरला ! देवीच्या नांवाखालीं असला हिडिस अनाचार करणाऱ्या 'शाक्त गधड्या'ला पाहून तुकारामासारख्या सत्वशील साधूलाहि संताप आल्याशिवाय राहिला नाहीं यांत काय आश्चर्य आहे ? त्या देवीला—युद्धदेवतेला प्रसन्न करून घेऊन स्वराज्याचा बावटा रोंवणारे कोठें ते शिवाजी महाराज आणि आपल्या नीतिभ्रष्टतेचें निशाण फडकवणारा कोठें हा 'शाक्त गधडा'! असलेच 'दिवटे' हिंदुधर्माचें स्वरूप विकृत करण्याला कारणीभूत होत असतात. देवी म्हणजे जर परमेश्वराची शक्ति, आदिमाया भवानी तर तिनें आपल्या मूर्तीपुढें असा अनाचार कां चालूं द्यावा ? किंवा स्वतःची मूर्ति जात्यांत घालून भरडूं कां द्यावी ? असा प्रश्न कांहीं लोक विचारतील. परंतु अशा लोकांना मूर्तिपूजेचें खरें महत्वच समजलें नाहीं असें म्हणावें लागेल. मूर्तिपूजा हीहि मनुष्याच्या भावनाशील स्वभावामुळेंच जगांत अस्तित्वांत आलेली आहे—मूर्ति म्हटली कीं त्यांत देवपणा आला असें थोडेंच आहे ! तसें असतें तर कासाराच्या दुकानांत विक्रीकरितां इतस्ततः पडलेल्या असंख्य मूर्तींमुळें त्याचें तें दुकान देवांचें देऊळच बनलें असतें ! कितीहि अडाणी मनुष्य असला तरी तोहि दुकानांतल्या मूर्तीला देव म्हणणार नाहीं, देवतेची प्राणप्रतिष्ठा केल्यानंतर त्या दगडाच्या किंवा धातूच्या मूर्तींत देवपणा प्रवेश करीत असतो अशीच मूर्तिपूजेसंबंधानें साधारण समजूत आहे. पण हीहि समजूत

माझ्या कल्पनेप्रमाणें तितकी बरोबर नाहीं. देवतेची प्राणप्रतिष्ठा आपण त्या दगडाच्या, धातूच्या किंवा मातीच्या मूर्तीत करीत नसून आपल्या स्वतःच्या अंतःकरणांत करीत असतों.

मूर्ति ही फक्त ज्या देवतेची प्राणप्रतिष्ठा आपण आपल्या अंतःकरणांत करितों त्या देवतेचा दृश्य देखावा आहे व मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेचा बाह्य-विधीहि अंतःकरणांत सांठवलेल्या देवतेकरितांच वस्तुतः असतो. मूर्तीचें सौंदर्य, देवालयाचा विशिष्ट आकार, पूजेचीं सुगंधित द्रव्यें, ह्या केवळ बाह्योपाधि आहेत. मन सुप्रसन्न होऊन अंतःकरणांत दैविक-भावना उत्पन्न करण्याला ह्या बाह्योपाधि बऱ्याच अंशीं कारणीभूत असतात. हेंच मूर्ति-पूजेचें खरें रहस्य आहे. भक्तांच्या अंतःकाणांतील दैविक भावनेमुळेंच मूर्ति अस्तित्वांत आलेल्या असतात व त्याच भावनेमुळें त्यांना पुढें स्थान-महात्म्यहि आलेलें असतें. भक्तांच्या अंतःकरणाव्यतिरिक्त नुसत्या मूर्तीत जर देवपणा असता तर काशीविश्वेश्वराला औरंगजेबाच्या भीतीमुळें विहिरींत दडून बसण्याचा प्रसंग आला नसता व तुळजापुरच्या भवानीच्या मूर्तीला जात्यांत घालून भरडण्याची आफझुलखानाचीहि छाती झाली नसती. हिंदुस्थानांत अशी कोणत्या प्रसिद्ध देवतेची मूर्ति आढळेल कीं, जिच्यावर असला दुर्धर प्रसंग मुळींच कधीं ओढवला नाहीं? मूर्ति अस्तित्वांत येणें, त्यांचें माहात्म्य वाढणें, सरंक्षण होणें, या गोष्टी भक्तांच्या अंतः-करणांतील पवित्र भावनेवर व त्यांच्या अंगीं असलेल्या सामर्थ्यावर अव-लंबून असतात. मूर्तिपूजेविषयीं भलतीच भावना धरल्यामुळें त्या देवतेची आपल्या हातून एकप्रकारें विटंबना होते व याच भलत्या समजुतीमुळें मुसलमानांनाहि हिंदूंच्या मूर्ति फोडण्यांत धन्यता वाटत असे! मूर्ति फोड-ण्याचा प्रकार ह्मणजे धर्मवेडामुळें उत्पन्न झालेला एक प्रकारचा आततायी-पणाच होता. मूर्ति फोडली ह्मणजे जणूं काय त्या मूर्तीतली देवता जगां-तून अजिबात नाहींशीच होत होती! ती देवता मूर्तीत नसून त्या मूर्तीला भजणाऱ्या भक्तांच्या अंतःकरणांत असते. पण हें तत्व न समजल्यामुळें

एके वेळीं या मूर्ति फोडण्याच्या विध्वंसक कार्याला इतिहासांत फारच महत्त्व आलें होतें. सुदैवानें त्या प्रश्नाला आतां केवळ ऐतिहासिक स्वरूपच आलेलें आहे. हल्लींचा काळ हिंदुमुसलमानांच्या एकीचा आहे. खिलाफतीच्या प्रश्नांत हिंदूंनीं मुसलमानांना मनःपूर्वक मदत केल्यामुळें त्या उपकारांची फेड म्हणून मुसलमानांनीं धार्मिकदृष्ट्या जरूर असणारा गोवधहि हिंदूंच्या मनाला दुखवूं नये म्हणून अजिबात बंद करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें त्यांच्या पुढाऱ्यांनीं आणि धर्मगुरुंनीं शपथा घेतल्या. तेव्हां आतां मूर्ति फोडण्याच्या त्या ऐतिहासिक कालाकडे स्मित वदन करून नुसती दृष्टि फेंकण्यापेक्षां दुसरा कोणताहि विचार त्यासंबंधानें मनांत येऊं शकत नाहीं. देवालयें भ्रष्ट करणें किंवा मूर्ति फोडणें हा प्रकार केवळ धर्मवेडामुळेंच होत होता असें नाहीं. त्याला स्वार्थ आणि राजकारण याहि गोष्टी पुष्कळ प्रसंगीं कारणीभूत झाल्या आहेत. मूर्तींत किंवा मूर्तींच्या अंगावर असणाऱ्या जवाहिराच्या लोभानेंहि मूर्ति छिन्नविच्छिन्न केल्या गेल्या आहेत आणि या महत्कार्यास कांहीं 'हिंदुचोरांचे'हि हात लागलेले आहेत. पंढरपुरच्या विठोबाच्या अंगावरचे दागिने काढून नेणारा चोर खात्रीनें मुसलमान नव्हता आणि देवीच्या नाकांतली नथ जबरदस्तीनें ओढून घेऊन देवीचें नाक तोडणारा शूर चोरहि 'हिंदुच' होता! निंबाळकरांचें घराणें म्हणजे तुळजापुरच्या देवीचें अत्यंत अभिमानी; परंतु त्यांच्याचपैकीं एका शूर पुरुषानें देवीचें देऊळ लुटलें होतें! त्याचप्रमाणें आपला प्रतिस्पर्धी आचार्यांच्या मठांत लपला असल्यामुळें दक्षिण महाराष्ट्रांतील एका ब्राह्मण संस्थानिकानें शंकराचार्यांच्या मठावर तोफा डागून मठ उध्वस्त करून टाकला होता! हीं उदाहरणें जोंपर्यंत इतिहासांत आहेत तोंपर्यंत मुसलमानांच्या धर्मवेडाच्या आततायीपणामुळेंच देवालयें भ्रष्ट होत किंवा मूर्ति फोडल्या जात असत हें म्हणणें केवळ सत्य ठरणार नाहीं.

मूर्तिपूजेविषयीं भलतीच कल्पना केल्यामुळें मुसलमानांच्या हातून मूर्ति फोडण्याचा आततायीपणा झाला. पण तसल्याच प्रकारच्या कांहीं विचित्र

कल्पनेनें हिंदुधर्मियांकडूनहि नवसाच्या कामीं आततायीपणा होऊन देवतेची विटंबना होते, हें आपण विसरतों. नवस करणारालाहि मूर्तिपूजेचें खरें रहस्य समजलें नाहीं असें म्हणावें लागतें. नवसाला व्यापारी कराराचें स्वरूप देऊन तुम्ही पुस्तकाच्या १५व्या प्रकरणांत नवसाचें समर्थन करण्याचा जो यत्न केला आहे व नवसाला धुडकावून देणाऱ्या साधुसंताच्या अंगावरहि जातां जातां जो शिंतोडा उडविला आहे तो मात्र अत्यंत हास्यास्पद आहे. नवसाचें इतकें विचित्र समर्थन आजपर्यंत कोणीहि केलें नसेल ! नवसाची उत्पत्ति देवभोळेपणांत व देवाविषयीं वाटणाऱ्या भीतींत आहे. ही कल्पना नाहींशी होण्यास कितीतरी कालावधि लागेल. तेव्हां इतक्यांतच घाबरून जाण्याचें कांहीं कारण नाहीं ! जोंपर्यंत रावबहादुर मुधोळकरांसारखीं विद्वान् माणसें सुद्धां देवीला केलेला नवस फेडण्याकरितां मुलाची मुंज तुळजापुरास जाऊन करीत आहेत तोंपर्यंत नवसाच्या खुळाला उतरती कळा लागत चाललेली आहे असें सुद्धां म्हणतां येणार नाहीं ! तेव्हां नवसाचें एवढें विचित्र समर्थन करण्याचा अट्टाहास कशाला ? देवीला केलेल्या करारमदाराच्या फेडीकरितां यात्रेकऱ्यांनीं तुळजापुरास यावें, ही किती विचित्र व हलक्या दर्जाची कल्पना आहे ! तुळजापुर ही पुण्यभूमि आहे, जगन्माता–आदिमाया–भवानी, परमात्म्याची शक्ति, युद्धाची देवता, शिवाजी महाराजांना साह्य करणारी जगदंबा व अखिल महाराष्ट्राची कुलस्वामिनी हिचें वास्तव्य जेथें आहे त्या पुण्यभूमीचें नुसतें दर्शनहि यात्रेकऱ्यांना पावन करूं शकेल. देवभोळे यात्रेकरी नवस फेडण्याकरितां यापुढेंहि तुळजापुरास येतील. पण तुळजापुर क्षेत्राचें खरें महत्व नवसांत किंवा नवसाच्या फेडींत नाहीं !

तुमचें नवसाचें समर्थन कितीहि विचित्र असो, पण तुम्ही आपल्या पुस्तकांत देवीच्या नवसासंबंधानें जी खुलासेवार माहिती दिली आहे ती मात्र एखाद्या इतिहाससंशोधकाला शोभण्यासारखी आहे. त्याशिवाय देवीसंबंधानें किंवा तुळजापुर क्षेत्रासंबंधानें जी तपशीलवार जुनी माहिती

दिली आहे तीहि अप्रतिम असून ऐतिहासिकदृष्ट्या तिचें फारच महत्व आहे. त्या माहितीवर ठिकठिकाणीं तुम्ही आपल्या पसंती ना पसंतीचा जो शिक्का मारला आहे तो मारला नसता तर ती माहिती केवळ ऐतिहासिक स्वरूपाचीच राहिली असती; व तो भाग तसाच पुण्याच्या भारत-इतिहाससंशोधक मंडळाकडे तुम्हांला पाठवतां आला असता. पूर्वी एकदां मी तुम्हांला तशी सूचना केली होती. परंतु त्यावेळीं तुम्हांला इतिहाससंशोधक मंडळाची भीति वाटली. बड्या बड्या मंडळींत तुमची कोण दाद घेणार ? ही तुमची भीति माझ्या समजुतीनें निराधार होती. जोंपर्यंत इतिहाससंशोधक मंडळांत सरदार मेहेंदळे, दत्तोपंत पोतदार, पांडुरंग नरसिंह पटवर्धन आणि राजवाडे यांच्यासारखी मंडळी आहेत तोंपर्यंत तेथें बडा, छोटा किंवा शिफारशीचें तट्टू असला भेदभाव केव्हांहि केला जाणार नाहीं. कित्येक वेळां एखाद्या गोष्टीला भलतेंच महत्व देण्यांत येतें, व त्याच्याकरितां शेकडों पृष्ठें निरर्थक खर्ची पडतात, जुन्या दप्तरांतल्या गोष्टी झाल्या म्हणजे त्या सर्वच कांहीं ऐतिहासिक महत्वाच्या नसतात; हें खरें आहे पण मला वाटतें यांत शिफारशीचा किंवा भिडेचा कांहीं संबंध नसतो—तितका बारकाईनें त्याचा कोणी विचार करीत नाहीं, इतकेंच कायतें, असो. तुम्ही जमा केलेली माहिती इतिहास-संशोधक मंडळाकडे न पाठविली तरी त्यांतली बरीचशी या पुस्तकांत आलेली आहे. इतिहास-संशोधक मंडळ काय त्या माहितीकरितां तुमच्या पुस्तकाचाच उपयोग करून घेईल. त्याचप्रमाणें तुमच्या पुस्तकाचा उपयोग अस्पृश्य वर्गाकरितां अहर्निश टाहो फोडणाऱ्या विठ्ठल रामजी शिंद्यांनाहि पुष्कळसा होईल. महाराष्ट्रांतील एका प्रमुख क्षेत्रांतील देवालयांत महार, मांग, चांभार यांची सर्वांची सोय लावून दिलेली पाहून, विशेषतः मातंग कुंडांत स्नान करून महार पुजारी असणाऱ्या मातंगीचें पूजन ब्राह्मण यात्रेकरीहि करीत असतो हें वाचून शिंद्यांच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहिल्याशिवाय राहणार नाहींत !

आणखी एक ऐतिहासिक स्वरूपाचा वाद तुम्हीं उपस्थित करून त्यावर बरेंच पांडित्य लढवलें आहे. उलट सुलट प्रमाणांचा विचार करून तुम्हीं असें ठरविलें आहे कीं अफजुलखानानें देवीची मूर्ति फोडली नसून त्याच्या भयानें पुजाऱ्यांनींच ती पळवून नेऊन लपवून ठेवली होती! देवीच्या मूर्तीला अभंग ठेवण्याची तुम्हीं एवढी तसदी घेतली नसती तरी चाललें असतें! मूर्ति फोडली काय किंवा लपवून ठेवली काय पुजाऱ्यांच्या नामुष्कीच्या दृष्टीनें दोन्हींची किंमत सारखीच. पण त्यांतल्या त्यांत असें म्हणतां येईल कीं मूर्तीला घेऊन पळून जाण्याचा भित्रेपणा दाखविण्यापेक्षां मूर्तीचें संरक्षण करीत असतांना अफजुलखानाच्या तरवारीला बळी पडणारे पुजारीच जास्त श्रेष्ठ! मला तर वाटतें कीं मूर्ति फोडल्याबद्दलची कृष्णाजी अनंत सभासद यांच्या बखरींतली हकीकतच खरी असावी. त्या गोष्टीला दुसऱ्याहि एका दंतकथेचा आधार आहे. फोडलेल्या मूर्तीचीं शकलें प्रतापगडास नेऊन तेथेंच श्री तुळजाभवानीचें पीठ स्थापन करावें असा शिवाजी महाराजांचा संकल्प होता. पण स्थानमाहात्म्याचें वैशिष्ट्य रामदासांनीं त्यांच्या मनावर बिंबवल्यामुळें तो विचार बदलून नवीन मूर्तीची स्थापना करून तुळजापुरचें आदिपीठ त्यांनीं कायम ठेवलें व फोडलेल्या मूर्तीचीं शकलें तेथेंच ब्रह्मकूपांत ठेवून दिलीं. देवालयांतील पिंपळाच्या पाराच्या अग्नेयी कोंपऱ्याला हात लावून ज्या जागेचें दर्शन घेतात तेथें पूर्वीची नरबली घेणारी देवीची मूर्ति आहे असें मानतात असें ब्रह्मकूपाचें वर्णन देतांना तुम्हीं म्हटलें आहे. पण ती नरबली घेणारी देवीची मूर्ति नसून अफझुलखानानें फोडलेल्या देवीचीं शकलेंच तेथें ठेवलेलीं असावींत व याचकरितां देवीचें दर्शन घेण्यापूर्वीं प्रथम त्या जागेला वंदन करण्याचा परिपाठ पडलेला असावा.

या ऐतिहासिक संशोधनाच्या कामांत फार खोल पाण्यांत शिरण्यांत अर्थ नसतो. साधारण सारासार विचार करूनच निर्णय ठरवावा लागतो. नाहीं तर शब्दांची व्युत्पत्ति लावणारे व्युत्पत्तिशास्त्रज्ञ व जुन्या इतिहासाचें

संशोधन करणारे इतिहाससंशोधक यांच्या कल्पनेचें तारू एकदां कां भडकलें म्हणजे तें कुठें जाऊन आदळेल याचा भरंवसा नाहीं ! वाजंत्र्याच्या 'ताशा'वरून 'बत्ताशा'ची व्युत्पत्ति लावणारे व्युत्पत्तिपंडित आणि 'फारशी तवारिखे'च्या आधारें संभाजीच्या बायकोला व्यभिचारी ठरविणारे यदुनाथ सरकार या दोघांचीहि योग्यता सारखीच ! या स्वारींची घमंड इतकीच कीं, आपल्याला फारशी भाषा येते व त्या लिपींतले जुने ग्रंथ लावतां येतात ! जणूं काय फारशी भाषा म्हणजे असत्याला सत्य ठरविण्याचा पासपोर्टच आहे ! 'ऐतिहासिक सत्या'चे हे आंबटशोकी घमेंडानंदन जुन्या कागदावर जुन्या लिपींत लिहिलेल्या माहितीच्या आधारें जुन्यापुराण्या 'झोंपडी'लाहि 'राजवाडा' बनवूं शकतील. शिवाजीनें अफझुलखानाचा 'खून' केला कीं 'वध' केला हा वाद आतां निकालांत निघालेला असून किंकेडसाहेबांनीं त्यावर मारलेल्या शिक्कामोर्तबानें तर ती गोष्ट आतां 'सेटल्ड् फॅक्ट' या सदरांत गेली आहे. तरी पण शिवाजी हा एक साधारण माणूस होता, त्याच्या अंगीं अद्वितीय असें कांहींच नव्हतें हें सिद्ध करण्यास अट्टाहास करणारा यदुनाथ सरकारासारखा एखादा आचरट इतिहाससंशोधक अफझुलखानाच्या वधासंबंधीं शिवाजी महाराजांस झालेल्या देवीच्या दृष्टांताचे जुन्या बखरींतले जे उतारे तुम्ही आपल्या पुस्तकांत दिले आहेत त्यावरून शिवाजी महाराजांना पुन्हां 'खुनी' ठरविण्याचा प्रयत्न न करो म्हणजे झालें ! बखरींतल्या कोणत्या माहितीला केवळ सत्य मानावयाचें, कोणती माहिती कोणत्या अर्थानें घ्यावयाची ही गोष्ट तारतम्य बुद्धीनें सारासार विचार करूनच ठरविली पाहिजे. उतारे देण्यापलीकडे या भानगडींत तुम्ही पडलां नाहीं हें एका दृष्टीनें उत्तम आहे.

झालें, आतां यापेक्षां आणखी कांहीं जास्त लिहावें असें मला वाटत नाहीं. नाहीं तर 'मिया मूठभर आणि दाढी हातभर' असा प्रकार व्हावयाचा !

मुंबई, ता १५ फेब्रुवारी सन १९२०.

दत्तो अप्पाजी तुळजापुरकर.

# अभिप्रायः।

महाराष्ट्रभाषयानेकक्षेत्रमाहात्म्यानि तत्र तत्रत्यविद्वज्जनैः सुष्ठुतया वर्णितानि प्रकाशितानि च। परं त्वद्यापि श्रीक्षेत्रतुरजापूरमाहात्म्यं महाराष्ट्रभाषया यात्राविधिपूर्वकं सविस्तरं केनापि न प्रकाशितम्। तदेवेदानीं 'श्रीदत्तात्रय-माधवराव कुलकर्णी जोशी धर्माधिकारी'नामधेयैः श्रीक्षेत्रनिवासिभिः सर्वेषां ग्रामस्थानां सविनयमाभिप्रायमङ्गीकृत्य प्रयत्नं कृत्वा शके १८४१ सिद्धार्थिनामसंवत्सरे मिति श्रावणशुद्ध-पञ्चम्यां प्रकाशितम्। एतत्कर्म महत् प्रशंसनीयं। तेन सर्वेषां भक्तजनानां यात्राविधिः साङ्गो भवेत्। तेन श्रीतुरजापुरनिवासिनी-जगदम्बाप्रसादः सर्वसंपत्प्रवर्धको भवेदिति निश्चीयते।

जयरायाचार्यशास्त्री

श्रीक्षेत्रतुरजापुरम्।

# भारत इतिहास-संशोधक मंडळाचे चिटणिसांचा अभिप्राय.

रा. दत्तोपंत कुळकर्णी यांणीं " महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्रीतुळजाभवानी " हा ग्रंथ फार परिश्रम करून बऱ्याच बिकट परिस्थितींत तयार करून प्रसिद्ध केला. ही गोष्ट कौतुक करण्यालायक आहे. या प्रयत्नाचें फळ यांस दोन रीतींनें लाभणार हें निश्चित एक तर ते आपल्या कुलस्वामिनीच्या ऋणांतून यथाशक्ति मोकळे झाले व दुसरें, इतर अशा महाराष्ट्रीय पूज्यस्थानांविषयीं या नमुन्याप्रमाणें संग्रहात्मक माहितीचीं उपयुक्त पुस्तकें तयार करण्याबद्दल सात्त्विक श्रद्धाळू भक्तांस स्फूर्तिदायक उदाहरण घालून दिलें.

रा. तुळजापूरकर यांच्या मार्मिक व चर्चात्मक प्रस्तावनेनें हा ग्रंथ भूषित झाल्यामुळें ग्रंथांत समाविष्ट केलेल्या विविध माहितीवरून जरूर उद्भूत होणारे प्रश्नांचा ग्रथित झालेला समर्पक खल विशेष मननीय आहे हें नमूद केलेंच पाहिजे. माझी खात्री आहे कीं, महाराष्ट्र रा. कुळकर्णी यांच्या परिश्रमाचें चीज करील व त्यांस त्यांच्या ग्रंथाची द्वितीयावृत्ति लवकरच तयार करण्याचा सुप्रसंग घडवून आणील. तसेंच मजसारख्या इतिहास व लौकिक-सारस्वत ( Folklore )प्रेमी गृहस्थास उत्कट आशा आहे कीं, रा. कुळकर्णी हे मनःस्वास्थ्य व दमदार उमेद बाळगून हा ग्रंथ अद्याप संग्रह न करतां आलेल्या जुन्या कागदपत्रांनीं व (स्कंदपुराणान्तर्गत) तुळजामहात्म्य इत्यादि सामग्रीनें नीट सजवून श्रीतुळभवानीची सेवा करण्यास अविलंबें सज्य होतील.

आप्पा बळवंताचा वाडा, पुणें.<br>
मि. फाल्गुन शु. ६ बुधवार,<br>
शके १८४१.

खंडेराव चिंतामण मेहेंदळे.

महाराष्ट्राची कुलस्वामिनी



श्रीतुळजाभवानी !

# महाराष्ट्राची कुलस्वामिनी—
# श्री तुळजाभवानी.

## देवीस्तवनम्.

नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः ॥ नमः प्रकृत्यै भद्रायै नियताः प्रणताः स्म ताम् ॥ १ ॥ देवीं वाचमजनयन्त देवास्तां विश्वरूपाः पशवो वदान्ति ॥ सा नो मन्द्रेषमूर्जं दुहाना धेनुर्वागस्मानुपसुष्टु तैतु ॥ २ ॥ नमो विराट्स्वरूपिण्यै नमः सूत्रात्ममूर्तये ॥ नमो व्याकृतरूपिण्यै नमः श्रीब्रह्म मूर्तये ॥३॥ यदज्ञानाज्जगद्भाति रज्जुसर्पस्रगादिवत् ॥ यज्ज्ञानाल्लयमाप्नोति नुमस्तां भुवनेश्वरीम् ॥ ४ ॥ नुमस्तत्पदलक्ष्यार्थां चिदेकरसरूपिणीम् ॥ अखंडानंदरूपां तां देवतात्पर्यभूमिकाम् ॥ ५ ॥ पंचकोशातिरिक्तां तामवस्थात्रयसाक्षिणीम् ॥ . पुनस्त्वंपदलक्ष्यार्थां प्रत्यगात्मस्वरूपिणिम् ॥ ६ ॥ नमः प्रणवरूपायै नमो ह्रींकारमूर्तये ॥ नानामंत्रात्मिकायै ते करुणायै नमो नमः ॥ ७ ॥

---

## अथ श्रीतुरजासहस्रनामप्रारंभः

श्रीगणेशायनमः श्रीदेवीतुरजा समर्थास्ति.

श्रीदेव्युवाचः—

देवदेव महादेव भक्तानुग्रहकारक ॥ तुरजाकवचं ब्रूहि मम प्रीत्या महेश्वर ॥ १ ॥

श्री ईश्वर उवाचः—

श्रुणु देवि प्रवक्ष्यामि गुह्याद्गुह्यतरं महत् ॥ तुरजाकवचं दिव्यं दुर्लभं यत्सुरैरपि ॥ २ ॥

गुरुभक्ताय दातव्यं नदेयं यस्यकस्यचित् ॥ ॐ अस्य श्री तुरजाकवचस्तोत्रमंत्रस्य ॥ श्रीरामचंद्र ऋषिः । अनुष्टुप् छंदः ॥ श्रीतुरजांबा देवता ॥ ऐं बीजं। सोः शक्तिः ॥ क्लीं कीलकं ॥ श्री तुरजासहस्रनामजपफलसिध्यर्थमादौ कवचजपे विनियोगः ॥

श्री शंकर उवाचः—

तुरजा मे शिरः पातु भालं तु परमेश्वरी ॥ नेत्रे नारायणी रक्षेत्कर्णमूले तु शांकरी ॥ ३ ॥ मुखं पातु महामाया कंठं भुवनसुंदरी ॥ द्वौ बाहू विश्वमाता च हृदयं शिववल्लभा ॥ ४ ॥ नाभिं कुंडलिनी पातु जानुनी जान्हवी तथा ॥ पादयोः पापनाशी च पादाग्रे सर्वतीर्थभृत् ॥५॥ इंद्राणी पातुमां पूर्वे आग्नेयामग्निदेवता ॥ दक्षिणे नारसिंही च नैऋत्यां खड्गधारिणी ॥ ६ ॥ पश्चिमे पातु वाराही वायव्यां वायुरूपिणी ॥ उदीच्यां पाशहस्ता च ईशान्यामीश्वरी तथा ॥ ७ ॥ ऊर्ध्वे ब्रह्माणि मे रक्षेदधस्ताद्वैष्णवी तथा ॥ एवं दशदिशो रक्षेत्सर्वांगे भुवनेश्वरी ॥ ८ ॥ इतीदं कथितं देवीकवचं सर्वसिद्धिदं ॥ यत्र यत्र न वक्तव्यं यइच्छेदात्मनो हितं ॥ ९ ॥ शठाय भक्तिहीनाय विष्णुद्वेषाय कुत्रचित् ॥ शिष्याय भक्तियुक्ताय साधकाय प्रकाशयेत् ॥ १० ॥ दद्यात्कवचमित्युक्तं तत्पुण्यं श्रुणु पार्वति ॥ अश्वमेध सहस्राणि कन्याकोटिशतानि च ॥११॥ गवां लक्षसहस्राणि तत्पुण्यं लभते नरः ॥ अष्टम्यां च चतुर्दश्यां नवम्यां चैकचेतसा ॥१२॥ सर्वपापविशुद्धात्मा विष्णुलोकं सनातनं ॥ वने रणे महाघोरे भयवादे महाहवे ॥ १३ ॥ यः पठेत्कवचं देवि सर्वविघ्ननिवारणम् ॥ भौमवारे पठेद्यस्तु कवचं सर्वसिद्धिदं ॥ १४ ॥ सर्वबाधाप्रशमनं रहस्यं सर्वदेहिकं ॥ भूतप्रेतहरं नित्यं ग्रहपीडास्तथै वच ॥ १५ ॥ सर्वपापहरं देवि अंते सायुज्यमाप्नुयात् ॥ १६ ॥

इति श्रीस्कंदपुराणे सह्याद्रिखंडे तुरजामहात्म्ये शंकरवरिष्ठसंवादे तुरजाकवचं संपूर्णं ॥

---

## अथ तुरजाष्टकप्रारंभः

अनुभूतिरुवाचः--

नमस्तुभ्यं जगद्धात्र्यै शिवायै सततं नमः ॥ त्वरितायै तुरजायै महोग्रायै नमोस्तुते ॥ १ ॥ सत्वायै सत्वरूपायै मोहिन्यै ते नमो नमः ॥ नमो जगत्प्रतिष्ठायै जगत्प्राणभृते नमः ॥ २ ॥ षट्चक्रभेदकायै ते षट्चक्रायै नमोस्तुते ॥ कुंडलिन्यै नमस्तुभ्यं बीजायै ते नमोनमः ॥३॥ पद्म किंजल्कवर्णायै हरितायै नमोस्तुते ॥ मंत्रमार्गप्रवर्तिन्यै घटस्थायै नमो नमः ॥ ४ ॥ पद्मप्रबोधकारिण्यै पद्मस्थायै नमोस्तुते ॥ कृष्णायै कृष्णवर्णायै धूम्रायै सततं नमः ॥ ५॥ श्वेतायै श्वेतरूपायै लोहितायै नमोस्तुते ॥ नीलायै कपिलायै ते कर्पूरायै नमो नमः ॥ ६ ॥ अतिसौम्यातिरौद्रायै शर्वाण्यै ते नमोस्तुते ॥ स्थूलायै सूक्ष्मरूपायै मध्यमायै नमोनमः ॥ ७ ॥ कनिष्ठायै जघन्यायै उत्तमायै नमोस्तुते ॥ बहिरंतस्थितायै ते व्यापकायै नमो नमः ॥ ८ ॥ इति स्तुत्वानुभूतिःस्तां त्वरितां पुरतस्थितां ॥ ययाचे तद्वधायाशु वरं दैत्य-भयावह ॥ ९ ॥ त्वरितोवाच ॥ ममाष्टकं पठेद्यस्तु त्वत्कृतं द्विजवल्लभे ॥ शृणोति वा मनुष्यो हि मम साम्यं स गच्छति ॥ १० ॥

भुक्त्वा भोगान् यथाकामान् पुत्रपौत्रसमान्वितः ॥ विद्यावान् कुलसंपन्नः सुखी सौख्यान् प्रपद्यते ॥ दीर्घायुष्यं च लभते नात्र कार्या विचारणा ॥

इति अनुभूतिकृतं तुरजाष्टकं संपूर्ण ॥

---

## अथ तुरजास्तवराजप्रारंभः

श्री रामचंद्र उवाचः—

नमामि त्वरितां देवी सुंदरां सुभगां शुभां ॥ नानारूपधरां भिल्लीं सर्व-प्राणिहिते रतां ॥ १ ॥ षट्चक्रपत्रनिलयां सहस्रारिलयां परां ॥ नागरूपां कुंडलिनीमंबां देवीं नमाम्यहं ॥ २ ॥ सोहंमंत्रमयां धीरामजपाजपरूपिणीं ॥ सर्वबीजमयां शक्तिमंबां देवीं नमाम्यहं ॥ ३ ॥ ऐं बीजां वाग्भवां वाणीं वागगोचरमंडलां ॥ वाचस्पतिनुतां शक्तिमंबां देवीं नमाम्यहं ॥ ४ ॥ क्लीं

कामबीजज्वलनां चातुर्वर्ण्यकृतालयां ॥ कामैः काल्पितकंदर्पामंबा देवीं नमाम्यहं ॥ ५ ॥ सौं सर्वसिद्धिंजननीं सकलागमसेवितां ॥ सामीप्यदायिनीं शक्तिमंबां देवीं नमाम्यहं ॥ ६ ॥ नवाक्षरपरां शांतां षोडशाक्षरसंयुतां ॥ द्विपंचाशन्मातृरूपामंबां देवीं नमाम्यहं ॥ ७ ॥ कल्पातीतां विष्णुमायां विंदुनादकृतालयां ॥ षट्कोणमध्यमध्यस्थामंबा देवीं नमाम्यहं ॥८॥ वर्तुलां भैरवयुतामष्टवर्णैश्च युग्मकां ॥ शूलवर्गाष्टकयुतामंबां देवीं नमाम्यहं ॥ ९ ॥ चक्रराजमयीं मंत्रां सर्वचक्रनिषेवितां ॥ वेदाक्षरनुतां नीलांमंबां देवीं नमाम्यहं ॥ १० ॥ सतस्वरैर्गीयमानां मूर्छाग्रामैर्निषेवितां ॥ तालनाट्यकृताल्हादामंबां देवीं नमाम्यहं ॥ ११ ॥ रजोरूपमयीं कालीं कालनिद्राप्रवर्तिनीं ॥ विष्णुनेत्रास्यनिलयामंबां देवीं नमाम्यहं ॥ १२ ॥ सत्वस्थां सत्वसंपन्नां सर्वलोकमनोरमां ॥ लक्ष्मीं कमलहस्तां तामंबां देवीं नमाम्यहं ॥१३॥ तमस्वरूपां कालीं च सर्वकार्यनिवासिनीं ॥ कलाकाष्ठादिकलनामबां देवीं नमाम्यहं ॥ १४ ॥ अणुरूपां बालरूपां दीर्घरूपां कृशांगिकां ॥ स्थूलस्वरूपामपरामंबां देवीं नमाम्यहं ॥ १५ ॥ यमुनाद्रिकृतावासां योगिनीवृंदसेवितां ॥ भक्ताल्हादकरीं शक्तिमंबां देवीं नमाम्यहं ॥ १६ ॥

श्रीशंकर उवाचः—

एवं स्तुत्वा रामचंद्रः पूजयामास तां शिवां ॥ नमभिस्तु सहस्रैः सा लक्ष्मणेनापि वंदिता ॥ १७ ॥

इति श्रीस्कंदपुराणे सह्याद्रिखंडे तुरजामहात्म्ये शंकर-
वारिष्ठसंवादे तुरजास्तवराजः संपूर्णः ॥

---

## अथ तुरजास्तुति.

देवा ऊचुः—

नमो नमस्तेस्तु च त्र्यंबके शिवे त्रैलोक्यसत्राणकृतावतारे ॥ त्रिविष्टपेरर्चितपादपीठे विधातृवेदाद्युपगीयमाने ॥ १ ॥ गुणैस्त्रिभिर्लोहितशुक्लकृष्णे

उत्पत्तिसंस्थांप्रलयान्करोषि ॥ त्वमेवचाद्यां प्रकृतिं पुराणां ॥ त्वमस्य विश्वस्य परं निधानं ॥२॥ भूतेंद्रियार्थास्त्रिविधाश्च लोके यागादिकर्मेंद्रियवृत्तयश्च ॥ प्राणा मनो बुद्धिरहंकृतिश्च प्रज्ञा स्मृतिर्मोहविचेतने च ॥ ३ ॥ कोशाश्च चक्राणि च वायुमार्गा ये धातवः सप्तविधाश्च मातः ॥ परस्परं हेतव एव देहे त्वयानुवृत्तिर्गमिताश्चतुर्विधा ॥ ४ ॥ त्वं वै प्रसन्ना भुवि मुक्तिहेतुः त्वया जगत्सर्वमिदं विराजते ॥ त्वया विना किंचन नास्ति मातस्त्वं मुक्तिदात्री परमा मुनीनां ॥ ५ ॥ स्पृष्टं त्वया यच्छुचितां लभेत त्यक्तं त्वया यद्यशुचीह मातः ॥ त्वया विना नास्ति शरीरभाजां संवित्प्रदात्री गुणवृत्तियोगात्॥६॥ पूर्वं त्वया यत्परिपालितं जगद्धत्वाऽसुरान् शुंभनिशुंभमुख्यान् ॥ इंद्रादयः स्वर्गपदे नियुक्तास्त्वमेव माता जगतोऽखिलस्य ॥ ७ ॥

श्रीशंकर उवाचः—

इति स्तुत्वा भगवतीं तुरजां सिंहवाहिनीं ॥ पारिजातयुतैः पुष्पैः पूजयामासुरादरात् ॥ ८ ॥

इति श्रीस्कंदपुराणे सह्याद्रिखंडे तुरजामहात्म्ये शंकरवसिष्ठ-
संवादे देवकृता तुरजास्तुतिः संपूर्णा ॥
श्रीजगदंबार्पणमस्तु ॥

---

## अथ तुरजासहस्रनामस्तोत्रम्.

ॐ त्वरितायैनमः ॥ अद्यपूर्वोच्चरित० मम समस्तकामनासिध्यर्थं तुरजासहस्रनामस्तोत्र जप विनियोगः ॥

वसिष्ठ उवाचः—

पुजाऱ्यानें सकाळपासून देवीचे जवळ उभें राहावें. देवीचे दर्शनास जे कोणी येतील त्यांना श्रीचरण दाखवून श्रीचरणांवरील कुंकूं दर्शन करणाराच्या कपाळास लावावें. श्रीपुढें कोणीं कांहीं आणून ठेविलें तर त्यास 'देवीला पोंचलें' म्हणून सांगावें. आशिर्वाद द्यावा. कोणीं पादपूजा केल्यास त्याच्या ओट्या भराव्या. देवीची पूजा करण्यास सोंवळें होऊन यावें, प्रथम निर्माल्य विसर्जन करावें. म्हणजे देवीचे अंगावरील वस्त्र काढावें. देवीच्या अंगावरील गंध, विड्याचीं पानें व फुलांचे हार गळ्यांतून काढावेत. दागदागिने काढून जामदाराच्या स्वाधीन करावेत. गंध, पानें व हार आपल्या पाटीवाल्याजवळ द्यावेत. पूजा चालू असतां देवीच्या अंगाला मध, केळीं, साखर, लावणें; दहीं घालणें, देवीस शुद्ध स्नान घालून दह्या-दुधाचा प्रसाद लोकांना देणें; श्रीदेवीस गंध, विड्याचीं पानें लावणें, वस्त्र नेसविणें, फुलांचे हार घालणें, धूप, दीप, नैवेद्य दाखविणें; श्रीदेवीस पंचामृतस्नान घालणाऱ्या मंडळीच्या ओट्या भरणें; धुपारति घेऊन देवळांतील इतर देवतांना धूप दाखविणें, लोकांच्या कपाळीं अंगारा लावणें, देवीच्या दर्शनास अस्तमानपर्यंत जे जे लोक येतील त्यांना श्रीचरण दाखवून त्यांच्या कपाळीं श्रीचरणांवरील कुंकूं लावणें, ओंटीभरणें असतील तर ओट्या भरणें, देवीला लोक नैवेद्य आणतील ते दाखविणें, यानंतर अस्तमानच्या पूजेच्या वेळीं दिवसाच्या पूजेप्रमाणचें हीं सर्व कामें करणें. नंतर प्रक्षालनपूजेच्या वेळीं देवीच्या अंगावरील दागदागिने वगैरे सर्व समजावून देऊन देवी बजाजीबुवाच्या स्वाधीन करणें व देवालयाचे बाहेर येणें. याप्रमाणें ही पुजाऱ्यांच्या नित्यकृत्यांची यादी आहे. या-

शिवाय देवी ज्या दिवशीं उठते त्या दिवशीं एकंदर पुजारी लोकांच्या आरत्या देवालयांत येतात. पहिल्यानें सरकारची आरती देवीस दाखविण्यांत येते. व नंतर पुजाऱ्यांच्या आरत्या देवीस दाखविण्यांत येतात. यानंतर बलिदान होतें. खाटीक लोकांचा म्हेत्र्या बळी देण्यास बकरें घेऊन येतो. तें बकरें मुलाणी कापतो. त्याचें रक्त देवीच्या पायांस पुजाऱ्यानें लावावें. नंतर श्रीदेवीस उठवून पलंगावर निजवावें. तेथेंही दररोज पूजा करावी. श्रीदेवीचे अंगास दहींदुधाऐवजीं सुगंधी तेल मर्दन करावें. यानंतर पलंगावरून श्रीदेवीस उठवून सिंहासनावर बसवावें. सरकारची आरती झाल्यावर आपल्या आरत्या ओंवाळाव्या. याप्रमाणें पूजारी मंडळीकडे कामें आहेत. *

बजाजीबुवा यांच्याकडे पुढील कामें आहेत—

प्रातःकाळीं देवालयाच्या कवाडास घातलेलीं कुलुपें उघडून देवालयांत जाऊन चरणतीर्थ करणें, श्रीजगदंबेस दागदागिन्यांसह पुजाऱ्यांच्या स्वाधीन करणें, यानंतर पुजारी पूजा करण्यास आल्यावर देवीच्या स्नानास लागेल तें पाणी देणें, बजाजीबुवा यांनीं पहिल्यानें गुंडी भरून पुजारी यांचे हातांत द्यावी व बजाजीबुवा व पुजारी यांनीं मिळून श्रीचे चरणांवर पाणी घालावें. नंतर पुजारी यानें देवीस ती गुंडी घालावी. यानंतर दुसरी गुंडी भरून बजाजीबुवा यांनीं श्रीदेवीवर ओतावी. यानंतर जितकें पाणी लागेल तितकें द्यावें. याचप्रमाणें अस्तमानाच्या पूजेच्या वेळींही करावें.

देवीच्या नंदादीपाची व्यवस्था ठेवणें. देवालयांतील दिव्यांमधून वरचेवर तेल घालणें, रात्रीं प्रक्षालनपूजा करणें, व त्या वेळीं श्रीदेवीस जितके

---

* पुजारीपणाच्या हक्कदारीबद्दल दिवाणी कोर्टांत हल्लीं दावे चालू आहेत. त्यांचा निकाल झाल्यावर त्या निकालाप्रमाणें खुलासेवार माहिती पुढच्या आवृत्तींत देण्याचा योग येईल अशी आम्हांला आशा आहे.

नैवेद्य येतील तितके दाखविणें, दर्शन करणाऱ्या लोकांच्या कपाळास श्रीदेवीचे चरणावरील कुंकू लावणें, श्रीजगदंबेस धुपारती करून व काकड-आरती व कर्पूरारती केल्यानंतर देवालयाला कुलुपें घालून धुपारती घेऊन बाहेर येणें, इत्यादि कामें यांच्याकडे आहेत. श्रीदेवीचे देवालयाचीं बाहेरील कवाडें बंद करून कुलुपें घालणें व किल्ल्या आपलेजवळ ठेवून देवळांत आपले ओवरीस राहणें. याप्रमाणें व्यवस्थेचें मुख्य जबाबदारीचें काम या बुवांकडेच आहे.

याशिवाय यांच्याकडील कामाचे सात पोटहिस्सेदार आहेत. ते छत्रे, अबदागिरवाला, पलंगे, पंखेवाला, तेलकाढी, पाणीवाला व झाडपिडे हे होत.

श्रीचे देवालयांत चिलोजीबुवा यांच्याकडे पुढील कामें आहेतः–देवीचे जामदारखान्यांतील एकंदर दागदागिने, वस्त्रें, रोकड हीं सर्व चिलोजी-बुवांकडे असून यांचे याशिवायच्या कामासाठीं सात पोटहिस्सेदार आहेत. तेः–पोहेकरी, फुलारी, श्रीखंडे, मळेकरी, जामदार, पंचारतीवाला, करंडी-वाला हे होत. बजाजीबुवा आणि चिलोजीबुवा यांचे हिस्सेदार लोक जर वेळेवर काम न करतील तर त्या कामाची जिम्मेदारी या दोन्ही बुवांकडे आहे.

छत्रे आणि अबदागिरवाला एकच इसम आहे. श्रीदेवीची पूजा झाल्यानंतर पूजारी धूपारती घेऊन इतर देवतांची पूजा करीत फिरते वेळीं पुजाऱ्यावर अबदागिर धरण्याचें काम याच्याकडे आहे. आश्विन आणि कार्तिक मासीं नवरात्रामध्यें पुजारी जेव्हां धुपारती घेऊन फिरतो, तेव्हां छत्री आणि अबदागिरी घेऊन त्याचे बरोबर या छत्र्यास फिरावें लागतें. छबिन्याचे वेळीं दोन अबदागीर घेऊन यास छबिन्यावरोबर फिरावें लागतें.

पलंगे आणि पंखेवाला हीं दोन्ही कामें पलंगे म्हणून इसम आहे त्याचेच जिम्मेस आहेत. याच्याकडे देवीच्या पलंगाची व्यवस्था ठेवणें,

पूजेचे वेळीं हजर राहून पंखा आणि चवरी पुजाऱ्याचे हातीं देणें, पुजारी धुपारती घेऊन निघाल्या वेळीं हातीं मोरचेल घेऊन त्याच्या बरोबर फिरणें, हीं कामें आहेत.

तेलकाढी हा वाकोजीबुवाचा खासगीपैकीं एखादा गडी असतो. याच्याकडे श्रीदेवीच्या दोन्ही पूजांच्या वेळेस जितकें पाणी लागेल तितकें पुरवणें, देवळांत सर्व ठिकाणीं दिवे लावणें हीं कामें असतात.

झाडपिडे याच्याकडे कल्लोळ तीर्थापासून तों पश्चिमेकडील दरवाजाच्या खालच्या शेवटच्या पायरीपर्यंत सकाळीं झाडण्याचें काम आहे. याशिवाय तारतखानाही स्वच्छ ठेवणें याचेचकडे आहे. याशिवाय देवालयाचे इमारतीस व कल्होळ, मंकावती, घाटशीळ, पापनाशी, या ठिकाणच्या दगडी इमारतींवर झाडेंझुडपें उठतात तीं तोडून काढणें, श्रीभवानीच्या होमाघुढें कोणी नवसाचीं बकरीं कापतात त्या ठिकाणीं रक्त वगैरे पडून जागा खराब होते ती जागा तात्काळ स्वच्छ करणें, हीं कामें आहेत. हीं कामें मौजीनाथबुवा गोसावी यांच्याकडे असून झाडपिडे हा त्यांचा नोकर असतो.

मळेकरी, करंडीवाला, पंचारतीवाला आणि जामदार या चार इसमांबद्दल कामें करण्यास एकच इसम चिलोजीबुवांकडून नोकर आहे. याच्याकडे देवीच्या पूजेचें साहित्य म्हणजे पुष्प, धूप, दीप, वगैरे सर्व तयार करून ठेवणें, श्रीदेवीस पूजेकरितां हाक मारणें, पुजाऱ्याबरोबर हजर राहून देवालयांत पूजेचे वेळीं पुजारी जीं वस्त्रें व दागदागिने देईल ते नीट व्यवस्थेनें ठेवणें, नंतर श्रीस शुद्ध स्नान घातल्यावर वस्त्रें नेसविण्यास पुजाऱ्यास मदत करणें, दागदागिने, हारतुरे वगैरे घालण्यास मदत करणें, पानांचा मुकुट तयार करून आणून पुजाऱ्याजवळ देणें, देवीस लावण्यासाठीं गंधाक्षता तयार करून पुजाऱ्यास देणें, धुपारती तयार करून पुजाऱ्याजवळ देणें, पुजारी यांनीं धुपारती केल्यानंतर त्याच्या बरोबर पाणी व गंधाची पंचारती घेऊन फिरावयास हजर राहणें, याप्रमाणें दोन्ही वेळच्या पूजेच्या वेळीं अगदीं सारखीं कामें आहेत.

श्रीदेवीस पूजेच्या वेळीं पिण्यास पाणी देण्यास उभें राहण्याचें काम पोहेकरी याच्याकडे आहे.

श्रीखंडे याच्याकडे श्रीदेवीस गंधलेपनासाठीं गंध उगाळून जामदाराजवळ देण्याचें काम आहे.

श्रीदेवीच्या सिंहासनावर प्रभावळ लावण्यासाठीं कोणीं सांगितली असल्यास ती तयार करण्याचें काम 'फुलारी' याच्याकडे आहे. प्रभावळ रात्रीच्या पूजेनंतर प्रक्षालनपूजेच्या पूर्वी बसवितात.

हवलदार यांच्याकडे पुढील कामें आहेतः—दररोज ज्या पुजाऱ्याची पूजा करण्याची पाळी असेल त्या पुजाऱ्यास हांक मारणें. देवीच्या पूजेच्या वेळीं हजर राहून जे जे यात्रेकरू पंचामृतस्नान घालणारे असतील त्यांची व्यवस्था ठेवणें, श्रीदेवीस ज्या ज्या वेळीं आरत्या करण्याचें ठरलेलें असेल त्या त्या वेळीं पुजारी लोकांच्या घरीं कळविणें, छबीना उठविणाऱ्या अधिकाऱ्यास त्याचा अधिकार सांगणें, इत्यादि.

चोपदार याच्याकडे पुढील कामें आहेतः——दोन्ही पूजेच्या वेळीं हजर राहून पुजाऱ्यास पाय धुण्यास पाणी देणें, पुजारी याचे पुढें राहून देवालयांत जाणें, देवीची पूजा चालली असतांना दारांत चांदीची काठी घेऊन उभें राहणें व तेथें गर्दी, गडबड वगैरे न होऊं देणें, धुपारती घेऊन पुजारी देवालयांत फिरतो त्या वेळीं त्याच्या बरोबर फिरणें, इत्यादि.

देवालयांत जें उत्पन्न येईल त्याचा हिशेब ठेवण्याचें काम देवीचे 'पेशवे' यांचेकडे आहे.

गोंधळ्याकडे देवालयांत पुढील कामें आहेतः——दोन्ही पूजांच्या वेळीं हजर राहून संबळ वाजविणें, धुपारतीच्या पुढें संबळ वाजवीत फिरणें, छबिन्याच्या पुढें संबळ वाजविणें, यात्रेकरू अथवा गांवांतील कोणी गोंधळ घालणार असेल तर त्याच्या इच्छेप्रमाणें गोंधळ घालणें, इत्यादि.

दिवटे याच्याकडे दोन्ही पूजांच्या वेळीं दिवटी लावून देवळांत उभें राहणें आणि धुपारतीबरोबर दिवटी लावून फिरणें, हीं कामें आहेत.

नाडापुडे याच्याकडे कोणीं फुलांचें घर सांगितलें असल्यास तयार करून बांधणें आणि मागितल्यास नाडापुडी विकत देणें, हीं कामें आहेत.

पूजेच्या वेळची माहिती सांगावयाच्या पूर्वी ही माहिती सांगण्याचा आमचा हेतु एवढाच आहे कीं, वाचकांनीं माहिती घेतांना गोंधळून जाऊं नये. यांतील कित्येक इसमांचीं नांवें अशीं आहेत कीं, त्यांच्या नांवावरून त्यांच्याकडे असलेल्या कामाचा बोध होत नाहीं. म्हणून ही माहिती मुद्दाम करून दिली आहे.

---

## प्रकरण ९ वें.

—:o:—

यात्रेकरू तुळजापुरास येऊन पोंहोंचला, त्याची उतरण्याची वगैरे व्यवस्था झाली म्हणजे पुरोहित त्यास श्रीदेवीसंबंधीं काय काय नवस केले आहेत ते विचारतात. या नवसांचे प्रकार अनेक आहेत. बहुतकरून नवस हा करणाराच्या इच्छेवर अवलंबून असतो. श्रीभवानीसंबंधाचे पुढील नवस बहुतकरून करण्याचा प्रचार आहे.

१ भोगी २ ओंटीभरण ३ जावळ काढणें ४ दंडवत ५ लोटांगण ६ भद ७ लिंब नेसणें ८ माळ परडी ९ पोत १० पानांची प्रभावळ ११ फुलांचें घर १२ कुंकवाचा सडा १३ सुपवान १४ गोप्रदान १५ वेणीदान १६ मूल वाहणें १७ मूल उतरणें १८ पाळणाखेळणा बांधणें १९ घोडा वाहणें २० डोळेटिळे वाहणें २१ कोंबडें उतरणें २२ होमांत बकरें टाकणें २३ अंडीं उतरून टाकणें २४ अन्न उतरून टाकणें २५ खणानारळांनीं ओंटी भरणें.

याशिवायही पुष्कळ वेगवेगळ्या प्रकारचे नवस असतात. यात्रेकरूंनीं ज्या प्रकारचे नवस केले असतील त्यांची सांगता करण्यासाठीं पुरोहित त्यांस आगाऊ विचारून घेतात आणि त्यांच्या सांगतेच्या सामानासह यात्रेकरूला देवालयांत नेतात. यांत भोगी म्हणजे पंचामृतस्नान व वस्त्र

नेसविणें व खणानारळांनीं ओंटी भरणें, हा मुख्य नवस आहे. या नवसांत बहुतेक पूजेची सर्व सांगता होत असल्यामुळें हाच नवस केलेली पुष्कळ मंडळी असते. पंचामृतस्नानासाठीं पूजेच्या वेळेची वाट पहात बसावें लागतें.

सातव्या प्रकरणाच्या अखेरीस पूजेसाठीं देवीस जामदारानें हांक मारीपर्यंतची हकीकत आली आहे. जामदार पूजेसाठीं श्रीला हांक मारून जामदारखान्यांत परत जातो. पुजारी याच ठिकाणीं सोंवळें नेसून तयार होतो. नंतर चोपदार, पुजारी, पुजाऱ्याचा निर्माल्य घेऊन जाणारा पाटीवाला, व जामदार, असे चौघे मिळून मंदिरांत येतात. पुजारी मुख्य मंदिरांत शिरतांच बाहेरील सभामंडपांत गोंधळी संबळ वाजविण्यास सुरुवात करितो. जामदारानें आपल्याबरोबर पंचारती, दागिने घालून नेण्यास डबा व करंडी, कुंचली वगैरे सामान आणिलेलें असतें. देवळांत गेल्याबरोबर जामदार पंचारती पेटवून पूजाऱ्याच्या हातीं देतो. पुजारी ती श्रीजगदंबेस ओंवाळितो. नंतर पुजारी श्रीच्या अंगावरील दागिने उतरावयास सुरुवात करितो. पहिल्यानें नेत्र काढिल्यावर मग बाकीचे दागिने एका मागून एक काढिले जातात. दागिने काढून पुजारी जामदारास समजावून देत असतो व जामदार आदल्या पुजेच्या वेळीं ते जसे दिले होते तसे आहेत कीं नाहींत हें पाहून घेतो. दागिने काढणें झाल्यावर जामदार आणि पुजारी मिळून श्रीच्या अंगावरील वस्त्रें उतरतात. तीं वस्त्रें आणि दागिने घेऊन जामदार जामदारखान्यामध्यें ठेवावयास जातो. नंतर चोपदार बजाजीबुवांना बोलावून आणितो. जामदार आणि बजाजीबुवा मिळून देवालयांत येतात. बजाजीबुवांनीं आपल्याबरोबर पाणीवाला इसम आणिलेला असतो. बजाजीबुवा प्रथम पाण्यानें चांदीची गुंडी भरून पुजाऱ्याचे हातांत देतात. तिच्यांतील उदक श्रीचे चरणांवर निर्माल्यविसर्जनाकरितां पुजारी आणि बुवा दोघे मिळून ओततात. नंतर दुसरी गुंडी पुजारी श्रीवर ओतितो.

याच वेळीं हवालदार व जामदार मिळून श्रीच्या सिंहासनावर सांचलेलें कुंकूं वगैरे काढितात. पुजारी कुंचलीनें श्रीच्या अंगावरील गंध काढितो. जामदार श्रीच्या पुढें ठेविलेल्या पितळेच्या पादुका उचलून आपल्या करंडींत ठेवितो. व यानंतर पंचामृतस्नानास सुरुवात होते.

पंचामृतस्नानास दहींच विशेष असतें. या वेळीं श्रीचे अंगास लिंबू, केळीं, साखर, मध इत्यादि लावितात. आणि दह्यादुधानें न्हाऊं घालितात. पंचामृतस्नानांत कित्येक भक्तांचा सिंहासन भरण्याचा नवस असतो. सिंहासन हें दूध, दहीं, श्रीखंड, शिकरण, अंब्याचा रस, यांपैकीं कोणत्याही एकाचें असतें. श्रीच्या अंगावरून पडणारें तीर्थ सिंहासनावर पडूं देऊन तें भरूं देतात. सिंहासन चार किंवा त्याहून कांहीं आधिक अंगुळें खोल आहे. श्रीच्या अंगावर पडणारें तीर्थ भरून न घेतां किंवा सिंहासनाच्या उत्तरबाजूस तीर्थ निघून जाण्यास गोमुख केलेलें आहे त्यांतून खालीं जाऊं न देतां तें तसेंच भरूं देतात. त्याची मर्यादा इतकी आहे कीं सिंहासन कांठोकांठ भरलें म्हणजे श्रीच्या अंगठ्यास तीर्थ लागतें. याप्रमाणें सिंहासन भरलें म्हणजे ज्याचा तो नवस असेल त्याच्याकडून त्याची पूजा करवितात व नंतर तीर्थ वांटण्यांत येतें. श्रीला पंचामृतस्नान घातलें म्हणजे ज्यांच्या ज्यांच्या भोग्या असतील त्यांना तीर्थ देतात. या वेळीं श्रीदेवीवर घालण्यास पुष्कळ लोकांनीं दहीं आणिलेलें असतें. पंचामृतस्नान घालणाराचें दहीं घालणें झाल्यावर इतर लोकांचें दहीं घालण्यांत येतें. दहीं आटोपल्यावर हातीं कुंचला घेऊन पुजारी श्रीस उजवें जातो. यास पुजारी 'उजवे गेला' असें म्हणतात. पुजारी 'उजवें गेल्यानंतर' दहींदूध घालण्यांत येत नाहीं. या वेळेस वजाजीबुवा श्रीच्या अंगावर गुंडीनें शीतोदक घालीत असून पुजारी कुंचलीनें श्रीच्या अंगावर दहीं वगैरे जें कांहीं बसलें असेल तें काढीत असतो. पुजारी अशा रीतीनें श्रीच्या अंगावरील बसलेलें द्रव्य काढीत काढीत फिरून आपल्या जाग्यावर येतो. बुवा पुन्हां त्याच्या हातीं पाण्यानें भरून गुंडी देतात. पुजारी

उजवी प्रदक्षिणा घालून आल्यावर जामदार पितळेच्या पादुका सिंहासनावर ठेवितो. नंतर पुन्हां पुजारी गुंडीनें श्रीवर शीतोदक ओतितो. याप्रमाणें मूर्ति चांगली स्वच्छ होईपर्यंत शीतोदक घालण्यांत येतें.

स्नान संपल्यावर पुजारी श्रीची मूर्ति पुसून काढितो. श्रीच्या मस्तकास पहिल्यानें हळद व नंतर कुंकू लावतात. हृदयावर बुक्का वाहण्यांत येतो. यानंतर हळदकुंकू श्रीचे पायांवर वाहतात. तें पुजारी प्रथम आपल्या मस्तकास लावितो व नंतर तेथें इतर जी मंडळी प्रथम उभी असते तिच्या कपाळीं लावितो. यानंतर श्रीस वस्त्र नेसविण्यास सुरुवात होते. जामदार आणि पुजारी मिळून श्रीस वस्त्र नेसवितात. पुजारी श्रीच्यापुढें व जामदार मागें उभा असतो. वस्त्र नेसविल्यानंतर श्रीचे भालप्रदेशावर चंदनाचा मळवट चढविला जातो. मळवटावर गंधाक्षता लावण्यांत येतात. श्रीच्या सहा भुजा उघड्या असतात. त्यांच्या बाजूचा भाग म्हणजे ज्या भागीं चंद्र, सूर्य वगैरे आहेत तो भागही उघडा असतो. यावर चंदनलेपन करून विड्याचीं पानें बसवितात. नंतर श्रीस मंगळसूत्र घालतात, मुकुट घालतात व अखेरीस नेत्र बसवून नाकांतील मोतीं घालतात. मोतीं घातल्यावर '**अटल बादशाह्की जय**' असें ह्मणून या वेळीं तेथें सर्व असलेली मंडळी श्रीचें दर्शन घेते.

## धुपारती.

यानंतर जामदार करंडी घेऊन जातो आणि जामदारखान्यामधून तो धूपारती पेटवून घेऊन येतो. धूपारती घेऊन मंदिरांत येत असतांना तो 'नगारा हो' अशी आरोळी देतो. त्याबरोबर महाद्वारांतील नगाऱ्यास सुरुवात होते. दिवटे आपली दिवटी पेटवून उभा राहतो. पलंगे मोरचेल व पंखा घेऊन येतो. पोवेकर पाणी घेऊन उभा राहतो आणि पाटीवाला पुजाऱ्याच्या घरून नैवेद्य घेऊन येतो.

जामदार धुपारती सिंहासनावर ठेवितो. हवलदार तिच्यावर ऊद घालून

फडकवितो. मंदिरांत उदाचा एकच घमघमाट सुटतो. पुजारी श्रीस पंचारती ओंवाळितो. भक्तगण मंदिरांत असलेल्या लहान लहान घंटा वाजवूं लागतात. या वेळेस त्या ठिकाणीं असलेली प्रत्येक व्यक्ति ब्रह्मानंदांत मग्न होते. पंचारती ओंवाळल्यानंतर नैवेद्य दाखविण्यांत येतो. त्या वेळीं सर्वजण जगदंबेची प्रार्थना करतात, ती अशीः—

जेवि सखे जननी अंबाबाई !
जेवि सखे जननी तुळजाबाई !। जेवि०॥ध्रु०॥
पोळी भात वडा, दधि पाश घृत
दूध साखर मिळुनी अंबाबाई !। जेवि० ॥१॥
कधिका शाका, आणि कोशिंबिरी
लावुनिया वदनीं अंबाबाई !। जेवि० ॥२॥
माधवसुत, शेष व अच्युत
देउनि पुरवी अंबाबाई !। जेवि० ॥३॥

पुजाऱ्याचा नैवेद्य दाखविल्यानंतर महाराजा कोल्हापूर व राजा चंदूलाल यांचे नैवेद्य दाखविले जातात. नंतर पिण्यास पाणी देण्यांत येतें. त्या वेळीं पुढील प्रार्थना करतातः—

उदक सेवी तुळजाराणी, अष्टभुजा त्रिभुवनी।
सर्वा जीवन कळा, विडा लावी सर्वा अर्थी॥
अंतःकरणी गंगाजळ, झारी भरोनि शीतळ।
भावार्थ सुगंध माळा, सुगंधाच्या तुळशीमाळा॥
सद्गुरू आदि नारायणी, पूर्णब्रह्म तूं रुक्मिणी।
आदिशक्ति अवताराची, सरस्वती रुळे चरणीं॥१॥

उदक दाखविल्यानंतर तें तीर्थ तेथें असणाऱ्या एकंदर मंडळींना देण्यांत येतें. नंतर श्रीस विडा देण्यांत येतो. या वेळीं पुढील प्रार्थना करण्यांत येतेः—

## विडा.

विडा घ्याहो अंबाबाई, आम्हा नाथाचे आई ।
लीन भक्त इच्छितासी, शेष प्रसाद देई ॥
वासना त्या ठेवी, पूजियेलें पूजे फळ ।
भावार्थ कापूर, लावियेला प्रेमळ ॥
शांति नागवेली, पान आणिलें भाळी ।
अहंकार जाळूनिया, चुना लाविला भाळीं ॥
दया शांति विडा लवंगा, आणियेल्या निर्मळ ।
बोद्ध आत्मसुखाचा, हेचि जाणावा निर्मळ ॥
विडा करी सुरंग, मातोश्री अंबाबाई । विडा० ॥१॥

विडा दिल्यावर कर्पूरारती पेटवून जामदार पुजाऱ्याजवळ देतो. पुजारी ती श्रीस ओंवाळतो. या वेळीं होत असलेला किणकिणकिण असा घंटा-रव आपल्या किणकिण शब्दानें सर्व मंदिर निनादित करतो. बाहेर नगाऱ्याची गर्जना चाललेली असते. तास मध्येंच खणखण असा वाजत असतो. संबळाचा कडकडाट होत असतो. थोरली मोठी घंटा मध्येंच घणघणघण अशी वाजत असते. याप्रमाणें वेगवेगळे नाद एकरूप होऊन त्या वेळीं तेथें जी एक तऱ्हेची तन्मयता उत्पन्न होते ती अपूर्व होय.

आरती झाल्यावर पलंगे चवरी व पंखा पुजाऱ्याजवळ देतो. पुजारी श्रीवर चवरी ढाळून नंतर पंख्यानें वारा घालतो. आरती चालली असतां जामदार पेटविलेली धुपारती विझवितो. ही विझविलेली धुपारती पंख्यानें श्रीस वारा घातल्यानंतर जामदार पुजाऱ्यापुढें ठेवतो. पुजारी ती देवीपुढें ठेवतो व आंतील अंगारा घेऊन श्रीस ओंवाळून व आपण स्वतः लावून घेतो व नंतर तेथें असलेल्या एकंदर मंडळीस लावितो.

याप्रमाणें धुपारती झाली म्हणजे दिवसाची मुख्य पूजा आटोपली. या नंतर पुजारी धुपारतीचें पात्र हातांत घेऊन देवालयांतील इतर देवतांच्या

पूजा करण्यासाठीं निघतो. पहिल्यानें श्रीसन्मुख असलेल्या भवानीशंकराची पूजा करून सभामंडपाच्या दक्षिणद्वारानें तो बाहेर निघतो. या वेळीं त्याचे बरोबर जामदार पाण्याची गुंडी व गंधाचें कचोळें घेऊन असतो. सर्वांच्या पुढें गोंधळी संबळ वाजवीत चाललेला असतो. त्याचे मागें चोपदारही बगलेंत काठी अडकविलेला असा असतो. त्याचे मागें दिवटी धरलेला दिवटे, त्याचे मागें चवरी घेऊन पलंगे आणि त्याचे मागें जामदार व पुजारी याप्रमाणें ही राजवैभवानें युक्त अशी पुजाऱ्याची स्वारी मोठ्या थाटानें देवालयांतील इतर देवतांची पूजा करण्यासाठीं निघते!

# प्रकरण १० वें.

श्रीला वस्त्रें नेसवून मळवट चढविल्यानंतर ज्या ज्या यात्रेकरूंच्या भोग्या असतील त्यांना हांक मारून त्यांचेकडून श्रीची ओंटी भरितात. नंतर तेंच सामान पुजारी यात्रेकरूंच्या ओंटींत प्रसाद म्हणून घालितात.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें पुजारी राजवैभवानें युक्त होत्साता पुढील देवतांची पूजा करीत निघतो..

१ येमाई २ नरसिंह ३ खंडोबा ४ पारावरील मारुती ५ होमकुंडामागील त्रिशूळ ६ होमकुंडावरील पादुका ७ टोळभैरव ८ काळभैरव ९ मातंगी १० नर्मदेश्वर ११ मारुती १२ दत्त १३ गणपती १४ गणेशकुंडावरील तुळसीवृंदावन १५ गायमुखांतील शंकर १६ गायमुखाच्या कोंपऱ्यांतील दैवत १७ विठ्ठल रखुमाई १८ कल्होळांतील शिवलिंग १९ नारदमुनी २० गणपतीच्या मागील शिवलिंग २१ अमृतेश्वर २२ उजव्या सोंडेचा गणपती २३ महाद्वारावरील गणपती २४ पिंपळाच्या पारावरील देवता २५ छत्र्याच्या ओवरींतील एक रिकामें सिंहासन २६ चिंतामणी २७ लक्ष्मीनारायण २८ काळंमा नांवाची जैन देवी.

याप्रमाणें देवतांच्या पूजा करून पुजारी जामदारखान्यांत येतो आणि धूपारती जामदाराच्या स्वाधीन करितो. दिवसाच्या मुख्य पूजेप्रमाणेंच रात्रीचीही मुख्य पूजा होते. महाद्वाराच्या बाहेरील देवतांची पूजा मात्र पुजारी रात्रीच्या पूजेचे वेळीं करीत नाहीं.

पुजारी धूपारती घेऊन बाहेर गेल्यानंतर रात्रीं भक्तजनांची कांहीं वेळ दर्शनें होतात. नंतर बजाजीबुवाचा तेलकाढी 'जिच्या हातीं दीप आहे अशी एक पितळेची पुतळी तूपवात दिव्यांत घालून घेऊन येतो व श्रीच्या सिंहासनावर ठेवितो. गाभाऱ्याच्या दाराशीं एक पडदा बांधितो. नंतर बजाजीबुवा हातीं गुंडी व आंचोळा घेऊन येतात. बुवांचा गडी खांद्यावर भरलेली पाण्याची घागर घेऊन त्यांच्या मागोमाग येतो. बुवा श्रीच्या मुख्य गाभाऱ्यांत उभे रहातात. कमाईषदार देवालयाचे बाहेर येतात. घागरवाला गाभाऱ्याचे बाहेर दारांत उभा राहतो आणि बुवाच्या गुंडींत पाणी ओतितो. पाणी घेऊन बुवा मंदिरांतील आंतील भाग धुतात. सिंहासन धुतात. खालचा भाग धुतात. नंतर आंचोळयानें सिंहासन पुसतात. या वेळेस भक्तमंडळीनें पाण्यानें भरून पुष्कळ घागरी आणलेल्या असतात. त्या घेऊन बुवा देवालय धूत असतात. श्रीच्या पुढील सभामंडपांत भक्तमंडळी श्रीचें भजन करीत उभी असते. या वेळेस भक्तिरस मूर्तिमंत अवतरलेला असतो. जिकडे तिकडे मंगलमय देखावा दिसत असतो. पावित्र्य चोहोंकडे प्रगट झालेलें असतें. प्रेमानंदानें मंडळी देहभान विसरलेली असते. हातांमधील धिमडी व टाळांच्या मंजुळ ध्वनीनें देवालय निनादित होऊन गेलेलें असतें. भक्तगणांची देवालयांत गर्दी झालेली असते. याप्रमाणें ही प्रक्षालनपूजा फारच बहारीची होते. आनंदाला पारखे झालेल्या मनुष्यास या वेळेस आनंद होईल. उदासपणामुळें आयुष्य रुक्ष झालेल्याचा रुक्षपणा तें दृश्य पहातांच नाहींसा होईल. प्रेमानंद म्हणजे काय असतो याचा अनुभव ज्याला

नाहीं त्याला प्रेमानंदाचा मधुर अनुभव या वेळेस होईल. पावित्र्याच्या अनुभवानें हृदय पुनीत होईल.

देवालय धुणें संपल्यावर श्री देवीस धूपदीप दाखवून नैवेद्य समर्पण करण्यांत येतो. या वेळीं बजाजीबुवा, धुपारती हातीं घेऊन बाहेर निघतात. या वेळीं देवालयांतील सर्व मंडळी बाहेर निघते आणि देवालय बंद करण्यांत येऊन देवालयास कुलुपें घालून बुवा आपलेजवळ किल्ल्या घेतात. यानंतर हातीं धुपारती घेऊन अंगारा देत देत बुवा आपले ओवरीस जातात.

मंगळवारीं रात्रीं मुख्य पूजा झाल्यावर श्रीदेवीचा छबिना निघतो. सिंह, नंदी, गरूड, राजहंस, मयूर इत्यादि लांकडी वाहनें उत्तम रंगविलेलीं अशीं आहेत. त्यांवर चांदीची अंबारी बांधितात. हीं वाहनें अमृतराय पाटलांनीं कोल्हापुराहून आणिलेलीं आहेत. अंबारी येथेंच म्हणजे देवालयांत जमलेल्या चांदीची तयार केलेली आहे. देवालयाच्या दक्षिणेकडील बाजूस ज्या मोठमोठ्या ओवऱ्या आहेत त्यांपैकीं भवानीशंकराच्या सभामंडपामधून दक्षिणबाजूनें बाहेर निघाल्याबरोबर जी अगदीं समोरची ओवरी आहे तिला छबिन्याची ओवरी म्हणतात. जामदारखान्यावरील शिपाई जामदारखान्यामधून अंबारी आणि एक वाहन या ओवरीस आणितात. हा छबिना काढण्याचा मान सरकारी अधिकाऱ्याकडे असतो. तो अधिकारी श्रीमंदिरास उजवी प्रदक्षिणा घालून नंतर श्रीदर्शन घेऊन छबिन्याचे ओवरीस येतो. श्रीची भोगमूर्ति जामदारखान्यांत असते ती जामदार आणून अधिकाऱ्याचे स्वाधीन करितो. अधिकारी तेथें जवळ असलेल्या मंडळीस श्रीदर्शन करवून मूर्ति अंबारीमध्यें स्थापन करितो. यानंतर अधिकारी देवालयांत जातो. या वेळीं धुपारती होऊन पुजारी अधिकाऱ्याची वाट बघत उभा असतो. अधिकारी येतांच पुजारी त्यास श्रीदर्शन करवून श्रीच्यापुढें सिंहासनाजवळ असलेल्या पितळेच्या पादुका त्याच्या जवळ देतो. अधिकारी त्या घेऊन देवालयाचे

बाहेर येतो. या वेळीं छबिना ओवरींतून उचलून खालीं पटांगणांत फरशीवर पश्चिमाभिमुख करून ठेविलेला असतो. अधिकारी तेथें जमलेल्या शिष्टमंडळीचें दर्शन करवून पादुका शिपायांच्या जवळ देतो व छबिन्यावरून नारळ ओंवाळून फोडितो. हे नारळ जमिनीवरील फरशीवर आपटण्यांत येऊन त्याचे तुकडे इतस्ततः पसरतात व ते घेण्यासाठीं जी एक प्रकारची गोंधळवजा गडबड उडून जाते ती पुसूंच नका. अधिकारी नारळ फोडून छबिन्यास उजवी प्रदक्षिणा घालतो व छबिन्याचा जो नियमित मार्ग आहे, त्याच्या पहिल्या मुक्कामाच्या ठिकाणीं आपण जाऊन उभा राहतो.

हा छबिना हल्लीं माणसांच्याच खांद्यावरून काढितात. पूर्वीं तो हत्तीवरून काढीत असत. हत्ती अक्कलकोटच्या महाराजांचा होता पण तो मस्त होऊन मरण पावल्यानंतर माणसांच्या खांद्यावरूनच छबिना निघतो. जमलेल्या लोकांपैकीं छबिन्याची दांडी खांद्यावर घेण्यास अगदीं मी तूं होऊन जाते. शेवटीं शिपाई त्यांपैकीं चांगले धट्टेकट्टे लोक निवडून काढितात आणि त्यांना छबिना नेण्याचा मान देण्यांत येतो. यानंतर छबिना आपल्या पहिल्या मुक्कामावर उभा करण्यांत येतो.

या वेळीं देवालयांत माणसांची एकच गर्दी झालेली असते. जिकडे तिकडे भुत्ये व आराधी पोत घेऊन नाचत असलेले दिसून येतात. हातामध्यें पोत घेतलेले व तोंडानें गाणीं म्हणत असलेले आराध्यांचे थवे देवालयामध्यें सर्वत्र हिंडत असतात. कोठें त्यांचें पदें म्हणून नाचणें चाललेलें असतें, तर एखाद्या ठिकाणीं एखाद्या आराध्याच्या किंवा आरादणीच्या अंगांत संचार झालेला असून शेंकडों लोक त्या आराध्यास वेढून आपआपल्या प्रश्नांचा त्याच्यावर भडिमार करीत असलेले दिसतात. नगाऱ्याचा प्रचंड ध्वनि चाललेला असतो. त्यांतच ताशाचा खणखणाट, घंटेचा घणघणाट, संबळोचा कडकडाट आणि हजारों लोकांचा कलकलाट

मिसळल्यामुळें देवालय इतकें ध्वनिमय होऊन जातें कीं, त्या वेळीं कोणीं कोणास बोलेन म्हटलें तर बोलण्याचा शब्द अगदीं कानाशीं बोलून देखील ऐकूं येणें शक्य नसतें.

रात्रीची प्रशांत वेळ, वायू मंद गतीनें वहात असलेला, आकाशांत तारा चकचकत असलेल्या, चंद्रबिंब किंचित् वर आलेलें, अशा वेळीं देवालयांतील दीपमाळा पेटाविलेल्या असतात. हातीं पोत घेऊन जिकडे तिकडे लोकांचे थवेच्या थवे उभे असतात. प्रकाशाची जणूं कमताईच आहे कीं काय असें वाटून विजेचे दिवे त्या प्रकाशांत आपली भर टाकण्याचा प्रयत्न करीत असतात. या वेळीं देवालय इतकें प्रकाशमय होतें—प्रकाशाचा इतका लखलखाट असतो—कीं, प्रेक्षकांचे डोळे दिपून जातात. त्यांच्या डोळ्यांला तें तेज असह्य होतें. म्हणून ते किलकिल्या नेत्रांनीं देवालयांत असलेला तो तेजस्वी देखावा पाहण्याचा प्रयत्न करीत असतात.

ही रंगदेवता पाहून कोण अभागी प्रसन्न होणार नाहीं ? कोणाचे अंतःकरणांत तन्मयता उत्पन्न होणार नाहीं ? कोणाला आपलें देहभान असल्याचा अनुभव येईल ? प्रपंचांतील खडतर वेदनांचें विस्मरण न होणारा असा प्राणी त्या आनंदसागरांत मिळणेंच अशक्य ! त्रिपुरसुंदरी आनंददायिनी मगलदेवतेचा तो छबिना निघालेला; अशा वेळीं दुःख अप्रसन्नता, निराशा, वेदना यांची देवालयांत रीघ होण्याची सक्त मनाई आहे !

देवालयांतील प्रदक्षिणामार्गांतून ही छबिन्याची स्वारी मोठ्या धुमधडाक्यानें चाललेली असते. पुढें गोंधळी लावण्या, कटाव, पदें इत्यादि कवनें म्हणून संबळ वाजवीत असतात. त्याच्यानंतर छबिन्याच्या पुढें दोन्ही बाजूंस रांगेनें लोक उभे असतात. उजव्या ओळीस एका जागीं अधिकारी उभा असतो. मध्यभागीं छबिना उभा असतो. त्याच्यापुढें पुजारी हातांत धुपारती घेऊन उभा असतो. त्याच्या बाजुला जामदार

हातीं गुंडी व गंधपात्र घेऊन उभा असतो. जवळच चोपदार व दिवटे हे उभे असतात. छबिन्यावर मोरचेल वारण्याचें काम चाललेलें असतें. दोन इसम हातीं चवऱ्या घेऊन चवऱ्या वारीत असतात. मागें अबदागीर धरलेला असतो. पुढें नळे चंद्रज्योती वगैरे दारूकाम उडत असतें. भक्तमंडळीची छबिन्यावर पैसे ओंवाळण्यास व अंगारा लावून घेण्यास मारे गर्दी उडालेली असते. किती वर्णन करावें ? कुठवर हकीकत सांगावी ? माझी लेखणी हा प्रकार—अवर्णनीय प्रकार—वर्णन करण्यास असमर्थ आहे. याच वेळीं सर्वत्र उदयघोषही चाललेला असतो व मधून मधून कोणी 'बोला उदो उदो उदो !' असें फारच मोठ्यानें म्हणत असलेले ऐकूं येतें !

चला आपणही 'उदो उदो' म्हणत छबिन्याच्या बरोबर फिरूं. छबिना जेथें जेथें उभा राहतो तेथें तेथें आपणही उभे राहूं. छबिन्याची स्वारी श्रीमंदिरास प्रदक्षिणामार्गांतून दीड प्रदक्षिणा जागजागीं उभी रहात रहात करिते. या वेळीं आपणही स्वारीबरोबर फिरून प्रदक्षिणा करूं. ते पहा गोंधळी स्फूर्तिदायक पोवाडे म्हणताहेत आपण ते ऐकूं. तो चौघड्याचा निनाद तुम्ही ऐकला का ? तो ऐका. तो कोल्हापूर महाराजांचा चौघड्याचा कोंदून गेलेला निनाद, ती आलाप घेणारी बापू वाजंत्र्याची मंजुळ सनई, किती स्वर गोड ! पण स्पष्ट ऐकूं कुठें येतें ? दुसरा चौघडा मध्येंच गडबड करीत असल्यामुळें निरुपाय आहे. ती पहा भवानीदरबारची भजनीमंडळी आपल्या पेटीतबल्यासह श्रीचें भजन करीत निघाली आहे. त्यांची ती मधुर आवाजी ऐकूं येते का ? कुठें कांहींच स्पष्ट म्हणून ऐकूं येत नाहीं. सर्व ध्वनि मिश्र होऊन गेल्यामुळें कान कोंदून गेले आहेत. श्रवणदेवता या मिश्रध्वनीशीं तन्मयता पावल्यामुळें तिला भान उरलें आहे कोठें ?

पण गडबडींत आपण तें मायमोरतब्राचें विकट हास्य पहावयाचें विसरलों. चोपदार छबिना हालतांना 'बडे जाइयो' म्हणून मोठ्यानें ओरडला तेव्हां त्याचें आपल्याला स्मरण झालें. प्रकाशाच्या लखलखाटानें

डोळे दिपल्यामुळें व श्रवणदेवता तन्मय होऊन भान नाहींसें झाल्यानें अधिकारी नमस्कार करून पुढें चालतांना चेंगराचेंगरी होऊन गडबड झाली त्या गडबडीचे योगानें मायमोरतबाचें विकट हास्य अगदीं समोर असून आपणास दिसलें नाहीं. आपण या निनादांत लुब्ध होऊन गेलों असतां स्वतःकडे आकर्षण करून घेण्याचें सामर्थ्य मायमोरतबाच्या विकट हास्यांत नव्हतें; म्हणून तें आपल्याला गोचर झालें नाहीं. पण हा मायमोरतब आपल्याला पाहून असें विकट हास्य कां बरें करीत असावा ?

---

## प्रकरण ११ वें.

——:o:——

छबिना सात वारांपैकीं प्रत्येक मंगळवारीं व महिन्यांतील शुद्ध पक्षांत पौर्णिमा, तिचा आदला दिवस आणि दुसरा दिवस याप्रमाणें तीन रात्रीं काढला जातो. याशिवाय कांहीं कांहीं मुख्य सणांसही छबिना काढण्यांत येतो. तो पुढीलप्रमाणें—

चैत्र महिन्यांत शुद्ध प्रतिपदा, पुढें वैशाख, ज्येष्ठ, आषाढ व श्रावण या महिन्यांत कोणत्याही विशिष्ट सणाच्या दिवशीं छबिना निघत नाहीं. फक्त पौर्णिमेचे तीन दिवस आणि मंगळवार येवढ्याच दिवशीं निघतो. भाद्रपद महिन्यांत श्रीदेवी सिंहासनावरून उठून पलंगावर निजते. श्रीनें शयन केल्यावर छबिना मंगळवार आला तरी काढण्यांत येत नाहीं.

आश्विन महिन्यांत शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत नऊ दिवस छबिना निघतो. विजयादशमीचे दिवशीं श्री स्वतःच सीमोल्लंघन करिते व पुन्हां एकादशी दिवशीं पलंगावर शयन करिते. ही श्रमनिद्रा आश्विन शुद्ध १४ स म मपून त्या दिवशीं श्री पुन्हां सिंहासनावर आरूढ होते. पौर्णिमा व प्रतिपदा या दोन दिवशींच छबिना काढण्यांत येतो. नंतर वद्य पक्षीं जे

मंगळवार येतील त्या दिवशीं छबिना निघतो. कार्तिक व मार्गशीर्ष या दोन महिन्यांत मंगळवार व पौर्णिमेचे तीन दिवस या व्यतिरिक्त दुसरा कोणता सण नाहीं. पौष महिन्यांत शुद्ध प्रतिपदेस श्री शयन करिते व पौष शुद्ध अष्टमीचे दिवशीं सकाळीं पांच वाजतां पुन्हां सिंहासनारूढ होते. अष्टमीपासून पौष महिन्यांतील नवरात्रास आरंभ होतो. हें नवरात्र पौष शुद्ध १५ स संपतें. नवरात्रारंभापासून अखेरच्या दिवसापर्यंत नऊ दिवस छबिना निघतो. यानंतर वद्य पक्षांतील मंगळवार येतील त्या दिवशीं मात्र छबिना निघतो. माघ व फाल्गुन या दोन महिन्यांत एरवींप्रमाणेंच छबिने निघतात. मात्र फाल्गुन शुद्ध १५च्या दिवशीं देवालयांत होळी पेटविण्यांत येतें म्हणून छबिना निघत नाहीं.

## अलंकारपूजा.

श्रीदेवीचे नित्य घालण्याचे अलंकार शिवाय करून बहुमोल अलंकार श्रीचे जामदारखान्यांत आहेत, हे अलंकार वर्षांतून पुढील सात सणांचे दिवशीं श्रीच्या अंगावर घालितात.

१ चैत्र शुद्ध प्रतिपदा.
२ शिराळषष्टी.
३ भाद्रपद शुद्ध अष्टमी.
४ ललितापंचमी.
५ बलिप्रतिपदा.
६ मकरसंक्रांत.
७ रथसप्तमी.

या सात दिवसांखेरीज एखादे यात्रेकरूस अलंकारपूजा करण्याची इच्छा झाल्यास अलंकारपूजेविषयीं देवालयसंस्थानांत कर घेऊन अलंकारपूजा करण्यांत येते. अलंकार पुष्कळ व ते एकदम घालतां येणें अशक्य असल्यामुळें व्यवस्थापकांनीं त्यांच्या पांच प्रती केल्या आहेत. प्रत्येक प्रतींत कोणकोणते अलंकार आहेत त्याचा तपशील पुढीलप्रमाणें—

## प्रत पहिली.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | नेत्र जोड | नग १ | किंमत अजमासें ५०० |
| २ | पाय जोड | १ | ८८० |
| ३ | हरपररेवड्याची माळ | १ | ८१५ |
| ४ | मोहरेची माळ | १ | २५०० |
| ५ | पुतळ्यांची माळ | १ | २६०० |
| ६ | सूर्यहार | १ | ५२५ |
| ७ | चाफेकळ्यांची माळ | १ | २३३० |
| ८ | सतलडा | १ | ८४० |
| ९ | माणकाचें पदक | १ | १९०० |
| १० | हिरकणीचें पदक | १ | २००० |
| ११ | चिताक | १ | ३५०० |
| १२ | मोत्यांचा कंठा | १ | २००० |
| १३ | बिंदी बिजवरा | १ | १७० |
| १४ | तनमणी | १ | ५०० |
| १५ | मंगळसूत्र | १ | ३०० |
| १६ | मोत्यांचा तुरा | १ | ६२५ |
| १७ | कान जोड | १ | २०२५ |
| १८ | कळस, कलगी व पट्टी यांसह मुगुट | ३ | ३००४० |
| १९ | जडावाचें छत्र | १ | ५२५ |
| २० | शिरपेंच | २ | ८१५ |
| २१ | नथ | १ | ३७५ |
| २२ | नेत्रजोड दुसरा | १ | २५ |
| २३ | वेणीचे डाग १८ | १ | ३१७ |
| | | २६ | ५५७३२ |

## प्रत दुसरी.

| | नग | किंमत अजमासें |
|---|---|---|
| १ खडाव जोड | १ | ३५० |
| २ चांफेकळ्यांची माळ | १ | ८०० |
| ३ पुतळ्यांची माळ | १ | २१०० |
| ४ चंद्रहार | १ | ८५० |
| ५ मोत्यांचा कंठा | १ | २०७५ |
| ६ चांफेकळ्याची जडावाची माळ | १ | ८०० |
| ७ शिरपेंच | १ | ९२० |
| ८ मोत्यांचा तुरा | १ | १०५ |
| ९ कानजोड | १ | ६२५ |
| १० मंगळसूत्र | १ | १५० |
| ११ तनमणी | १ | १०० |
| १२ बिंदीबिजवरा यासुद्धां चंद्रहार | १ | ५५० |
| १३ निळाचें पदक | १ | ७२५ |
| १४ नथ | १ | २०० |
| १५ नेत्रजोड | १ | १०० |
| १६ सोन्याचा मुकुट | १ | १४०५ |
| १७ सोन्याचें छत्र | १ | १५० |
| १८ सतलडा | १ | २५०० |
| १९ हरपररेवड्यांची माळ | १ | १२५ |
| | १९ | १४३३० |

## प्रत तिसरी.

| | | |
|---|---|---|
| १ पुतळ्यांची माळ | १ | २१०० |
| २ हरपररेवड्यांची माळ | १ | ३०० |

| | नग | किंमत अजमासें |
|---|---|---|
| ३ पोवळ्यांची माळ | १ | १५० |
| ४ चंद्रहार | १ | ५०० |
| ५ मोत्यांचा कंठा | १ | ५५० |
| ६ निळाचें पदक | १ | ५०० |
| ७ मंगळसूत्र | १ | ५० |
| ८ बिंदीबिजवरा | १ | १०१ |
| ९ शिरपेंच | १ | ३५० |
| १० सोन्याचा मुंकुट | १ | ८०० |
| ११ छत्र | १ | १०४॥=६ |
| १२ नथ | १ | ३२५ |
| १३ नेत्रजोड | १ | ४२ |
| | १३ | ५८७२॥=६ |

## प्रत चवथी.

| | | |
|---|---|---|
| १ मोत्यांचा कंठा | १ | ३०० |
| २ सोन्याचा कंठा | १ | ६०० |
| ३ चंद्रहार | १ | ७३६॥· |
| ४ बिंदी बिजवरा | १ | १५० |
| ५ तनमणी | १ | ७०० |
| ६ मंगळसूत्र | १ | २९७ |
| ७ नेत्रजोड | १ | ४० |
| ८ नथ | १ | ३२५ |
| ९ हिरकण्यांचीं कर्णफुलें | १ | ४८० |
| १० चांदीचे खडाव | १ | १८ |
| | १० | ३६४६॥· |

## प्रत पांचवी.

| | नग | किंमत अजमासें |
|---|---|---|
| १ सोन्याची कंठी | १ | २०० |
| २ मोत्यांची कंठी | १ | १२५ |
| ३ चंद्रहार | १ | ४४३।।। |
| ४ बिंदीबिजवरा | १ | २०० |
| ५ तनमणी | १ | ६५ |
| ६ मंगळसूत्र | १ | १०३ |
| ७ नेत्रजोड | १ | ३८ |
| ८ नथ | १ | २५० |
| ९ चांदीचा खडाव जोड | १ | ३४।।। |
| | ९ | १३५९।। |

या प्रतवारीशिवाय जामदारखान्यांत पुढीलप्रमाणें महत्वाचे अलंकार व बहुमूल्य जिन्नस आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ सोन्याची कंठी | १ | १३० |
| २ भोग मूर्तीची कंठी | १ | ७५ |
| ३ फुटलेल्या मोत्याचा कंठा | १ | १६ |
| ४ सोन्याचा दोनपदरी कंठा | १ | २५० |
| ५ पोखरमण्याचा कंठा | १ | ११५ |
| ६ सोन्याचा कंठा | १ | २४१०४ |
| ७ गळसरी | ८ | ८१२०१२ |
| ८ चंद्रहार | ३ | ८००५०४ |
| ९ चिंचपेट्या | ३ | ४४६ |
| १० पुतळ्यांच्या माळा | १८ | ६९०१०१५ |
| ११ पोवळ्यांच्या माळा | २ | ५१ |

| | नग | किंमत अजमासें |
|---|---|---|
| १२ पानपोत तांदळीपोत | १ | २६ |
| १३ पानड्यांचें पदक | १ | ३०० |
| १४ मोत्यांच्या पाटल्या जोड | १ | २०० |
| १५ बिंदीबिजवरे | ९ | २९६२ |
| १६ भुजबंद | ३ | ७५० |
| १७ एकदाणी मोती | ९ | ६०० |
| १८ मंगळसूत्रें | ३ | ६२४०८ |
| १९ सोन्याच्या मोर्चेलाच्या मुठीचा जोड | १ | ५५० |
| २० माजपट्टे | ४ | ३५५५ |
| २१ सोन्याच्या सऱ्या | १३ | २३६५०४ |
| २२ लिंबोळी | १ | २० |
| २३ सोन्याचे हात जोड | १ | ४०० |
| २४ त्रिशूळ | १ | ५ |
| २५ नेत्रजोड | ८ | २४२०८ |
| २६ नथा | ५ | १३५० |
| २७ जवाची माळ | १ | ८५ |
| २८ जडावाचा सूर्य | १ | ३०० |
| २९ जडावाचा चंद्र | १ | २०० |
| ३० गाठे जोड | १ | ६५ |
| ३१ डोरलें | १ | १२ |
| ३२ चिताक | १ | १०६०४ |
| ३३ सोन्याच्या टोपणाचे गोंडे | ३ | ३५ |
| ३४ सोन्याच्या पाटल्या जोड | १ | २४० |
| ३५ सोन्याची अंगठी | १ | २९ |
| | ११२ | २४८६१०० |

देवालयांत याशिवाय चांदीचें सामान खालील तपशिलाप्रमाणें आहे.

| | वजनभार | किंमत अजमासें |
|---|---|---|
| १ माजपट्टा | १३८ | १३८।― |
| २ भोगमूर्ति छबिन्याची प्रभावळीसुद्धां | ४५ | ६० |
| ३ माही मरातब | १४२ | १४२ |
| ४ तबक | ६२।॰ | ६२।॰ |
| ५ प्रभावळ थोरली | ११७० | ११७० |
| ६ प्रभावळ धाकटी छबिन्याची | १५० | १५० |
| ७ प्रभावळ | ४५ | ४५ |
| ८ हलकारती | ३५ | ३५ |
| ९ हलकारती | ९॥॰ | ९॥॰ |
| १० पंचपात्र नग ३ | ६३ | ६३ |
| ११ संध्येची पळी | ६।॰ | ६।॰ |
| १२ धुपारत्या २ | २६०।१३१ | ३९१ |
| १३ अंबारी | २३३८ | ३००० |
| १४ अंबारी | २१० | ६६३।॰ |
| १५ समई जोड | १ | ५०० |
| १६ दिवे जोड | ५३२॥॰ | ५३२॥॰ |
| १७ चोपदार काठ्या | ४ | ३३४॥॰ |
| १८ दौती ३ संगमरवरी कलमदान | ३ | १०।॥॰ |
| १९ महिषासुर शेंडीसुद्धां | ५४ | ५४ |
| २० तबकडी | २॥॰ | २॥॰ |
| २१ प्याला | १ | २५ |
| २२ मोर्चेल जोड १ | ,, | ३० |
| २३ पंखा मूठ | २५ | २५ |
| २४ पंखा मूठ जाळीदार तगट | ७८ | ७८ |

| | नग | किंमत अजमासें |
|---|---|---|
| २५ पंख्याची दांडी तगट नक्षीदार | ९॥· | ९॥· |
| २६ पंखा मूठ जाळीदार | ८।· | ८।· |
| २७ पंखा मूठ तीनकांडी | १२॥· | १२॥· |
| २८ छत्र वर कळस सोन्याचा मुलामा खालीं चिपळ्या | २१८॥· | २१८॥- |
| २९ छत्र सोन्याचा मुलामा | ११५ | ११५ |
| ३० छत्र हा डाग अंबारीवर आहे | ३० | ३० |
| ३१ कचोळा | १०० | ९० |
| ३२ कठांजन | | १०० |
| ३३ दरवाजाचीं कवाडें | | २००० |
| ३४ पितळी कवाडावरील चांदीच्या फुल्या वगैरे | | २२५ |
| ३५ चवऱ्यांच्या मुठी ४ | | १८८ |
| ३५ मुकुट | | ४० |
| ३७ खडाव जोड १ | | २०।· |
| ३८ ढाल वर फुल्या त्यावर सोन्याचा मुलामा मध्यें वेलपत्ती | २६ | २५॥· |
| ३९ पेष कब्ज जाळीदार पानासुद्धां वर सोन्याचा मुलामा याची मूठ संगमरवरी आहे. | १८।· | १० |
| ४० चौफुला | २७|||· | २५|||· |
| ४१ कळस ९ | | ४०० |
| ४२ दिवटी बुधली | १७६ | ४०|||· |
| ४३ विदंगी | १९७ | १९० |
| ४४ गुंडी | १७० | १६१ |

| | नग | किंमत अजमासें |
|---|---|---|
| ४५ पंचारती | १३१ | १५१॥≈ |
| ४६ छत्र | | ३५ |
| ४७ चवरी | | २५ |
| ४८ चवरी जोड | | १५० |
| एकूण नग | ७१ | किंमत ११९३९॥≋ |

अलंकार व एकूण सामान मिळून यांची अंदाजी किंमत जरी एक लक्ष सतरा हजार सातशें एकेचाळीस पांच आणे दहा पै* आहे, तरी सामान अमूल्य आहे. त्याची किंमतच होत नाहीं म्हटलें तरी शोभणार आहे.

अलंकारांची दुरुस्ती पूर्वी एखादा दागिना विकून करीत असत. पण मध्यें एकदां सरकारानें आपल्या हातीं व्यवस्था घेतली त्या वेळीं देवालयाच्या व्यवस्थेचा अधिकार शास्त्रीबोवा या नांवाचे अधिकारी पहात असत, यांनीं अलंकारपूजेवर दर्जे अव्वल ५ रुपये, दर्जे दुवम ३ रुपये व दर्जे सुवम २ रुपये याप्रमाणें आकार ठेविला व त्या रकमेंतून दागिने दुरुस्त करूं लागले. हल्लीं हीच पद्धति अमलांत आहे.

# प्रकरण १२ वें.

—:o:—

अलंकारांची किंमत होत नाहीं असें आम्हीं जें म्हटलें तें कसें खरें आहे हें या प्रकरणांत कांहीं दागिन्यांचा आम्हीं तपशील देत आहों यावरून समजून येईल. पूर्वींचें जवाहीर आतांच्या सर्वसाधारण लोकांना

* सदर रकमेच्या बेरजेंत माझ्या बुद्धीनें अंतर दिसत आहे. हें अंतर देवालयाच्या अधिकाऱ्याच्या कृपेनें पुढील आवृत्तींत काढून टाकण्याचा प्रयत्न करीन.

पहावयालासुद्धां मिळत नाहीं म्हणून अलंकारांची योग्य कल्पना होण्या-साठीं मिळवितां येईल तितकी माहिती गोळा करून आम्हीं खुलासेवार तपशील शक्य तितका दिला आहे.

१ मोहरांची माळ वजन १३१ सुर्तीभार सुतानें गांठलेली. हिच्यांत कोयंड्यासुद्धां मोहरा १०१ असून हरपररेवड्यांचे मणी १० आहेत.

३––हरपररेवड्यांच्या माळा.

प्रत १––माळ सातपदरी. वजन ६७, सुर्तीभार, हिच्यामध्यें जवाचे मणी १५९९ असून दोन्ही बाजूंला सोमाशा दोन आहेत.

प्रत २––माळ दोन पदरी. वजन रेशीम व लाख यासुद्धां भार १२|||≈ हिच्यांत १९६ मणी आहे.

प्रत ३––मणी २६८ वजनभार ८|||· हिचे मणी बारीक आहेत.

१३––पुतळ्याच्या माळा.

प्रत १––माळ पदर ५, पुतळ्या कोयंड्यासुद्धां २७८ मणी २, हरपर-रेवड्यांचे मोहर १, मधील पदक साधें सोन्याचें वजन सु.भा. १११||· लोलक तांबडा १, सोमाशा २, सोन्याचें कारलें १, यांसहित.

प्रत २––माळ पुतळ्यांची पदर ५, पुतळ्या १८९ पदकें ४, मोहोर १, मोतीं ३, लोलक १, सोन्याच्या सोमाशा २, पदकास हिरकण्या ४२, हिरवे खडे १६, तांबडे खडे २८, गांठविलेल्या सुतासुद्धां वजनभार ८३||· सुर्ती.

प्रत ३––माळ पुतळ्यांची पदर ५, पुतळ्या २७६ शहरी पदक १, सोन्याचीं पदकें ३, घुगड सोन्याची १३, मोहर १, हरपररेवड्यांचे मणी २३०, सोमाशा सोन्याच्या २, पदकास तांबडे खडे १६, हिरवे खडे ९, पांढरा खडा बारीक १, वजन सुर्ती भार ११९.

प्रत ४––माळ पुतळ्यांची पुतळ्या १००, मोहर १, वजनभार ३४||· सुर्ती.

प्रत ५—माळ पुतळ्यांची पुतळ्या २५, वजनभार ७।≠ सुर्ती.
प्रत ६—माळ पुतळ्यांची पुतळ्या २१, वजनभार ७॥· सुर्ती.
प्रत ७—माळ पुतळ्यांची पुतळ्या २०, वजनभार ७, सुर्ती.
प्रत ८—माळ पुतळ्यांची पुतळ्या २०, वजनभार ७, सुर्ती.
प्रत ९—माळ पुतळ्यांची पुतळ्या २०, वजनभार ७≈ सुर्ती.
प्रत १०—माळ पुतळ्यांची पुतळ्या २६, वजनभार १०।॥· सुर्ती. हरपररेवड्यांचे मणी २९, सोन्याचें साधें पान १.
प्रत ११—माळ पुतळ्यांची पुतळ्या ७३, मोहोर १, वजनभार २७॥·
प्रत १२—माळ पुतळ्यांची पुतळ्या वजन तोळे ६।≠

३—चांफेकळीच्या माळा.

प्रत १—माळ चांफेकळीची. जडताच्या पानड्या ७४, पदक १, हिरकण्या ८ माणीक १, नीळाचा लोलक १, हिरवे खडे ७४, तांबड्या चिन्या ७४, बाजरीच्या दाण्यायेवढीं मोत्यें १०४८, वजनभार १४।॥≠
प्रत २—कालिका ४०३ वजन ६५॥· सुर्ती.
प्रत ३—माळ माणकाच्या जडताची माणीक चिंचुक्याएवढें २१, हिरकण्या २१, हिरवे लोलक २१, पदक १, हिरवा खडा १, तांबडे खडे २३ व बारीक मोतीं वजन १० सुर्ती.

## पादुका जोड ५

प्रत १—पादुका जोड यास हिरकण्या ५६, हिरवे खडे ३५, तांबडे खडे व बारीक चुन्या ४५ वजन सुर्ती.
प्रत २—सोन्याचे पाय सांकळ्या, पायजुब्या, विरुद्या व जोडवीं यांसुद्धां आंतील लाखेसुद्धां वजन ५३॥· भार.
प्रत ३—पादुका जोड रुप्याचा वर सोन्याचें तगट बसविलेलें वजन ५६ भार.
प्रत ४—खडाव रुप्याचे वजन ३९ भार.

प्रत ५—खडाव रुप्याचा ३६।।।· भार.

## गळ्यांतील पदकें ५

प्रत १—पदक माणकाचें यास पांढऱ्या हिरकण्या ७, तांबडीं माणकें ६८ हिरवे खडे १२ मोतीं १० सांखळी सोन्याची २०।।।· भार.

प्रत २—पदक हिरकण्यांचें हिरकण्या २१, हिरवा लोलक १, चुन्या १०, सांखळी सोन्याची वजन ११०६ भार.

प्रत ३—पदक धाकट्या नीलाचें. यास पांढऱ्या चुन्या २२, माणीक १२, मोतीं २, नीळ चिंचुक्या एवढा १.

प्रत ४—पदक थोरल्या नीळाचें. नीळ जांभळा एवढा १, व वरच्या बाजूस धाकटा १, तांबड्या माणकाचे खडे वरचे बाजूस २, व खालीं लोलक १, सोन्याची सांखळी. वजन १००२ भार.

प्रत ५—पदक जडिताचें. यास हिरकण्या ४, पदकास मोती गोधना-एवढा असून मोत्यांचे चार पदर यास मोतीं १९५, एकूण मोतीं १९६, वजन १।।।· भार.

## चंद्रहार ३

प्रत १—चंद्रहार सोन्याचा यास पदर ७, सोमाशा २, वजन सुतासुद्धां २६ भार.

प्रत २—चंद्रहार सोन्याचा. यास पदर ११, सोमाशा २, वजन सुता-सुद्धां १६।।· भार.

प्रत ३—चंद्रहार सोन्याचा यास पदर १०, सोमाशा २, वजन ३४ भार.

## सूर्यहार १

सूर्यहार यास पदर ६, सोमाशा २, २७।।· भार.

## कंठे सतलडासुद्धां ११

प्रत १—कंठा अष्टपेलू मण्याचा. यास पदर ९, पदकें ५, मोता, ५,

मात ॥ तूंचि सर्व गोत्र माय तुजविण मज आस कोण मायबहिण तुळजे १
करीतसे तुझा आधार ॥ करीं धरूनि करिसि पार ॥ भक्त तारीले अपार ॥
हेंही ब्रीद गाजे ॥ २ ॥ जननी तूंचि हीन दीन ॥ भवजळांत तारिच मीन
परिसुनिया कृपाघन ॥ जीवन प्राण माझे हो ॥ ३ ॥ कमलाकर सहित
पाह ॥ आणिक मागणें तें काय ॥ निशिदिनीं मम हृदयीं राहो ॥ ध्यान
हें तुझें हो ॥ ४ ॥

## ४३ पद.

अंबा मतवाली मतवाली ॥ सब देवनकी पालनवाली ॥ ध्रु० ॥
महिषासुर तो बडा जी खंदा ॥ उसे मारकर डाली ॥ १ ॥
अंधे करती कोड तोडती ॥ उसे करवी भली ॥ २ ॥
दीन अनापाल कहत ॥ तुजविण कोण हमारा वाली ॥ ३ ॥

## ४४ पद.

सब देवनकी बडी ॥ अंबा सब देवनकी बडी ॥ ध्रु० ॥
हिंगळाज ज्वाळा गर्जत आयो ॥ उभी द्वार खडी ॥ १ ॥
सप्तशृंगी उदकके उपर ॥ वर देनेको खडी ॥ २ ॥
चंड मुंड महिषासुर मर्दुनि ॥ रक्तबीज सोलडी ॥ ३ ॥
अमृतरायके अमृत बचन ॥ चरण चित्तसो जडी ॥ ४ ॥

## ४५ पद.

आई मुळ धाडी हो माते ॥ मग मी येतें ॥ ध्रु० ॥
काम क्रोध माझे भ्रतार ॥ सदां करति गुरगुर ॥
जाचणी मजला त्याची फार ॥ सोसू कुठवर ते ॥ १ ॥
माया माझी हीच सासू ॥ भवजळ जाच कुठवर सोसूं ॥
मजला आला तिचा त्रासू ॥ नगमी तेथें ॥ २ ॥
आशा मनशा जावा नणदा ॥ सदा लाविती काम धंदा ॥
भक्ति ज्ञान दे मज सदा ॥ कीं धांवत येतें ॥ ३ ॥

बंधु बोध आला मुराळी ॥ अहं ममता गेली समुळी ॥
वाजविन त्वत्पदाची टाळी ॥ निःसंशय येतें ॥ ४ ॥
निर्गुण निराकार तुझें घर ॥ ब्रह्म मुक्ति तेथें राहणार ॥
गणपति आहे तेथें ॥ स्मरायातें ॥ ५ ॥

### ४६ पद.

तुळजापुर वैकुंठ अंबा साहेब ज्या बैठे ॥ नट नाटक नट नागर नाना लीला नाट नाटरे ॥ अजब तक्त सिंहासनजडतुलजासाहेब सरदार ॥ सब सुरवरके भवानि शंकर वडा अटल दरबार ॥ ब्रह्म देवसो दिवान भैरव करी कारभार ॥ चित्रगुप्तसो दोन बामण कलोल पास लिखणार ॥ १ ॥ अमृत कुंड कलोळ जायसो प्राणी मुक्त भयो ॥ तामंदा आकिनी व्हां भीगीर्थी गोमुखी स्नान भयो ॥ वाचस्पति हो हरिनारायण पुराण पढत हो ॥ गणगंधर्वी गाई गोंधळी नित प्रभंजक हो ॥ २ ॥ चांद सुरज दो पोत बनाकर खेलत भूते ॥ व्यासादिक मुनिजन स्वागे ठाडे गुण गाते, वेदपुराण बंदीजन सोले न खडे रहिते ॥ कमलाकर सुत कमलाकर पद पंकज पुकारते ॥ ३ ॥

### ४७ पद.

प्रथमारंभा प्रणवरूपिणी अंबा दर्शन करले ॥ महाराज दर्शन करले ॥ध्रु०॥
प्रणवरूप अनुपम मैया ॥ भक्तकाज लिनो अवतार ॥
महिषासुर असुर मारके ॥ रक्तबीजके ठार ॥
पछाडे रणमो शुंभ निशुंभा ॥ १ ॥
जमुनाचल अचल निवासिनी ॥ तुळजापुरके धाम ॥
बजत चौघडा नौबत डंका ॥ अर्चन सुब्रोह और शाम ॥
ठाडी सिंगासन श्री जगदंबा ॥ प्रणवरूपिणी अंबा ॥ २ ॥
किरिट मुकुट माथेपर शोभे ॥ केशर कुंकुम भाल ॥
पीतांबरकी कसनी कसे है ॥ गले मोतनकी माळ ॥
देखकर शंकर करे अचंबा ॥ प्रणवरूपिणी अंबा ॥ ३ ॥

धूप दीप नैवेद्य आरती ॥ पुष्पांजलिके काज ॥
आस्तुति सुनकर अभ्यागतको ॥ सिद्ध किये शुभ काज ॥
दासके अर्पण श्री फल रंभा ॥ प्रणवरूपिणी अंबा ॥ ४ ॥
( मातुळकर महाराज )

४८ पद. ( माझी लाज तुला यदुराया )

लाज तुला जगदंबे ॥ आतां धांवत ये अविलंबें ॥
त्रिभुवन नायके तूं माझी आयके ॥ विनंति कल्पकदंबे ॥ १ ॥
बाळ तुझा प्रतिपाळ करी तूं ॥ रेणुके विश्वकुटुंबे ॥ २ ॥
भवसंसारी भय चिंतेचे ॥ लागले जाळ वळंबे ॥ लाज तुला०
विष्णुदासा समज उतरले ॥ वदु किती ऐसे अचंबे ॥ ४ ॥

४९ पद-( राग बागेश्री बहार ताल दीपचंदी. )

स्फूर्ण रूप आदी माया भवानी ॥ परा पश्यंति मध्यमा वैखरी वाणी ॥ध्रु.॥
जागृति स्वप्न सुषुप्ती ते तुर्या ॥ चारी अवस्था तूं निर्गुण भार्या ॥ १ ॥
अव्यक्तासी व्यक्तासी आणणें हें काम ॥ सुविद्या अविद्येसी माणीक नाम २

५० पद-( राग यमन ताल तिताल. )

चंडे चालविसी जगसारा ॥ मांडोनी महता महत पसारा ॥ ध्रु० ॥
निर्गुण गुण होसी तूं माये ॥ विधि हरिहर तव पासुनि पाहे ॥ १ ॥
मिळवुनि पंच भूतांचा मेळा ॥ खेळसि नाना परिच्या खेळा ॥ २ ॥
एकाचि परि तूं अनेक भासे ॥ जेविं घटमठीं महदाकाशे ॥ ३ ॥
न कळे पार तुझा तुजवांचुनि ॥ विलसे नरहरी हृदय विकासुनी ॥४॥

५१ पद-( राग बागेश्री ताल आदिताल. )

श्री देवी त्रिपुर सुंदरी माय पाव ॥ ध्रु० ॥
भवपाश बांधोनि पडलों मी महा रणीं ॥
काढी तूं यांतुनि झडकरि धांव ॥ श्री ॥ १ ॥
अंबे तूं अभय करीं नरहरीसी हृदयीं धरी ॥
संकट हें दूर करी देई निज ठाव ॥ २ ॥

### ५२ पद—( राग काफी ताल धमाल. )

वेधिलें मनबाई आतां गे ॥ जगदंबेसी पाहतां ॥ ध्रु० ॥
मस्तकीं मुकुट रत्नखचिताचा ॥ कुंकुम चर्चिलें माथा गे ॥ १ ॥
चंद्रवदन जिचें सरळ नासिक ॥ शस्त्र झळके आठी हाता गे ॥ २ ॥
दाट चुडे नेसे पिंवळा पितांबर ॥ कंचुकी तटतटीं छाता गे ॥ ३ ॥
मूर्ति पाहुनि मन उन्मन झालें ॥ माणिक वंदी जगन्माता गे ॥ ४ ॥

### ५३ पद

माय माझी मंज भेटवा ॥ तिजविण चैन पडे ना जिवा ॥ ध्रु० ॥
निजभक्तासी माय तारिसी ॥ शरणागतासी प्रेमे राक्षिसी ॥
तव महिमा नकळे मूढ मानवा ॥ १ ॥
नाम मधुर तुझें सुखकर अंबे ॥ हे आदिमाये पूर्णकदंबे ॥
संकटीं करिति तुझा धांवा धांवा ॥ २ ॥
वंद्य असशी वेद पुराणीं ॥ ब्रह्मादिकाची आदि जननी ॥
तव नामघोष मुखीं गावा गावा ॥ ३ ॥
अष्टभुजा ही माय भवानी ॥ कमलाकराची कुळस्वामिणी ॥
तव चरणीं ठाव मला द्यावा द्यावा ॥ ४ ॥

### ५४ पद

उदो देवी तूझा उदो देवी तूझा ।
असो गोंधळ पाहि माझा ॥ ध्रु० ॥
आदि माये तुवां हा प्रसाद दिला ।
हे निवृत्ति वधू आजि मजला ।
लाधली अजि बरा हर्ष झाला खरा ।
घालुं गोंधळ आतां शिघ्र तुझा ॥ १ ॥
हा निगम संबळ वाजवुनि केवळ ।
लोक मिळवूनिया येथ सबळ ।

स्वात्मज्योति वरी दिवटी धरुनी करीं ।
नाचूं थै थै पुढें आजि तुझ्या ॥ २ ॥
काम महिषाचिया बळिसी घेई दया– ।
ध्ये तुझ्या वंदु ह्या आजि पायां ।
आजिचा सुदिन हा मंगळाचि होय हा ।
आली अंगीं महामाय माझ्या ॥ ३ ॥
धन्य हे माऊली आजि मज पावली ।
नवस घेऊनि भली तृप्त झाली ।
चिन्मयी ती कुलस्वामिनी केवळ
वासुदेवा विमल बोध दे जी ॥ ४ ॥

५५ पद

वृत्ति जडे तव पायीं । कशी मम वृत्ति जडे तव पायीं ॥
जगजननी सांग लवलाही–कशी मम वृत्ति० ॥
जलजाचर व्यापारीं श्रमलों, भ्रमलों विषयप्रवाहीं ॥ १ ॥
पावन करि करवीरनिवासीनि, दडला दास तव पायीं ॥ २ ॥

५६ पद

आली आई भवानी स्वप्नांत, आली आई भवानी ॥
श्रीवरदा सुप्रसन्न मूर्ति, जशी वीज चमके गगनांत ॥ १ ॥
मळवट मौक्तिक भांग बिचारा, काजळ ल्याली नयनांत ॥ २ ॥
चंदन केशर कस्तुरी तांबुल, लाल रंगला पहा वदनांत ॥ ३ ॥
पीत पितांबर हार विराजत, हिरवी कंचुकि अंगांत ॥ ४ ॥
कंकण कनकाचे खणखणती, पैंजण वाजती पायांत ॥ ५ ॥
विष्णुदास म्हणे हेच निरंतर, दे आवडी मज भजनांत ॥ ६ ॥

५७ धावा

जय जय जगदंबे, श्री अंबे लक्ष्मी देव कदंबे ॥ जय० ॥
अनुपम स्वरूपाची तुझी घाटी, अन्य नसे या सृष्टीं ॥

तुजसम रूप दूसरें परमेष्ठी, त्वरित जाहला कष्टी ॥
शशि रसरसला वदनपुटीं, दिव्य सुलोचन दृष्टी ॥
सुवर्ण रत्नाच्या श्री मुकुटीं, लोपती रविशशि कोटी ॥
गजमुखीं तुज स्तविलें, हेरंबे मंगल सकलारंभें ॥ जय० ॥ १ ॥
कुंकुम शिरीं शोभे मळवटीं, कस्तुरी तिळ ललाटीं ॥
नासिक अति सरळ हनुवटी, रुचिरामृत रस उटी ॥
समान जणु लवल्या धनुकोटी, अकर्ण लोचन भ्रुकुटी ॥
शिरीं निट भांगवली उफराटी, कर्नाटकची घाटी ॥
भुजंग निळरंगापरि शोभे, वेणी पाठीवर लोंबे ॥ २ ॥ जय० ॥
कंकणें कनकाचीं मनगटीं, दिव्य मुद्रा दशबोटीं ॥
बाजूबंद नगे बाहुटीं, चर्चुनि केशर उटी ॥
अंगीं नवी चोळी जरिकाठी, पीत पितांबर तगटीं ॥
पैंजण पदकमळीं अति शोभे, भ्रमर धांवती लोभें ॥ ३ ॥ जय० ॥
साक्षप तूं क्षितिची तळवटी, तूंच स्वये जगजेठी ॥
ओंवाळीन आरती दिपताटीं, घेउनि करसंपुष्टीं ॥
करुणामृत हृदयीं संकटीं, धांवसि भक्तासाठीं ॥
विष्णुदास सदा बहुकष्टी, देशील जरि निज कोटी ॥
तरी मज काय उणें या लाभें, धांव अविलंबे ॥ ४ ॥ जय० ॥

## ५८ पद

तुळजापुरा जन हो चला, नमन करा त्वरितेला, तुकाईला, भवानीला ॥ ध्रु ॥
कुकुरा वधुनी रक्षियलें पैं, अनाथ अनुभूतिला ॥ १ ॥
शोक हरावा म्हणुनी लंका, दावित रामाला ॥ २ ॥
घाट शिळेवरी उभी राहुनी वर देई भक्ताला ॥ ३ ॥
स्तवन कराया देत बुद्धि जी, कवी दमाजीला ॥ ४ ॥

## ५९ पद ( गजल )

उदो बोला, उदो बोला, तुकाईचा उदो बोला ॥ ध्रु ॥

मीपणाचा त्याग करुनी, अहंकारा त्यजी सकला ॥
विनतभावें सदा भज तूं, रामवरदा तुकाईला ॥ १ ॥
चंड मुंडा वधुनि जिणें अखिल आर्या सुखी केले ॥
संकटाना सकल हरुनी, आम्हां दिधलें स्वराज्याला ॥ २ ॥
तमा हरुनी मनामधल्या, पोत आम्ही पाजंळीला ॥
कुबुद्धिचा नाश झाला, उदो बोला उदो बोला ॥ ३ ॥

### ६० पद ( श्रीपति कृत )

माय माझे तुळजापुरीं राहे, घाटशिळेवर वीट न मानुनि
वाट भक्तांचि पाहे ॥ ध्रु. ॥
जी प्रणवाची अर्ध मात्रा ॥ सुपुण्य प्रगटतां सुपात्रा
सहज चुकवी पूर्ण भवयात्रा ॥ सूत्रामादि सुर सकळातें
संकटि अभयदायीं ॥ १ ॥
विनंति हेचि पुढत पुढति ॥ घ्यावी सेवा ममहस्तीं ॥
पुढें जे मम वंशज होती ॥ निजपदीं सुदृढ तयातें रक्षुनि
निज ओसंगा वाहे ॥ २ ॥
मत्पूर्वजा करीं धरिलें ॥ पडतां संकटीं उद्धरिलें ॥
ज्यां चरण तुझे वरिले ॥ तारिलेंस विपदर्णवीं नाना
उपकृति काय वदूं हे ॥ ३ ॥
चित्कळे सदय राममाते ॥ तुजविण जग न दिसे मातें ॥
इतुकें चालविलें माते ॥ श्रीपति अति मतिमंद तारिला
कौतुक वदूं काय ॥ ४ ॥

### ६१ पद ताल—धुमाळी.

सुमरन करमन, सुमरन करमन, प्रथमारंभा तुलजाभवानी
ममकुल अंबा ॥ सुमरन करमन ॥ ध्रु० ॥
यमुनाचलपर आन विराजे, मरदन करके शुंभ निशुंभा ॥ १ ॥

सिंघासनपर, छबि अति सुंदर निरखत शंकर करत अचंबा ॥ २॥
सुरके कारन असुर न मारन, दासकू दरशन देत जगदंबा ॥ ३ ॥

६२ पद

भक्तवत्सले भाग्यनिधी भुवनेश्वरी ॥ दया करी मज दीना उद्धरी ॥धृ.॥
भजनपरायण भवभयहारण भक्तकाज कैवारी ॥
ब्रीदावळी गाजे भुजगावरी ॥
ब्रह्मादिक स्तविति बहुधा परि निगमागमगोचरा ॥
आनंदीं निजानंदनिर्भरीं ॥
ब्रह्मांडीं बहुरूप धरूनि व्यापक बाह्यांतरीं ॥
भवानी ब्राम्ही करुणा करी ॥
बलवर्धिनी भैरवी भयनाशिनी भाविकजन सुखकरी ॥
दया करी मज दीना उद्धरीं ॥ १ ॥
त्रिपुरसुंदरी सुंदर लहरी त्रिंबक प्राणेश्वरी ॥
जयंती त्रिदशाधीपसा करी ॥
तुरज तमज तीव्र त्रिविधे त्रिगुणे त्रिजगेश्वरी ॥
तुकाई त्रिविध ताप संहरी ॥
त्राहि त्राहिमां पाहि रेणुके श्रमलों बहुतापरी ॥
तुजविण नाही मज दुसरी ॥
तारि तारि महिषासुरमर्दनी रामवरदेश्वरी ॥
दयाकरी मज दीना उद्धरी ॥ २ ॥
प्रणव रूपिणी पर–ब्रह्मिणी प्रसिद्ध तुळजापुरीं ॥
नांदसी जगदंबा सुंदरी ॥
प्रयाग सम कल्लोळ तीर्थ परि गोमुख तदनंतरी ॥
सुमज्जन प्राणि पुनीत करी ॥
प्रासादिक प्रत्यक्ष दर्शन देऊनिया प्रियकरी ॥
जपातप फलश्रेयस्करी ॥

पुण्यक्षेत्र श्रीपीठ परात्पर पावन परमेश्वरी ॥
दया करी मज दीना उद्धरी ॥ ३ ॥
पतितोद्धारण पापनाशनी पुष्टि तुष्टि यशकरी ॥
पवित्रे प्रेमळ पद्माकरी ॥
पद्मज पुरंदरादि प्रमुख जें पूजिति परमादरी ॥
प्रफुल्लित पारिजात मंदिरीं ॥
परमामृत नैवेद्य समर्पुनी स्तोत्र करिति परोपरी ॥
अर्पण प्राणे पीतांबरी ॥
पालय मां श्री देह वरप्रदे अच्युत पद शंकरी ॥
दया करी ॥ ४ ॥
आदिकारणे आगमसारिणे आर्चिती आगमोत्तरीं ॥
आनंदी आत्मनिष्ठ परिकरी ॥
अखिल भोग आणिमादि त्या तिष्ठति तुझिये द्वारीं ॥
आराधिती यमुनागिरीमंदिरीं ॥
अरुणतरुणसम चरणसरोरुह रामात्मज दृढ घरी ॥
मनोरथ सफलित करी ॥
नित्य जयश्री नित्य शुभश्री मंगळ माहेश्वरी ॥
दया करी ॥ ५ ॥

**रामात्मज कविकृत** काव्येतिहाससंग्रह

६३ पद-राग भैरवी त्रिवट-( लागला मज छंद या चा० )
भागला हा जीव भवानी ॥ दाखिव पद राजीव भवानी ॥ ध्रु० ॥
लक्ष नको चौऱ्यांशी जानिया ॥ भवहि तू भाजीव भवानी ॥ १ ॥
निज जन रसने करवि अनाथा ॥ नामसुधा पाजीव भवानी ॥ २ ॥
पतित असे परि पावन करुनी ॥ यमदूता लाजीव भवानी ॥ ३ ॥
राजारामी लीन प्रासादिक ॥ त्रिभुवनिं यश गाजीव भवानी ॥ ४ ॥

**राजाराम प्रासादी**-(काव्येतिहाससंग्रह. )

६४ पद.

चिदानंद भवानि ! तुझा वेध लागला ॥
जन्म मरण सकळ दुःख संग भंगला ॥ ध्रु० ॥
संतचरण विमल वंदितां सदा । पावलों क्षराक्षरातीत तुझिया पदा ॥१॥
सर्वातीत सर्व रूपें दैत्य विनाश । भगवंतीं निज तेज तुझें पूर्ण प्रकाश २
देशकाळ रहित सदोदित समान । केशव म्हणे तुजविण मज अनुमान ३

**केशवस्वामीकृत पदसंग्रह**—( काव्यसंग्रह पृष्ठ १९९ )

६५ पद.

हे माय अंबे संकटीं रक्षीं तू ॥ ध्रु० ॥
बिंबाधरप्रिय सांबा करि मुख चुंबा । क्षणहि न विलंबे तुजला ॥ १ ॥
महिषासुर दमने अघशमने । स्मरणें तारिसि भक्तजनाला ॥ २ ॥
विश्वोद्भव स्थित्यंतर करणें । गोविंददास म्हणवी तूं आपुला ॥ ३ ॥

**काव्यसंग्रह**—पदसंग्रह भाग २–३ पृष्ठ ८५.

६६ पद.

विलंब न लावी लावी । झडकरि स्वरूप दावी ॥ ध्रु० ॥
दीनानाथे गिरिजे ! । बीद सत्य करावें तुळजे ॥ विलंब० ॥ १ ॥
तुझिया भेटीसाठीं । बळकट प्राण धरिला कंठीं ॥ वि० ॥ २ ॥
आदिनारायण तान्हा । तूं माय कृपेचा दे पान्हा ॥ वि० ॥ ३ ॥

**अनेक कविकृत पदसंग्रह**—( काव्यसंग्रह भाग ३ पृ. २ )

६७ पद.

जय ललिते देवी । त्रिपुरसुंदरी पाही माम् ॥ ध्रु० ॥
गिरिवरनंदिनि बाले । वीणारव झांझरि लोले ॥
ता तथैय तक तथैय धिमिकट । तथैय तथैय झेंतारि झेंतारि ॥
जय जय जगदाधारे ! । मुनिजनमन स्वात्म विचारे ! ॥ १ ॥
ता तथौंग तक तथै धुमकड । तथै झेंकड्ड कड्ड झेंतारि झेंतारि ॥ २ ॥
आदिनारायण मात्रे ! । पद देईं पावन मात्रे ! ॥

वादन तान तन दरना तनदीम् । झेंतर किडतक् झेंतारि झेंतारि । ३।

## ६८ पद.

मज तारीगे ! अंबे ! जगदंबे भवानी ! ॥ ध्रु० ॥
लसत्सरसिजाननारविंद नेत्रे गे ! । चलत्कुंडले सुकुंतले सुगात्रे गे ! ।
लसन्नासिके हरप्रमोदपात्रे गे ! । अति जडमति विनवूं मी किति—
तुज भगवति ! चलकल गति अंबे ! ॥ १ ॥
रणत्कंकणांगुलीयकाभिरामे गे ! । तडिद्दीप्ति वर्णे किंकिणी कदामे गे ! ।
झणन्नुपुरांघ्रि निर्जर प्रणामे गे ! । अविहितकर बहु सुखकर—
धरि शिरीं कर चल लवकर अंबे ! ॥ २ ॥
धर्म अर्थ काम मोक्ष तुझ्या हातीं गे ! । दीन इच्छिला पदार्थ पुरनि घातीगे
तुझीं स्तोत्रें विठ्ठलादि भक्त गाती गे ! । प्रणत जना जननी सतत
करिं मज नत ढकलुनि मत देई मजगत अंबे ! ॥ ३ ॥

## विठ्ठल कविकृत पदसंग्रह.

## पद ६९ ( ताल—दादरा. )

जय जय जगजननी देवी, सुरनर मुनी असुर सेवी,
भक्ति मुक्ति दायिनी, भव हरण कालिका ॥ जय० ॥ ध्रु० ॥
मंगल मुद सिद्ध वदनीं, परवरशर वरी रव वदनीं,
ताप तिमीर तरुण तरणी, किरण मालिका ॥ जय० ॥ १ ॥
पूतना पिशाच प्रेत, डाखिनी शाखिनी समेत,
भुतग्रह वेताल खल, मृगाल जालिका ॥ जय० ॥ २ ॥
वर्म चर्म करी कृपाण, शूल शक्ति धनुष्य बाण,
दानव दल दैत्य हरण, रन करालीका ॥ जय० ॥ ३ ॥
जय महेश भामिनी, अनेक रूप नामिनी,
समस्तदेव स्वामिनी हिम, शैल्य बालिका ॥ जय० ॥ ४ ॥
रघुपती पद परम प्रेम, तुलसिच हे अचल नेम,
देवी हो प्रसन्न पाहीं, प्रणत पालिका ॥ जय० ॥ ५ ॥

# महाराष्ट्राची कुलस्वामिनी—
# श्री तुळजाभवानी.

## प्रकरण पहिलें.

:०:

हें अखिल विश्व सुखाच्या मागें लागलेलें आहे. सुख मिळावें म्हणून सर्व प्राणिमात्राची सारखी धडपड चाललेली आहे. हा प्रपंच आपल्याला सुखकर व्हावा म्हणून मनुष्यप्राणी कितीतरी खटाटोप करीत असतो व त्याच्या खटाटोपाप्रमाणें तो सुखाचा कांहीं वांटा मिळवितो देखील. हा प्रपंचाचा मार्ग आक्रमण करीत असलेल्या प्रापंचिकास संसाराच्या मधुर सुखाचा जितका स्वाद चाखावयाला मिळतो, त्याच्यापेक्षां किती तरी अधिक दुःखाचा खडतर भोग भोगणें भाग पडतें. खरें म्हटलें तर मानवेतर प्राण्यांना जितका सुखोपभोग भोगितां येतो तितका मनुष्याला भोगतां येत नाहीं. मनुष्यानें आपल्या सुखाची मर्यादा विस्तृत करून ठेविल्यामुळें त्याच्या स्वभावामधील समाधान नाहींसें होतें व त्यामुळें जगांतील जी स्थिति त्याला भोगावी लागते ती समाधानानें न भोगतां तिला तो स्वतः दुःखाचें पुट चढवितो.

सुखाचा संसार सहज साध्य असो वा नसो, त्यासाठीं प्रत्येकाचा प्रयत्न मात्र अगदीं एकसारखा चाललेला असतो. मृगजलाच्या मोहाला बळी पडून हरिणाप्रमाणें भटकणाऱ्या मानवी प्राण्याला संसार मिथ्या आहे हें

तत्व माहित नसतें असें नाहीं; परंतु सुख–दुःखाच्या उसळत्या लाटांबरोबर प्रत्यहीं हेलकावे खाण्याचे प्रसंग आल्यामुळें दुःखाच्या मागून सुख व पुनः सुखाच्या मागून दुःख अशा प्रकारच्या एका पाठीमागें एक येणाऱ्या सुख–दुःखाच्या भोंवऱ्यांत तो सांपडल्यामुळें त्याला संसार खराही म्हणवत नाहीं व खोटाही म्हणवत नाहीं. हा संसारसागर तरून जाण्याचा तो सतत प्रयत्न करीत असूनही दुःखाचा एखादा तीक्ष्ण खडक त्याच्या जहाजाला एकदम भोंक पाडतो व हां हां म्हणतां सुखाचा लोप होऊन जहाज बुडूं लागतें. यावेळीं जर भावी सुखाच्या आशेचे किरण त्याला दिसणार नाहींत तर—तर काय ? अधःपात !

ही भावी सुखाची आशा आहे म्हणून आनंद आहे. या आशेचें अमृत मनुष्याला नवजीवन देत असतें. या आशेचेच किरण दुःखांतील काळोख्या रात्रींत गांगरून गेलेल्या मनुष्याच्या मनाला धीर देण्याला तयार असतात. या आशादेवीचा आश्रय करून मनुष्यप्राणी जीविताच्या आरंभापासून तों अखेरीपर्यंत एकसारखा धडपडत असतो.

प्रपंचांत वावरणाऱ्या प्रापंचिकानें कितीही धडपड केली तरी समाधानाचा आश्रय केल्यावांचून त्याच्या पदरीं सुखाचा पुरा वांटा कधीं तरी पडतो काय ? सुखाच्या सौंदर्याला मोहून मनुष्यानें त्याच्यासाठीं कितीही प्रयत्न केले तरी खडतर दुःखाचीं भेसूर भूतें त्याला भेवडावून सोडल्याखेरीज रहात नाहींत. सुखाची अपेक्षा करीत असतांना क्षणार्धांत दुःखाचा दारुण डोंगर दत्त म्हणून पुढें उभा रहात असतो ! मानवी सुखाला मर्यादा म्हणून मुळीं कांहीं नसतेच. अमुक एक स्थिति प्राप्त झाली म्हणजे संसारिक सुखाचा कळस झाला असें कधींच होत नाहीं. सुखाच्या कल्पना वरचेवर वृद्धिंगत होत चालल्या आहेत. आजचें आत्यंतिक सौख्य केव्हां कनिष्ट ठरेल व त्याच्या जाग्यावर कोण अधिष्ठित होईल हें सांगतां येत नाहीं. मनुष्याची सुखाची कल्पना वाढती आहे. मारुतीरायाच्या शेंपटाप्रमाणें ती वाढत चाललेली आहे. एकंदरींत ती अमर्याद आहे एवढें खरें.

या असल्या अमर्याद सुखाच्या नादीं लागून त्याच्या प्राप्तीसाठीं सारखी धांवपळ करणारा माणूस एखादे वेळीं दुःखाच्या खोल दरींत एकदम आदळतो; या आकल्पित ठिकाणीं—या नकोशा वाटणाऱ्या ठिकाणीं—त्याची एकदां का रवानगी झाली म्हणजे त्याच्या अंतःकरणाला जे दारुण क्लेश होतात ते विचारूंच नयेत. या दरींत चांचपडत राहण्याची कोणालाही आवड नसते. दुःखाला आपण होऊन कोणीही आमंत्रण देत नसतो. परंतु दुःख हा पाहुणा इतका निर्लज्ज आहे कीं, तो बोलावल्याशिवायच वाटेल त्याच्या दारावर जाऊन उभा राहतो. पाहुण्याचा पाणउतारा करून चालत नाहीं व हा खडतर पाहुणा आपली हौस पुरवून घेतल्याशिवाय—आपला योग्य पाहुणचार घेतल्याशिवाय—जात नाहीं. हा पाहुणा घरीं आला कीं घरच्या मालकाचा आनंद पार पळून जातो!

या प्रपंच—सागरांत एकदां का तुफान झालें, तो सुखावह मार्ग एकदा का नाहींसा झाला म्हणजे मन घाबरतें. जिकडे तिकडे दुःखमय दारुण खडक पुढें दिसूं लागल्यामुळें जीवित इतकें कष्टमय वाटूं लागतें कीं, अशा सजीवतेपेक्षां त्याचें अस्तित्व नाहींसें झालें तर ठकि असें होतें. आनंदाच्या वेळचे भागीदार गुप्त होतात. ज्या भागीदारिणीशीं सुख—दुःख भोगण्यासाठीं जन्माची गांठ बांधलेली असते, जिला त्या दुःखांतील वांटा भोगल्यावांचून सुटत नाहीं, ती देखील तें दुःख तीव्र करण्यास मदतच करीत असते! हाय हाय! ती अवस्था नको! तिची कल्पना देखील इतकी हिडिस कीं मन नुसत्या स्मरणानेंच गांगरतें!

या वेळीं—या खडतर प्रसंगाचे वेळीं मनुष्याला जर हा सागर तरून जाण्याला कांहीं आधार मिळाला तर ठीक असतें. नाहीं तर, हताश झालेला तो मानव आपल्या कंटाळवाण्या आयुष्याचा व आपला संबंध तत्काळ तोडून टाकितो.

असल्या कष्टमय अवस्थेमधून प्रापंचिकांस सोडवावें, त्याचा गुप्त झालेला आनंद त्याला पुनः भेटवावा, त्याचें त्रस्त झालेलें मन शांत व

स्थिर करावें, ऐहिक दुःखाच्या प्राप्तीमुळें त्याच्या ठिकाणीं आलेली दीनता नाहींशी करावी म्हणून पवित्र क्षेत्रांचा अवतार झालेला असतो. या क्षेत्रांचा सहवास इतका विलक्षण असतो कीं, कसलाही हतबल झालेला माणूस असो, त्याचें दुबळें मन दुःखानें कितीही रापलेलें असो, पण त्याची हतबलता क्षेत्रांत पाऊल ठेवतांच नाहींशी होते. अचेतन मन सचेतन होतें. दुबळेपणा नाहींसा होऊन मनाला पुनः ताजा दम येतो व संसारशकट हाकारण्यास अंगीं पात्रता येते. त्याचा गुप्त झालेला आनंद त्याला पुनः भेट देतो व आयुष्यामधील पुढचा मार्ग आक्रमण करण्यास त्याला नवें सामर्थ्य प्राप्त होतें.

तुळजापूर हें अशा पवित्र क्षेत्रांपैकीं महाराष्ट्रांतील प्रमुख क्षेत्र आहे. प्रपंचामधील सुखाची आशा पळून जाऊन जेव्हां दुःखाची दारुण निराशा मराठा वीरास दिसूं लागते, प्रपंचाचें क्रव्याद स्वरूप त्याच्या पुढें भयानक रीतीनें आ पसरून उभें रहातें, त्यावेळीं या संकटाच्या बागुलबोवाच्या तडाक्यामधून मुक्त होण्यासाठीं मराठा वीर या लीलाविलासिनी श्रीमन् तुळजा देवीच्या पवित्र स्थळीं धांवत येतो ! आपल्या आईजवळ आपलीं गाऱ्हाणीं गातो. आईची त्या संकटापासून सोडवण्यासाठीं प्रार्थना करितो, तेव्हां दीनवत्सला, अनेक कोटी–ब्रंम्हांडमंडल स्वामिनी त्याला म्हणते, तूं कां घाबरतोस ? घाबरूं नकोस. आनंदित रहा व सदा उदयघोष कर !

अशाप्रकारें जगन्मातेनें धीर दिला, मराठा वीराच्या दुःखाचा नाश केला, पुढील आयुष्य आनंदांत जाईल म्हणून वर दिला व उत्साह मनांत फुंकला म्हणजे हा महाराष्ट्रीय वीर पुनश्च हुषार होतो. मागील एकंदर दुःखें पार विसरतो व पुढचा संसार उत्कृष्ट रीतीनें चालवूं लागतो. त्याला आतां दुःखाचें नांव म्हणून दिसत नाहीं, संकटें तोंड दाखवीत नाहींत व दारिद्र्याचा अंधकूप नरक नाहींसा होऊन जिकडे तिकडे आनंद भूमि दिसूं लागते. सर्व जग सुखाचें साम्राज्य बनतें व तो स्वातंत्र्यांत विहरणाऱ्या खगगणाप्रमाणें या जगांत विहार करूं लागतो.

श्री तुळजाभवानीचें वास्तव्य-स्थान म्हणून या ठिकाणास तुळजापूर हें नांव मिळालेलें आहे. तुळजापूर हें बालाघाट या नांवानें प्रसिद्ध असलेल्या डोंगराच्या तोंडाशीं वसलेलें आहे. या पर्वताचें पौराणिक नांव यमुनाचल असें आहे. तरी यावर बाला त्रिपुरसुंदरी श्री भवानी वास्तव्य करीत असल्यामुळें याचें चालू नांव जें बालाघाट तें पडलें असावें. हा बालाघाट सुंपीकतेविषयीं सर्व हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे.

बालाघाट म्हणजे यमुनाचल हा हिमाचलाचा भाऊ आहे. भाऊपणाचें लक्षण सांगणें फारच कठीण आहे. एका भावाला जी आवड असते तिचा दुसरा भाऊ कधीं कधीं तिरस्कार करितो, तर कधीं कधीं एकाच्या आवडीच्या प्रमाणापेक्षांही अधिक आपली आवड दाखवितो. कधीं कधीं ऐक्य हें भाऊपणाचें चिन्ह मानलें जातें, तर कधीं कधीं भिन्नत्व हेंही मानलें जातें. म्हणून हें लक्षण सांगणें द्वैताद्वैताचा निकाल देण्याइतकेंच कठिण आहे. हिमाचल आणि यमुनाचल यांच्या ठिकाणीं हें लक्षण कस कशा रीतीनें दिसून येतें हें आपण पाहूं. हिमाचल एकोणतीस हजार फूट उंच आहे! याचप्रमाणें यमुनाचलही कित्येक हजार फूट उच आहे. हिमाचल तीर्थक्षेत्रांनीं ज्याप्रमाणें गजबजलेला आहे त्याचप्रमाणें यमुनाचलाचीही स्थिति आहे. यमुनाचलानेंही हिमाचलाप्रमाणेंच अनेक नद्यांना जन्म दिला आहे. याच्यावरही अनेक निर्झर ठिकठिकाणीं गायन करीत क्रीडा करीत आहेत. अत्यंत आनंददायी वनश्री असल्यामुळें याच्यावरही पुष्कळ तपस्वी तपश्चर्या करीत असलेलीं स्थलें आहेत. व्याघ्रादि हिंस्र पशूंच्या जागजागीं आरोळ्या ऐकूं येतात. वृक्षलतांनीं सर्व भाग गजबजलेला असल्यामुळें दृष्टीला जिकडे तिकडे हिरवेंगार दिसूं लागतें.

त्याच्या उंचीचा मात्र हा तिरस्कार करितो, हें खरें आहे. त्याचें हिमैश्वर्य यमुनाचलाला मूर्खपणाचें वाटतें. त्याचे ते भयानक जलौघ याला आवडत नाहींत. त्याच्या गुलाबाच्या ताटव्या याला पसंत नाहींत. त्याचे ते ऊन पाण्याचे झरे हा कःपदार्थ समजतो. त्याच्या त्या बदरी वृक्षांना हा आप-

णाजवळ येऊं देत नाहीं. त्याच्या ओक वृक्षांना यानें कधींच थारा दिला नाहीं. त्याचीं तीं विशाल सरोवरें–मानस आणि रावणऱ्हद–याला नको आहेत. त्याच्यावरील ते हंस देखील याला नकोत. त्याच्या वनगांयींचें हा दर्शन देखील घेत नाहीं.

भिन्नपणा व ऐक्य यांचें हें मिश्रण खरोखर मोठें चमत्कारजनक आहे!

हिमालयाचें प्राचीन ग्रंथकारांनीं ज्याप्रमाणें वर्णन केलें आहे, त्याचप्रमाणें या यमुनाचलाचेंही केलेलें आहे. तें फारच वाचनीय आहे. हा प्राचीन मुनींचा यमुनाचल किती सुंदर आहे पहाः—

" सेवक परिवारानें मंडित असून संपत्तीनें युक्त असलेलें राजगृह ज्याप्रमाणें शोभायमान दिसतें, त्याप्रमाणें श्रीतुळजाभवानीचें निवासस्थान असलेला हा यमुनाचल अत्यंत रम्य आणि मनोहर असा दिसतो. याचीं गगनभेदी शिखरें सुवर्ण, वैडूर्य किंवा इंद्रनीळ मण्यांचींच केलेलीं आहेत किंवा काय असें वाटतें. ज्याचें सर्वांग शेंदरानें माखलें असून ज्याच्या गंडस्थळांतून मदस्राव होत आहे अशा मत्त गजराजाप्रमाणें हा दिसतो. ठिकठिकाणीं निर्झर गायन करीत करीत स्वच्छंदानें वहात असलेले दिसतात. त्यांच्या मंजुळ निनादानें सारें वन कोंदून गेलेलें अनुभवास आलें म्हणजे ऐकणाराच्या वृत्ति लीन होऊन तो परमेशचिंतनांत मग्न झाल्याशिवाय रहात नाहीं. वहात असलेल्या जलौघाच्या वेगांत सांपडलेल्या पाषाणशिला अधोगतीस चाललेल्या निर्धनाप्रमाणें आरडाओरड करीत पर्वताच्या पायथ्याकडे घसरत जात असतात. एखाद्या राजसभेंत राजसिंहासनापुढें ज्याप्रमाणें मंत्री उभे राहिलेले दिसतात, त्याचप्रमाणें मेघसमुदाय या पर्वतराजापुढें नम्रपणें उभे असलेले दिसतात. सिंह, व्याघ्र, तरस, आस्वलें, वानर, महिष, लांडगे इत्यादि वन्य पशु इतस्ततः फिरत असलेले दृष्टीस पडतात. अनेक प्रकारचे वृक्ष गगन भेदीत गेल्यामुळें अत्यंत प्रयास करून देखील सूर्यकिरणांना पर्वतपृष्ठावर संचारतां येत नाहीं. या पर्वतावर अशोक वृक्ष आहेत, आम्रवृक्ष आहेत, वटवृक्ष आहेत,

खर्जूरवृक्ष आहेत. आणि बिल्व, चंपक, पाटली, अश्वत्थ, अर्जुन, ताल, माल, पलाश, औदुंबर, खादिर इत्यादि अनेक वृक्षांनीं यावरील वन सुशोभित केलेलें आहे. याचप्रमाणें द्राक्ष, जाई, जुई इत्यादि अनेक लतांनीं आपल्या जाळ्या या पर्वतावर केलेल्या आहेत. अनेक प्रकारचे पुष्पवृक्ष ठिकठिकाणीं प्रफुल्लित असे शोभायमान झालेले आहेत. याप्रमाणें सौंदर्य-ऐश्वर्यानें युक्त असलेला हा पर्वतराज निरोगी असून सुंदर असलेल्या धनाढ्य विलासी तरुणाप्रमाणें शोभतो. याच्यापुढें गंधर्व गायन करितात. अप्सरा नृत्य करितात आणि कुबेर हात जोडून उभा राहतो. या नगराजाचें ऐश्वर्य खरोखरच अवर्णनीय आहे."

---

# प्रकरण २ रें.

भवानीचा अवतार भक्तांना तारण्यासाठीं झालेला आहे. भवानी भक्तांना संकटापासून मुक्त करण्यासाठीं प्रगट झालेली आहे. भवानी भक्ताच्या प्रत्येक कार्यामधून त्याला साह्य करण्यासाठीं या विश्वांत वास करीत आहे. दैत्यांचा कहर दुःसह झाल्यामुळें भक्ताच्या धाव्यानें करुणा उत्पन्न होऊन भवानी धांवत आली आहे. भवानीनें अवतार घेऊन युगायुगांच्या ठायीं सुरगणांना भयंकर कचाटींतून मुक्त केलें आहे. भवानी म्हणजे प्रत्यक्ष श्री भगवान् विष्णूची योग निद्रा आहे.

प्रलय कालाच्या वेळीं भगवान् विष्णू क्षीरसागराचे ठिकाणीं निद्रिस्त असतां मधुकैटभ दैत्यांचा ब्रह्मदेवांना अत्यंत त्रास झाला, त्यावेळीं ब्रह्मदेवांनीं भगवान् विष्णूच्या योगनिद्रेचें स्तवन केलें, म्हणून हिनें प्रगट होऊन मधुकैटभाचा नाश केला आणि ब्रह्मदेवास त्या संकटपासून मुक्त केलें.

दैत्य मंडळीमध्यें तारकासुर, महिषासुर वगैरे दैत्य फारच प्रसिद्ध लढ-

वध्ये असून त्यांनीं सुरांना पादाक्रांत केलें. महिषासुराचा व प्रत्यक्ष भगवान् विष्णूचा देखील संग्राम झाला पण तो त्यांना आटोपला नाहीं. महिषासुर विजयमदानें फारच उन्मत्त होऊन त्यानें सर्व विश्वास गांजून सोडलें. यावेळीं सर्व देवांच्या शरीरामधून तेज निघालें आणि तें एकवटून त्याची मूस होऊन भवानीचा अवतार झाला. भवानीनें महिषासुराशीं भयंकर युद्ध करून त्याचा वध केला व सुरगणांना सुखी केलें.

यानंतर शुंभ निशुंभ दैत्यांनीं सर्व जग आक्रांत केलें. त्याहि वेळीं भवानीनें अवतार घेऊन त्यांचा वध केला. चंड मुंडाचा निःपात उडवून रक्तबीजासारखा महा भयानक राक्षस पण तोही धुळीस मिळविला. त्याच श्री भवानीचें तुळजापुर हें निवासस्थान आहे. श्री तुळजाभवानीचा अवतार एका दीन विधवेच्या पातिव्रत्यरक्षणासाठीं झालेला आहे. एका असहाय स्त्रीची हांक ऐकून भवानी प्रगट झाली आणि तिनें त्या साध्वीची पातिव्रत्यभंगाच्या छळापासून मुक्तता केली आहे.

कृतयुगांत कर्दम नांवाचा वेदशास्त्रपारंगत असा एक स्वधर्मनिष्ट ब्राह्मण होता. त्याची अनुभूति नांवाची बहु गुणवती भार्या महान् पतिव्रता होती. अनुभूति पती हाच ईश्वर समजून त्याची सेवा करीत होती. एकमेकांच्या मधुर सहवासांत त्यांचा तारुण्याचा काल फारच सुखानें चालला होता. त्यांतच अनुभूति पुत्रवती झाल्यामुळें तर त्या उभयतांच्या आनंदाला पारावार उरला नाहीं.

परंतु या मृत्युलोकांत सुखाचा एकसारखा उपभोग कोणालाही घेतां येत नाहीं. भवितव्यतेला सुखांत विरस करण्याची चटक लागून गेली असल्यामुळें हा आनंदही तिच्यानें पाहवला नाहीं. कर्दम आणि अनुभूति उभयतां तरुण होते, सद्गुणी होते, त्यांचा काल फारच उत्तम रीतीनें चालला होता, परंतु दुष्ट भवितव्यतेला तें बघवलें नाहीं. कर्दमाचा एकाएकीं अंत झाला आणि अनुभूति वैधव्याच्या अंधकूप नरकांत पडली !

वैधव्यासारखें या जगांत खडतर असें दुःख नाहीं. वैधव्य–त्यांत

तारुण्य ! यासारखें दुःखाचा अनुभव देणारें दुसरें दुःख या जगांत तरी खास नाहीं. अशा खडतर दुःखाचा प्रसंग अनुभूतीसारख्या कोंवळ्या पोरीवर आल्यामुळें सर्वत्र हाहाःकार उडाला. अनुभूति वयानें कोंवळी होती, तरी अंतःकरणाची फारच मजबूत होती. तिनें दुःख आवरलें आणि सहगमनाची तयारी केली !

पूर्वींच्या काळीं सहगमन वैधव्याच्या असहनीय यातनांपासून सोडविण्याचा चांगला उपाय होता. विधवांचे आतां ज्याप्रमाणें जन्मभर हाल होतात त्याप्रमाणें या सहगमनाच्या चालीमुळें पूर्वीं होत नसत. अनुभूति सहगमन करावयास निघाली. परंतु त्यामुळें एक लहान अर्भक पोरकें होणार होतें. परंतु तिला त्याचा मोह आडविण्यास समर्थ झाला नाहीं. तिनें सहगमनाची तयारी केली. व ती आतां अग्निप्रवेश करणार तोंच आकाश वाणी झाली कीं—

" स्त्रीभिर्भर्तानुगंतव्यो ह्येषधर्मः सनातनः ।
गमनं गर्भिणीनांतु सुपुत्राणां निषिध्यते ॥ १ ॥
त्वंतु पुत्रवती सुभ्रुबालपुत्रासि शोभने ।
शिशूनां पालनं कार्यं त्वया निगममार्गतः ॥ २ ॥

—स्कंद पुराण.

आकाशवाणी झाल्यावर ऋषि-मुनींनीं अनुभूतीला सहगमनापासून परावृत्त केलें. अनुभूतीनें पतीचें कर्मांतर पुत्राकडून यथा प्रकारें केलें व आकाशवाणीप्रमाणें आपल्या पुत्राचें पालन करूं लागली.

अनुभूति कुठें होती ? याच जगांत होती काय ? छे ! नाहीं. तिचें कष्टी शरीर या जगांत वावरत होतें पण आत्मा पतीच्या आत्म्याच्या शोधांत परलोकांत हिंडत होता. ती नेहमीं पतीचें ध्यान करण्यांत मग्न असे. ती जिवंत होती ? होय. जीवंत होती. आपल्या पुत्राचें संरक्षण करण्यासाठीं ती जीवंत होती. पण जीवंत होती म्हणून हें जग तिल कसें दिसत होतें ?

आपल्या पतीविरहित असणारें तें भयानक जग अनुभूतीला ओसाड अरण्यापेक्षांही भयानक दिसत होतें. प्रत्येक उपभोग्य वस्तू तिच्या शरीराचा दाह करीत होती. ती तरुण होती म्हणून विषयवासनेच्या पूर्ततेसाठीं तिला पतीची आवश्यकता वाटली नाहीं, किंवा या लोकींचें सुख उपभोगावयास सापडतां यावें म्हणूनही ती दुःखित झाली नाहीं. केवळ पतीपत्नीचें विलग होणें, कायमची ताटातूट होणें व अखंड त्याच्यावांचून एकटें या जगांत वावरणें, हाय हाय! यासारखें जगांत दुसरें दुःख नाहीं!

पुत्रासाठीं अनुभूति जीव धरून होती. पुत्रासाठीं तिला या जगाचा निरोप घेतां येत नव्हता, म्हणून तिनें तसाच दुःखांत तो काळ पतीचें ध्यान करीत करीत घालविला. पुत्र वयांत येण्याचा अवकाश–तिनें त्याच्या स्वाधीन घरप्रपंच केला आणि तपश्चर्या करण्यासाठीं ती वनांत **चालती झाली!**

अनुभूतीनें आपली पर्णकुटि मंदाकिनी नदीच्या तीरीं एक एकांत स्थान पाहून बांधिली. ती तपाचरणांत आपला काळ घालवूं लागली. ती रोज सकाळींच उठून स्नान करून आसन घालून प्राणायाम करी. ध्यान लावून समाधी लावी व त्या आनंदांत मग्न होऊन जाई. अशा प्रकारें आपला काळ एकांत स्थानीं ती महासाध्वी तपाचरणांत घालवूं लागली.

रस्त्यावर पडलेलें सोनें कोणासही घेण्याचा लोभ उत्पन्न होतो, त्याचप्रमाणें एखादी तरुण विधवा पाहिली कीं तिचा उपभोग घेण्याची वासना, पुरुष तरुण असो कीं वृद्ध असो, त्याला झाल्यावांचून रहात नाहीं. एक तर विधवेचें ब्रह्मचर्य शाबूत असल्यामुळें, तिच्या लावण्यांत तेजस्वीपणाची भर पडलेली असते, म्हणून तिचें तारुण्य विशेषच खुलून दिसतें. व वनांतील कुसुमाप्रमाणें कोणी धनी ना मालक अशी स्थिति असल्यानें पुरुषाच्या तोंडाला पाणी सुटल्यावांचून रहात नाहीं. हिंदूच्या समाजशास्त्रानें या गोष्टीचा विचार करून हें विधवांचें सौंदर्य त्यांचा केशकलाप, त्यांचे दागदागिने, त्यांचें मांगल्यदायक कुंकुम हिरावून कमी करण्याचा व

त्यांना पुरुषांच्या अधम दृष्टीपासून वांचविण्याचा फारच प्रयत्न केलेला आहे. परंतु जरी याचा अल्प प्रमाणांत उपयोग होत असला, तरी मानवी मनोविकारांत यामुळें विशेष क्रांति होत नाहीं. आणि विधवांच्या पातिव्रत्यावर अधम पुरुषांचे हल्ले होऊन विधवांचें जीवित अधिक दुःखकारक बनतें! अशाच प्रकारचा हल्ला कुकुर नांवाच्या एका दैत्यानें अनुभूतीच्या पातिव्रत्यावर चढविला!

दोन प्रहरची वेळ होती. अनुभूति पतीचें ध्यान लावून समाधिसुखांत मग्न झालेली होती. कुकुर नांवाचा दैत्य मंदाकिनीच्या तीरीं मृगया करीत करीत त्या ठिकाणीं आला. त्याच्या दृष्टीला अनुभूतीची ती तेजस्वी पवित्र मूर्ति पडली. तें तेज, तें सौंदर्य, तें तारुण्य पाहून तो अत्यंत मोहित झाला. एकांत स्थान तर होतेंच. त्यांत तो बलिष्ठ राक्षस आणि अनुभूति अशक्त तापसी! मग काय, कोणता अडथळा होता म्हणून कुकुराच्यानें मोह आंवरेल? तरी अनुभूतीच्या पावित्र्याचा त्याच्या मनावर इतका परिणाम झाला कीं, एकदम तिच्या शरीराला स्पर्श करण्याचें त्याला धाडस झालें नाहीं.

कुकुर अनुभूतीच्या पुढें हात जोडून उभा राहिला आणि तिची प्रार्थना करूं लागला. तो म्हणाला, हे लावण्यमयी, तूं कोण आहेस? अप्सरा आहेस किंवा मृत्युलोकची कोणी तापसी आहेस? परंतु मृत्यु लोकांत मी आपल्या मनोविकारांना आकलन करून तपाचरण करणारी एक देखील स्त्री पाहिली नाहीं! तुझ्या सारख्या सकुमार तरुण स्त्रीला अशा वयांत असल्या प्रकारचें शरीर जाळणारें तप आचरणें चांगलें नाहीं. हें अनिंद्य स्वरूप, अहाहा! सुखोपभोग सोडून तपाचरण का आचरणार? मला स्वतःला पुष्कळ राण्या आहेत, पण त्यांत एक देखील इतकी रूपवान नाहीं. मी या जगाचा अधिपति आहें. माझ्यावर प्रसन्न हो आणि चल मी तुला आपल्या पट्टराणीचें पद देण्याला तयार आहें.

मी तुला असें विचारतों कीं, तपाचरण करून तरी तूं काय मिळ-

विणार ? जें तूं तपाच्या अंतीं मिळविणार आहेस तें मी तुला आजच देतों. चल. धन, धान्य, संपत्ति, सुखोपभोग, इंद्रियतृप्ति सर्व कांहीं मी तुझी हौस पुरवितों. तुझें तप फार झालें म्हणूनच विधात्याच्या इच्छेनें मी तुझी इच्छा पूर्ण करण्यासाठीं या ठिकाणीं प्राप्त झालों आहें. तर डोळे उघड, आणि माझा स्वीकार कर. कुकुराच्या शरीरांत मदनानें प्रवेश केल्यामुळें त्याची उत्कंठा फारच वाढली होती, म्हणून तो अगदीं दीन-वाणीनें अनुभूतीजवळ विलास–याचना करीत होता !

अनुभूति समाधिस्थितींत होती. कुकुराची याचना किंवा प्रार्थना तिला ऐकूं आली नाहीं. इकडे कुकुराचें मन अधिकच जर्जर होऊं लागलें, तो फारच उतावीळ झाला. परंतु अनुभूतीला बाह्य जगाचें ज्ञान नसल्या-मुळें ती आपल्या आनंदांत स्थिर होती.

आपल्या हात जोडण्याचा उपयोग होत नाहीं, आपल्या करुणेची किंमत नाहीं, व याचनेलाही मान नाहीं असें पाहून कुकुराला संताप आला. अनुभूतीला समाधि लागली आहे हें त्याला समजून चुकलें व म्हणून तिची समाधी उतरण्यासाठीं तो तिच्या कानशिलाशीं आपल्या हातांनीं टाळ्या वाजवूं लागला व मोठमोठ्यानें ओरडूं लागला. अशा प्रकारच्या प्रयत्नानें त्यानें अनुभूतीला समाधीपासून चळविलें !

समाधी उतरतांच अनुभूतीला काय दिसलें ? कोणत्या प्रकारचें संकट आपल्यावर ओढवलें आहे याची तिला जाणीव झाली. ही स्त्री सावध झाली असून देखील आपल्याशीं बोलत नाहीं किंवा डोळे उघडून नुसतें पहात देखील नाहीं, यामुळें असुराचा क्रोध दुणावला. ही बऱ्या बोलानें आपणास वश होणार नाहीं अर्थात् जबरी करूनच आपला हेतू पुरा करून घेतला पाहिजे, असा त्यानें निश्चय केला व त्या दुष्टानें त्या तापसी-च्या कोमल शरीरावरील विलास-दलालास स्पर्श केला !

---

# प्रकरण ३ रें.

——:o:——

शारीरिक विडंबना ! पातिव्रत्याचा घात ! आर्य स्त्रियांना यासारखें दुसरें कोणतेंही संकट वाटत नाहीं. पातिव्रत्य हें आर्यावर्तामधील स्त्रियांचें मुख्य लक्षण आहे. जगांतील इतर देशांतील स्त्रियांत आणि आर्यावर्तांतील स्त्रियांत जर कोणता भेद असेल तर आर्यावर्तांतील स्त्रिया पतिव्रता असतात हा मुख्य आहे. आर्य स्त्रियांचें मुख्य ध्येयच पातिव्रत्य हें आहे. त्यांना राज्य नको, वैभव नको, सुखोपभोग नको, स्वर्ग देखील नको! फक्त पातिव्रत्य असलें म्हणजे त्या या सर्वांवर लाथ मारतात ! आपलें पावित्र्य रक्षण व्हावें म्हणूनच त्यांनीं आजवर जीवंत असतांना मृत पतीच्या शेजारीं निजून चितेंत जाळून घेतलें आहे ! अनुभूति देखील सती जाणार होती; पण पोटचें पोर हें तिच्या या कामांत विघ्न आलें आणि म्हणून तिच्यावर हा प्रसंग ओढवला !

आकाश एकदम कोसळून जर आपला अंत होईल, किंवा धरणी दुभंग होऊन जर तिच्या पोटांत आपल्याला स्थल मिळेल, किंवा एकदम प्रज्वलित अग्निनारायण प्रगट होऊन आपली आहुती या वेळीं घेईल तर बरें, असें अनुभूतीला वाटलें. कारण, वन निर्जन, आपण अशक्त तापसी व प्रसंग दारुण दैत्याशीं ! अनुभूतीला वाटलें अशा वेळीं आपणास कोण साह्य करील ? तिनें पतिदेवाशिवाय इतर देवाची आराधना केली नव्हती. तिनें पतिदेवावांचून इतरांची प्रार्थना किंवा ध्यान केलें नव्हतें ! म्हणून आपल्या साह्यासाठीं कोणाचा धांवा करावा याची तिला विवंचना पडली. दैत्यालाच कांहीं सांगून पहावें असा एक विचार तिच्या मनात आला आणि तिनें आपले डोळे उघडले.

असुराच्या करस्पर्शानें अनुभूतीच्या शरिरास विजेप्रमाणें धक्का बसला

होता. तिच्या मस्तकावर जणूं वज्राघातच झाला होता ! संतापानें तिच्या शरीरांतील रक्तवाहिन्या फुगल्या होत्या ! ती थर थर कांपूं लागली होती ! तिनें हाच संताप जर कायम ठेवला असता तर असुरास ती शापून देखील दग्ध करती ! पण नाहीं. त्यामुळें तिचें आजवरचें तपाचरण मातींत मिसळून गेलें असतें ! तिला स्वर्गांत पतिरायाच्या सेवेंत हजर व्हावयाची इच्छा होती. ती तिची इच्छा तप नाहींसें झाल्यामुळें अपुरी राहिली असती. म्हणून तिनें संताप दाबला. ती त्याला झिडकारून म्हणाली " दुष्टा, चालता हो येथून ! जग ओस पडलें नाहीं. आणखी पाहिजे तर शंभर राण्या कर आणि आपली वासना पुरवून घे. एका तापसीच्या तपाचरणांत विघ्न आणून अधोगतीशिवाय तुला काय मिळणार आहे ? हें चांगलें नव्हे. या योगानें तुझा सर्वस्वीं घात होईल." याप्रमाणें थोडें कठोर तर थोडें आर्जवयुक्त अशा प्रकारें अनुभूति कुकुराशीं बोलत होती. असुराला तिचा आवाज फारच मोहक वाटला. अनुभूतीच्या बोलण्याच्या धर्तीवरून त्याला खात्री वाटली कीं, ही आपणास वश होणार. तो लडिवाळपणानें म्हणाला, " हे स्त्रिये, तूं अशा प्रकारें मला दूर लोटूं नकोस. तूं तरुण आहेस, सौंदर्यवान् आहेस म्हणून मी तुझ्यावर भाळलों आहें. तर अशा रीतीनें माझा तिरस्कार करूं नकोस. आपल्या रूपावर मोहित होणारास, आपणावर फिदा होणारास, आपल्यावर प्रेम करणारास स्त्रिया कठोरपणानें कधींही वागवीत नाहींत. त्याचा त्या कधींही तिरस्कार करीत नाहींत. आपल्या सौंदर्यानें दुसऱ्याच्या अंतःकरणावर विजय मिळविलेला पाहून त्यांना आनंदच होतो. त्यांना एक प्रकारचा आपल्या सौंदर्याचा अभिमान वाटतो व त्या आपल्यावर फिदा झालेल्यावर अंतःकरणापासून प्रेम करतात. तूं माझ्यावर रागावल्याप्रमाणें दाखवितेस, मला धर्मशास्त्राच्या गोष्टीही सांगतेस व हा प्रकार निंद्य आहे असेंही म्हणतेस; पण प्रेमवश स्त्रिया बहुतकरून असेंच बोलत असतात. नको नको म्हणून विलास भोगण्यांतच त्यांना अधिक सुख वाटतें. मला तुझा भाव

पूर्ण समजून चुकला. तूं माझ्या वचनाला मान दिलास, माझ्यावर अनुरक्त झालीस याबद्दल मी स्वतःला धन्य समजतों!"

आपल्या भाषणापासून सुलट परिणाम होण्याऐवजीं विपरीतच परिणाम झालेला पाहून अनुभूतीला खेद वाटला. आजवर आपण पतिदेवाशीं बेईमान झालों नसतांना आज हा प्रसंग आपल्यावर दैवानें आणल्याबद्दल तिनें त्याला दोष लाविला. पुढें ओढवणाऱ्या भीषणप्रसंगाचें हिडिस स्वरूप तिला दिसूं लागलें!

अनुभूतीनें या वेळीं मनःपूर्वक श्री भवानीचा धांवा करण्यास आरंभ केला. तिनें भवानीची करुणा भाकली. आतां तुझ्याशिवाय या संकटापासून सोडविणारं कोणी नाहीं. अनुभूतीवरील प्रसंग व तिची आपल्याविषयीं निष्ठा लक्षांत आणून श्रीभवानी अगदीं एक क्षणाचाही विलंब न लावितां तेथें आपल्या योगिनीवृंदासह एकदम प्रगट झाली. अनुभूतीनें आपले डोळे मिटले होते, भवानी तिला म्हणाली 'तापसी, डोळे उघड. मला कां हांक मारलीस?'

भवानी प्रगट झालेली पाहतांच अनुभूतीच्या आनंदास पारावार राहिला नाहीं. भवानीच्या पायांवर तिनें लोळण घेतली. ती तिचें स्तवन करूं लागली. पुढें असलेला प्रसंग तिनें थोडक्यांत निवेदन केला व आपलें रक्षण करण्याविषयीं तिची प्रार्थना केली.

भवानी या आपल्या अगदीं कामपूर्ततेच्या समयीं प्रगट झालेली पाहून असुराला फार वाईट वाटलें. कामपूर्ति झाली नाहीं यामुळें त्याला क्रोध चढला. त्याला वाटलें भवानीला या वेळीं फाडफाडून खावें! भवानीनें लगेंच त्याच्यावर पांच बाण टाकिले व त्याला जागच्या जागीं खिळलें. कुकुरदैत्यही असामान्य योद्धा नव्हता. या मध्यंतरीं आलेल्या विघ्नाचें निरसन युद्ध केल्याशिवाय होत नाहीं, हें त्याला समजून चुकलें. युद्ध करून हें संकट आपण टाळूं आणि नंतर अनुभूतीस घेऊन जाऊं, असा त्यानें निश्चय ठरविला.

कुकुरानें अमोघ शरवर्षाव चालविला व भवानी त्या शरांना छेदूं लागली. आपल्या बाणवृष्टीचा कांहीं उपयोग होत नाहींसें पाहून त्यानें जगन्मातेवर एक प्रखर शक्ति टाकिली पण मातुश्रीनें ती शक्तीही मधल्या-मधेंच छेदिली ! भवानीला क्रोध चढला आणि तिनें आपल्या शूलाचा प्रहार त्या दैत्याच्या हृदयावर केला, त्या सरशीं तो विकल होऊन मूर्च्छित पडला ! किंचित् कालानें मूर्छावेग सरल्यावर कुकुरानें विचार केला कीं, समोरा समोर युद्ध केल्यानें भवानी आपल्याला आटोपत नाहीं; यासाठीं मायाजाल पसरून पराजय केला पाहिजे. त्यानें मनुष्यरूप टाकून अश्वरूप धारण केलें. आणि लाथा झाडून तो त्या योगिनी समुदायाला भंडावून सोडूं लागला. तुळजाभवानीनें त्याच्यावर पांच बाण सोडले. कुकुरानें अश्वरूपाचा त्याग करून महिषरूप धारण केलें. त्यावरही भवानीनें प्रखर शरवृष्टि केली. कुकुरानें आतां सिंहरूप धारण केलें, आणि योगिनींना आपल्या नखांनीं ओरबडूं लागला ! भवानीनें त्याच्यावरही बाणांचा मारा केला. तेव्हां तो मारा असह्य झाल्यामुळें त्यानें तें रूप सोडलें व पुनः मनुष्यरूप धारण केलें.आणि मोठमोठे रथ, सारथी वगैरे निर्माण करून धनुर्धर वेषानें भवानींशीं लढूं लागला. त्याच्याकडून येणाऱ्या शरांचें निवारण करून भवानीनें आपल्या बाणवृष्टीनें त्याच्या रथाचा चूर केला. त्याच्या बाणांचा भाता छेदून टाकिला. त्याच्या जवळची एकंदर शस्त्रसामुग्री नष्ट केली विरथ झालेल्या दानवानें पुनः मायाजाळ पसरिलें. त्यानें अपार सैन्य निर्माण केलें. त्या चतुरंग सैन्यानें व आपल्या शस्त्रवृष्टीनें भवानीचें सैन्य झांकून टाकिलें. तें अवलोकन करून भवानी अत्यंत क्रोधायमान झाली ! तिनें शरवर्षाव करून तें सैन्य व त्यानें केलेली शस्त्रवृष्टि यांचा नाश केला आणि एक अत्यंत तीक्ष्ण असा अर्धचंद्र शर कुकुरावर सोडून त्याचा शिरच्छेद केला ! कुकुराच्या कंठनालामधून आणखी एक पुरुष निघाला ! भवानीनें त्याचाही तत्काळ शिरच्छेद केला. आतां मात्र ककरदैत्य गतप्राण झाला व त्याचें महा भयानक कलेवर पृथ्वीवर धाडकन् आदळलें !

कुकुराचा नाश झाल्यावर त्याच्या सेनेचा योगिनी, भैरव,वेताळ, कंकाळ इत्यादींनीं फडशा उडविला. त्यांनीं रणांगण साफ केलें. भवानी आपल्या परिवारासह अनुभूतीच्या समोर आली. अनुभूतीचा हृदयार्णव आनंदलहरींनीं उचंबळूं लागला. तिनें जगदंबेच्या पायांवर लोळण घेतली. भवानीचें पूजन करून स्तवन केलें. मातुश्री तिच्यावर संतुष्ट होऊन तिला वर माग म्हणाली.

" मला सदोदित तुझी पादसेवा घडावी " हा वर अनुभूतीनें मागितला. जगदंबेनें तिच्या इच्छेप्रमाणें तिला वर देऊन आनंदित केलें. अनुभूतीचा संकटामधून उद्धार करण्याकरितां याप्रमाणें तुरजा भवानीचा अवतार झाला.

ही हकीकत मेरू पर्वतावर मंदाकिनीच्या तीरीं घडली. सीतादेवीला रावणानें उचलून लंकेस नेलें त्या वेळीं भगवान् श्रीरामचंद्र सीतादेवीचा शोध करीत दंडकारण्यांत हिंडत होते. त्यांची भेट घ्यावी अशी भवानीला इच्छा उत्पन्न झाली व आपल्यासाठीं यमुनाचल पर्वतावर एखादें रमणीय स्थान पाहून ये म्हणून तिनें भैरवाला आज्ञा केली. श्रीरामचंद्र सीतेचा शोध करीत या यमुनाचलावर म्हणजे बालाघाटावर हिंडत होते. भैरव या पर्वतावर श्रीभवानीला राहण्यास योग्य असें स्थान पाहण्यासाठीं म्हणून अनेक स्थलें शोधीत शोधीत जो आला तो हल्लीं ज्या ठिकाणीं क्षेत्र तुळजापुर हें ठिकाण आहे, त्या ठिकाणची रमणीय शोभा पाहून हें ठिकाण श्रीभवानीस राहण्यास योग्य आहे, असें त्यानें ठरविलें व तो त्या स्थलीं राहिला. पण भैरव या स्थलाची रमणीयता पाहून भवानीकडे परत जाण्याचें विसरला !

भवानीनें भैरवाची कांहीं दिवस वाट पाहिली. पण तो येत नाहीं असें जेव्हां तिला आढळून आलें तेव्हां ती स्वतः आपल्या योगिनीवृंदासह या पर्वतावर आली. पाहते तों भैरव त्या रमणीयतेला लुब्ध होऊन आपल्याला विसरून खुशाल राहिला आहे !